

# विचारांचे कवडसे

आसावरी काकडे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# विचारांचे कवडसे

## आसावरी काकडे

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# विचारांचे कवडसे

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# विचारांचे कवडसे


## लेखिका : आसावरी काकडे

‘सेतू’ डी १/३, स्टेटबँकनगर, कर्वेनगर, पुणे, ४११०५२ .

फोन नं. ९४२११६७८४८० / ९७६२२०९०२८

Email- asavarikakade@gmail.com

Blog- asavarikakade.blogspot.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : २३ जून २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**आसावरी श्रीनिवास काकडे**

**बी.कॉम., एम.ए. मराठी,**

**एम.ए. तत्त्वज्ञान**



**प्रकाशित पुस्तके- २६**

**गद्यलेखन-**

*‘कवितेभोवतीचं अवकाश’ (लेखसंग्रह)

*ईशावस्यम् इदं सर्वम्: एक आकलन-प्रवास’ (तत्त्वज्ञान)

* ‘अथांग’- (अनुवादित कादंबरी) बिन्द्या सुब्बा यांच्या ‘अथाह’ या साहित्य अकादेमी पुरस्कार प्राप्त मूळ नेपाळी कादंबरीचा मराठी अनुवाद.

* आनंदी गोपाळ (कादंबरी- संक्षिप्त आवृत्ती) श्री. ज. जोशी यांच्या आनंदी गोपाळ या कादंबरीचे मुलांसाठी संक्षिप्तीकरण

**कवितासंग्रह-**

मराठी- ९ :

‘आरसा’, ‘आकाश’, ‘लाहो’, ‘मी एक दर्शनबिंदू’, ‘रहाटाला पुन्हा गती दिलीय मी’, ‘स्त्री असण्याचा अर्थ’, ‘उत्तरार्ध’, ‘व्यक्त-अव्यक्ताच्या मध्यसीमेवर’ आणि ‘भेटे नवी राई’

हिन्दी- ३

'मौन क्षणों का अनुवाद', 'इसीलिए शायद', आणि 'मेरे हिस्से की यात्रा'- (स्वतःच्या निवडक मराठी कवितांचा हिन्दी अनुवाद. या हिंदी अनुवादाचा तमिल अनुवाद प्रकाशित झाला आहे.)

अनुवादित- ४

* 'बोल माधवी' (चन्द्रप्रकाश देवल यांच्या 'बोलो माधवी' या हिन्दी कवितासंग्रहाचा अनुवाद),

* 'तरीही काही बाकी राहील' (विश्वनाथ प्रसाद तिवारी यांच्या निवडक हिन्दी कवितांचा अनुवाद),

* 'लम्हा लम्हा' (दीप्ति नवल यांच्या 'लम्हा लम्हा' या कवितासंग्रहाचा अनुवाद),

* 'तू लिही कविता' (डॉ. दामोदर खडसे यांच्या 'तुम लिखो कविता' या कवितासंग्रहाचा अनुवाद)

बालगीतसंग्रह- ५ : 'टिक टॉक ट्रिंग', 'अनु मनु शिरू', 'जंगल जंगल जंगलात काय?'(इसाप गाणी), 'भिंगोऱ्या भिंग', आणि 'ऋतुचक्र'

ब्लॉग्ज- 'ब्लॉग, एक नवी सुरुवात' या ब्लॉगमधे विषयानुसार बनवलेले दहा ब्लॉग्ज एकत्रित.

(http://www.asavarikakade.blogspot.com)

## काही महत्त्वाचे पुरस्कार-

* ‘बोल माधवी’- साहित्य अकादेमी, नवी दिल्लीचा अनुवाद पुरस्कार २००६

* ‘इसीलिए शायद’- केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्लीचा ‘हिंदीतर भाषी हिंदी लेखक पुरस्कार

* ‘मेरे हिस्से की यात्रा’- महाराष्ट्र राज्य हिन्दी साहित्य अकादमीचा संत नामदेव पुरस्कार

* ‘आरसा’ आणि ‘मी एक दर्शनबिन्दू’ या संग्रहांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार

* बालसाहित्यासाठी औरंगाबादच्या परिवर्तन संस्थेचा कै. ग.ह. पाटील पुरस्कार

* ‘कवितेभोवतीचं अवकाश’- आचार्य अत्रे स्मृति प्रतिष्ठान केशवकुमार आचार्य अत्रे पुरस्कार

* ‘ईशावस्यम् इदं सर्वम्...’- सार्वजनिक वाचनालय, नाशिकचा ग. वि. अकोलकर पुरस्कार.

* एकूण लेखनासाठी गो. नी.दांडेकर स्मृति ‘मृण्मयी’ पुरस्कार,

* पुणे मराठी ग्रंथालय, पुणेचा साहित्य सम्राट न. चिं. केळकर पुरस्कार

**इतर सन्मान**

* इयत्ता सातवी ते एम. ए. पर्यंतच्या विविध वर्गांच्या अभ्यासक्रमात व विविध संपादित संग्रहांमधे वरील संग्रहांमधील कवितांचा समावेश.

* आकाशवाणी, नवी दिल्ली तर्फे आयोजित सर्वभाषी कविसंमेलनात(२००२) मराठीचे प्रतिनिधित्व

* हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग (अलाहाबाद) द्वारा ‘सम्मेलन सम्मान’- २००४

* अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासह अनेक महत्त्वाच्या साहित्यिक कार्यक्रमांमधे कवितावाचन, निबंधवाचन, भाषण अशा प्रकारचा सहभाग.

# विचारांचे कवडसे

## आसावरी काकडे

# मनोगत

दैनिक सकाळ मधे ‘पहाट पावलं’ हे लोकप्रिय सदर चालू होतं. त्यात येणारे छोटे छोटे ललित लेख सकाळी सकाळी काहीतरी सकारात्मक विचार देणारे असायचे. २०१८ साली एके दिवशी श्री संतोष शेणई यांचा ‘पहाट पावलं’मधे तुम्ही लिहाल का? असा फोन आला. सदरलेखनाचा मला अनुभव नव्हता. पण लिहून पाहावं असा विचार करून मी होकार दिला. सदरलेखन सुरू झालं. तीन तीन महिने करत पूर्ण वर्षभर मी हे सदर लिहिलं. या काळात ‘पहाट पावलं’ सदराचं काम पाहणारे श्री अनिल पवार यांचे चांगले सहकार्य मिळाले. लेखनाला छान प्रतिसाद मिळाल्यामुळे सदरलेखनाचा हा अनुभव समाधान देणारा ठरला.

‘विचारांचे कवडसे’ या नावानं या सदरातील छोट्या छोट्या लेखांचं पुस्तक करावं असं मनात आलं. सकाळच्या संपादकांनी यासाठी लगेच अनुमती दिली. पुस्तक-निर्मितीतल्या या सहकार्याबद्दल दैनिक सकाळ मधील सर्वांची मी ऋणी आहे.

हे सर्व लेख ईसाहित्य प्रतिष्ठानच्या वतीनं ईपुस्तक रूपात प्रकाशित होत आहेत. लेख ज्या क्रमानं प्रकाशित झाले त्या

क्रमानंच या पुस्तकात घेतले आहेत. या प्रक्रियेतील ईसाहित्य प्रतिष्ठानच्या तत्पर सहकार्याबद्दल त्यांचे मनापासून आभार.

आसावरी काकडे.

asavarikakade@gmail.com

9762209028

-

शब्द हा आरसा रिक्त विरागी असतो
बिंबास दावितो रूप न ठेवुन घेतो
हा असो कुणाचा पण कोणाचा नसतो
पाहतो रसिक त्या क्षणास त्याचा होतो..!

***

आसावरी काकडे

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| 1. | नव्या संकल्पाची ती आठवण... | १७ |
| 2. | चालून आलेली संधी | २० |
| 3. | निवडुंगासमोर नसतो पर्याय | २३ |
| 4. | वाढायचं राहूनच गेलं... | २६ |
| 5. | 'नटनाट्य तुम्ही केले याच साटी..' | २९ |
| 6. | एकटे नसतोच आपण..! | ३२ |
| 7. | शब्दांनी सांगितलेली गोष्ट.. | ३५ |
| 8. | माझं दैनिक | ३८ |
| 9. | मोरपीस मिळण्याचे ठिकाण | ४१ |
| 10. | एक मिटलेली कविता... | ४४ |
| 11. | हे तर काहीच नाही... | ४७ |
| 12. | ही प्रातःस्मरणीय मुलं... | ५० |
| 13. | कुणीही यावं आणि... | ५३ |
| 14. | एका 'कट्टी'चा किस्सा | ५६ |
| 15. | एक टाळू... एक पोटाळू... | ५९ |

16. आपल्याच मनाची लीला ६२
17. चालणं आणि पोचणं... ६५
18. सुविचारांचे कवडसे ६८
19. जाग येतच नाही.. ७१
20. न झालेली भेट ७४
21. पुनर्वाचन ७७
22. पॅकेज डील ८०
23. समृद्ध तहान... ८३
24. असेही देहदान... ८६
25. अभावाचे असणे ८९
26. परिवर्तन ९२
27. आम्ही खेळतोय..! ९५
28. चौकटी... ९८
29. डी-कोडींग १०१
30. ‘आडोशा’साठी राबणारे हात१०४
31. एक अनाम मैत्र १०७
32. सूर्यास्ताचं आकर्षण ११०
33. पाचवीतले दिवस- ११३

34. गुड न्यूज ११६
35. चंद्र आणि निळा पक्षी ११९
36. ‘तुळसमाय’ १२२
37. सॉरी म्हणण्याचा धडा १२५
38. ही खरी श्रद्धा.. १२८
39. गतकालातिल लेणी १३१
40. एका व्रताचा भावार्थ... १३४
41. निरागस होण्याची मुभा १३७
42. आनंदाची शिकवणी १४०
43. आत्मविश्वासाचं मोल १४३
44. छंद कौतुकाचा... १४६
45. काहीच निरर्थक नसतं.. १४९
46. ज्येष्ठोत्सव १५२
47. मॅरेथॉन १५५
48. गप्पा ग्वाड... १५८
49. एक्स फॅक्टर १६१
50. समारोप नसतोच... १६४

# नव्या संकल्पाची ती आठवण...

“नमस्कार.. नवीन वर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा..!” सकाळी फिरण्याच्या ट्रॅकवर समोरून येणाऱ्या मैत्रिणीनं हातात हात घेत दिलखुलास हसत म्हटलं... मीही नकळत तसाच उत्तेजित प्रतिसाद दिला. तिचा उत्साह माझ्यात संक्रमित झाला होता... पावलं अधिक जोमानं पडायला लागली. घरातून निघताना बरोबर आलेली मरगळ तिथेच गळून पडली. ती स्वतःशी बोलल्यासाखी म्हणाली, नव्या वर्षासाठी मी एक नवा संकल्प केलाय. तू काय ठरवलंयस?...

ही तशी अतीरूढ झालेली, जवळपास प्रत्येकाच्या अनुभवाला येणारी अगदी सामान्य घटना... पण दर वर्षी मला ती आठवते. एखाद्या स्वादिष्ट पदार्थाची चव जिभेवर रेंगाळावी तशी ही आठवण मी मनात रेंगाळत ठेवलीय... कारण मरगळ झटकून ऊर्जा संक्रमित करणारा ‘नवे वर्ष नवा संकल्प..’ हा मंत्र तिनं मला दिला होता.. त्या दिवशी घरी परतताना मीही नव्या संकल्पाविषयी विचार करायला लागले होते.. खरंच नवं काहीतरी घडतंय.. घडायला हवंय असं मला वाटायला लागलं होतं. मी त्या दिशेनं चालायला लागले होते...!

खरंतर नववर्षाच्या स्वागतासाठी रात्री बारा वाजता वाजवल्या जाणाऱ्या फटाक्यांच्या आवाजानं झोपमोड होते. मग रस्त्यातून जल्लोष करत हिंडणाऱ्यांविषयी चीड निर्माण होते.. आणि 'दिवसेंदिवस हे वाढतंच चाललंय..' हा तक्रारीचा सूर पार वरचा सा गाठतो.. मग राहिलेल्या रात्रीच्या झोपेचं खोबरं होतं. आणि नव्या वर्षाचं स्वागत त्रासिक चेहऱ्यानं केलं जातं. मनात येत राहातं, कुठल्याही 'काल'च्या दिवसानंतर उगवणाऱ्या 'आज'सारखाच तर असतो एक जानेवारीचा दिवस. त्याचं काय एवढं स्तोम माजवायचं? पण नव्या संकल्पाची ती आठवण जवळ येते आणि कपाळावरच्या आठ्यांमधल्या या प्रश्नाला गप्प करते...

तसं तर रोजचं जगणं हे स्तोम माजवणंच तर असतं. काय अर्थ असतो अब्जावधींच्या संख्येतली एक व्यक्ती म्हणून जगण्याला? पृथ्वीच्या गोलाचा नकाशा पाहायला लागलं की हे वैयर्थ गडद होतं. आणि खगोलाचा पट डोळ्यांसमोर आणला तर त्या असीमातल्या ब्लॅकहोलमधे नाहीसेच होतो आपण... नगण्यतेला काही सीमाच उरत नाही... पण हे जाणवून देणारे अस्तित्वभान तर जागे असते... मग असीमाचे ओझे उतरवून साजरा करावा लागतो आपल्या इटुकल्या अस्तित्वाचा उत्सव.. संकल्पाचा मंत्र आठवावा लागतो पुन्हा पुन्हा...

भोवतीच्या उन्मादांच्या तळाशी असलेलं बकाल वास्तवही झाकलेलं राहात नाही कितीही आतषबाजी केली तरी.. काही सेकंदांच्या झगमगाटानंतर खाली उरणाऱ्या राखेसारखं... हवेत मुरलेल्या दुर्गंधीसारखं ते जाणिवेला कुरतडत राहातं. अस्वस्थ करतं... ‘स्व’च्या मर्यादा आणि छोट्या छोट्या स्वार्थांचे चिवट मोहही असतातच संकल्पपूर्तीच्या वाटेवर पाय मागे ओढायला... धरलेली उमेद क्षीण व्हायला अशी कैक निमित्तं भेटत राहतात...

नव्या वर्षाचं निमित्त साधून नवी ऊर्जा घेऊन येणारी नव्या संकल्पाची ती आठवण म्हणूनच मी जतन करून ठेवलीय..!

पहाट पावलं- १ जानेवारी २०१८

# चालून आलेली संधी

कुणी येण्याची ती वेळ नव्हती. पण अचानक दार वाजलं. कोण असेल? असा विचार करत दार उघडलं. तर फिरता विक्रेता म्हणून काम करणारी एक बाई दारात होती. दार उघडताच तिनं न थांबता बोलायला सुरुवात केली. न जाणो मी काही नकोय म्हणून दार लावून घेतलं तर? पाठ झालेला मजकूर ती बोलत सुटली. मधे श्वास घ्यायला पण थांबत नाहीशी बोलत होती. थकून थांबली. तोंडाला फेस आल्यासारखा दिसला. पाणी द्यावसं वाटलं. पण जेमतेम दार उघडलं. तिनं विकायला आणलेलं पायपुसणं, फिनेल.. घासाघीस न करता घेतलं. पैसे दिले. ती गेली. दार बंद करून मी कामाला लागले. पण तिचा थकलेला, गरीब चेहरा डोळ्यापुढं तरळत राहिला... मनात काहीतरी सलत राहिलं.

खरं तर मी तिला रागावून काही बोलले नव्हते. तिनं आणलेल्या वस्तू नको असताना, घासाघीस न करता घेतल्या होत्या. सुटे पैसे दिले होते. तक्रार करावी असं काही केलं नव्हतं... पण आजकाल कुणाचं काय सांगता येतं? या भीतीपोटी तिला मी घरात घेतलं नव्हतं. तिला गरज असताना आणि मला ते जाणवलेलं असतानाही पाणी दिलं नव्हतं... वस्तू घेतल्या, घासाघीस केली

नाही, सुटे पैसे दिले कारण मला ती लवकर जायला हवी होती. आता ती गेल्यावर, दार बंद केल्यावर, माझ्या सुरक्षित स्पेसमधला तिचा व्यत्यय दूर झाल्यावर मला माणुसकीच्या गोष्टी सुचत होत्या. माझा विवेक मला टोचणी देत होता. ‘आजकाल कुणाचं काय सांगता येतं?, कुणावर विश्वास ठेवण्याचे दिवस राहिलेले नाहीत..’ ही भीती माणुसकी विसरण्या इतपत खरी होती का?

मनात येत राहिलं, मी तिच्याकडून वस्तू घेतल्या त्यातून तिला दोन पैसे मिळाले असतील. पण मी तिला आत या म्हटलं असतं, विचारपूस केली असती तर पैसे सन्मानानं मिळाल्याचा दिलासा तिला मिळाला असता. माझ्या तुटक वर्तनानं, कितीही सरावली असली तरी तिच्या मनावर ओरखडा उमटलाच असेल. माझं मन तिच्या भोवती फिरू लागलं. ती किती शिकली असेल? तिच्या घरी कोण कोण असेल? कमावतं कोण असेल? की सगळी जबाबदारी तिच्यावरच असेल? पैसे मिळवण्यासाठी ती आणखी किती कष्ट उपसत असेल?...

दारोदारी फिरून वस्तू विकणाऱ्या अशा कितीतरी बाया, मुलं, पुरूष मनासमोरून सरकत गेले आणि बरेच लाइक्स मिळालेला माझाच एक शेर आठवला-

***‘प्रत्येकाचे जगणे असते कथा अनोखी***
***आपुलकीने परंतु कोणी वाचत नाही..!’***

एक चालती बोलती कथा आपण होऊन दारात आली होती. पण स्वतःच्या मर्यादित परिघातून बाहेर पडून, तथाकथित कल्पित भीतीला ओलांडून ती आपुलकीनं वाचायची चालून आलेली संधी मी गमावली...!

पहाटपावलं- ८ जानेवारी २०१८

# निवडुंगासमोर नसतो पर्याय

कार्यालयात माझ्या शेजारी बसणारा माझा कलीग जागेवर नव्हता. कुठेतरी गेला होता. त्याच्याकडे काम असलेला एक ग्राहक बराच वेळ त्याची वाट पाहात होता. वाट पाहून शेवटी मी ग्राहकाला त्याचं काय काम आहे ते विचारलं आणि करून दिलं. ग्राहक निघून गेला. मी माझ्या कामात होते. शेजारचा कलीग आला. माहिती म्हणून मी त्याच्या अनुपस्थितीत काय झालं ते सहज त्याला सांगितलं. मी फार काही केल्याचा जराही आविर्भाव त्यात नव्हता. मला तसं वाटलेलंही नव्हतं. कार्यालयात वेळप्रसंगी एकमेकांची कामं करणं ही अगदी गृहीत गोष्ट आहे. पण मी सांगितलेलं ऐकून औपचारिकता म्हणून धन्यवाद असं काही म्हणण्याऐवजी तो म्हणाला "तुम्हाला कुणी सांगितलं होतं ते करायला?" ही अनपेक्षित प्रतिक्रिया पाहून मी चकित झाले. 'नव्हतं कुणी सांगितलं.. चुकलंच माझं' असं म्हणून मी वाद टाळला..!

तो तसाच होता. फटकन काही तरी विचित्रच बोलायचा. त्याच्या वाट्याला न जाणं काहीजण पसंत करायचे तर काहीजण मुद्दाम वाट्याला जाऊन त्याला उचकवायचे... आपल्या

आजुबाजूला अशी बरीच माणसं असतात. त्यांना समजून घेणं अवघडच असतं. का ऐकून घ्यायचं? हा सरळ साधा मुद्दा असतो. मग वाद वाढत जातात. कधी कधी विकोपाला जातात. लोकांच्या प्रतिक्रियांमुळे विचित्र माणसं आणखी तशीच वागत राहतात. बऱ्याचदा लक्ष वेधण्यासाठी जाणूनबुजून ती तसं वागत राहतात. बाहेर वावरताना थोडा वेळ भेटणाऱ्या अशा माणसांकडे दुर्लक्ष करणं तितकं अवघड नाही. पण अशी व्यक्ती घरातच असेल तर ते नातं निभावणं फार क्लेषकारक होतं..!

अशा व्यक्तीला समजून घेत वाद, संघर्ष टाळणं सोपं नसतं. कसं समजून घ्यायचं हा प्रश्न तर असतोच पण खरा प्रश्न किती समजून घ्यायचं हा आहे. समजून घेण्यातून तेवढ्यापुरते वाद टळतीलही. पण त्यामुळं ती व्यक्ती तसंच वागत राहाते. तिनं बदलणं.. सुधारणं ही प्रक्रियाच सुरू होत नाही. त्यासाठी वेळप्रसंगी त्या व्यक्तीची चूक तिच्या लक्षात आणून देऊन, त्यातून निर्माण होणाऱ्या भांडणाला सामोरं जावं लागतं. त्यामुळं काही प्रमाणात का होईना तिच्यात बदल होऊ शकतात. तिचं व्यक्तीत्व संतुलित होऊ शकतं.

मात्र रंग उंची.. हे माणसाला जन्मजात मिळतं तसे काही स्वभाव-दोषही जन्मजात असतात. त्यात पूर्ण बदल होत नाही.

किती बदल होऊ शकेल आणि काय जन्मजात म्हणून स्वीकारायला हवं यात सीमारेषा आखणं कौशल्याचं काम आहे. पण आत्मीयता आणि थोडं धैर्य असेल तर ते जमू शकतं. मग समजून घेता येतं की वाट्याला आलेल्या बीजातून उगवल्यावर निवडुंगाला शोषून घ्यावा लागतो जमिनीखालचा काटेरी अंधार आणि सजवावे लागते ताठ मानेने मिळालेले रूप... ***निवडुंगासमोर नसतो पर्याय निशिगंध असण्याचा..!***

पहाटपावलं- १५ जानेवारी २०१८

# वाढायचं राहूनच गेलं...

छोट्या मोठ्या कोणत्याही प्रवासात आपण दुसऱ्या वाहनाला ओव्हरटेक करणं किंवा आपल्याला कुणी ओव्हरटेक करणं ही अगदी नेहमी अनुभवाला येणारी सामान्य गोष्ट... असंच एकदा गावाला जात असताना आमच्या एस.टी.नं एका ट्रकला ओव्हरटेक केलं. मी बाहेरचं धावतं दृश्य पाहण्यात रमले होते. सहजच त्या ट्रककडे लक्ष गेलं. एक तरूण मुलगेलासा ड्रायव्हर ट्रक चालवत होता. त्याच्याकडे बघून असं जाणवलं की त्यानं स्टीअरिंगवर बोटानं ताल धरलाय आणि अंगाची मजेदार हलचाल करत त्या तालावर तो गाणं म्हणतोय..! ड्रायव्हिंग एन्जॉय करतोय... ओव्हरटेक करणाऱ्या आमच्या एस टी कडं इतक्या मजेत पाहात त्यानं ‘जाओ जाओ’ असं म्हटलं की वाटलं आमचं ओव्हरटेक करणंही तो एन्जॉय करतोय..! काही क्षणांचं ते दृश्य त्या मुलाच्या मस्त हावभावांसह स्मरणात राहिलं..!

सतत सगळ्याला कंटाळलेली, त्रासलेली, एवढ्या तेवढ्या गोष्टीवरून हमरीतुमरीवर येणारी बरीच माणसं असतात. पण काही माणसं असं सगळं एन्जॉय करणारीही असतात. स्वतः आनंद मिळवणं आणि आपल्या सहज कृतीतून तो दुसऱ्यांना देणं यासाठी

लागणारी जिंदादिल ऊर्जा कुठून येत असेल अशा माणसांमधे? असं वागणं ठरवून आत्मसात करता येईल का?

निसर्गात आपण पाहतो की फांदिवर पान.. फळ.. फूल उगवण्याची जागा किंवा बिंदू ठरलेला असतो. फांदीच्या प्रत्येक बिंदूतून पान उगवत नाही. जिथून उगवतं त्या बिंदूला उचकटून निघावं लागतं फांदितून. वाट करून द्यावी लागते पाना-फुला-फळाला. कोणता असतो हा नव्यानं उगवण्याचा नेमका बिंदू? सलगपणात व्यत्यय आणणारी खूण दिसते ना फांदीवर तिथेच उभा असतो तो मुळांपासून सुरू झालेल्या आंतरिक संघर्षाच्या टोकाशी..!

आपल्यावर अचानक आलेलं संकट, वाट्याला आलेलं दुःख किंवा केली गेलेली टीका म्हणजे असे बिंदू असतात. आपल्या स्थिर आयुष्यात ते व्यत्यय आणतात. आपल्याला अगतिक करतात. बिथरवतात. थांबवतात. पण हाच क्षण असतो सावध व्हायचा. पांना-फुलांसारखं नेमकं तिथूनच फुटून बाहेर पडायचा.. वाढायचा.. बहरायचा.. मनाला फांदीसारख्या मर्यादा नसतात. त्याला मिळेल त्या फटीतून बाहेर पडता येतं. वाढता येतं.. म्हणता येतं की वाढायला नवी दिशा मिळाली. किंवा असंही की अरेच्चा इथून वाढायचं राहूनच गेलं होतं..!

पण हे बोलण्याइतकं सोपं नाही अर्थात. संकटांवर स्वार होणं, दुःख पचवणं किंवा टीकेचा वाढीसाठी सकारात्मक उपयोग करून घेणं कठीण तर आहेच पण मुळात तशी इच्छा असावी लागते. ती असेल उत्कटपणानं आत रुजलेली तर बदलाची प्रक्रिया सुरू होऊ शकते. हे सगळं साध्य करून संतपदाला पोचलेल्या तुकाराम महाराजांचं उदाहरण फार अप्राप्य वाटू शकेल. पण आपल्या कृतीतून सहज आनंद देणाऱ्या काही क्षणांच्या 'त्या' दृश्यातल्या ड्रायव्हरची वृत्ती अंगिकारणं अशक्य नाही..!

पहाटपावलं- २२.१.२०१८

## ‘नटनाट्य तुम्ही केले याच साटी..’

या असीम विश्व-पसाऱ्यात आपल्या नगण्यतेला काही सीमाच नाही ही जाणीव सतत क्षीण होत जाऊन मी म्हणजेच सगळं काही हे वाटणं इतकं ताजं, इतकं खरं होऊन आपल्याला लपेटून बसतं की बस..! पण हे किती बरं आहे ना? मी आहे. मी कोणीतरी विशिष्ठ व्यक्ती आहे. भोवतीचं हे सगळं जग माझ्यासाठी आहे.. असा अहंकार माणसाला आहे. त्यातूनच तर न मागता वाट्याला आलेलं हे बरं वाईट आयुष्य उमेदीनं जगण्याचं बळ त्याला मिळतं..! या अहंकारामुळेच तत्त्वज्ञानाच्या नजरेतून मिथ्या असलेल्या गोष्टी त्याला महत्त्वाच्या वाटतात. त्यासाठी तो आयुष्य पणाला लावतो..! इथल्या साऱ्या निरर्थकाला तर..तम भावानं श्रेष्ठ कनिष्ठतेचे निकष लावत राहातो. प्रत्येकाचे छोटे छोटे अहं एकमेकांना छेद देत राहतात. आपल्यापैकी कुणीच याला अपवाद नाही...

नुकताच एक पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम झाला. घरचं कार्य असल्यासारखा. अध्यक्ष, उद्घाटक, प्रमुख पाहुणे, प्रमुख उपस्थिती... अशा स्थानांसाठी नामवंत लोक बोलावलेले.. ते येईपर्यंत चहा नाश्ता गप्पा... ती मंडळी आल्यावर पत्रिकेनुसार

सत्कार.. भाषणं.. इत्यादी सर्व कार्यक्रम यथासांग पार पडला. एकूण कार्यक्रम तसा छानच झाला. पण त्याचं औपचारिक कौतुक करताना मनात काही सलत राहिलं. वाटलं अशा उत्सवांमुळे कमअस्सल साहित्य लोकांसमोर येतं. त्याचाच गवगवा होतो. मग तेच चांगलं असा समज होऊ शकतो. खरं चांगलं साहित्य अंधारातच राहातं...

पण लगेच असंही वाटलं की आजुबाजूच्या अशा सगळ्या उत्सवांमधल्या मनाला न पटणाऱ्या, न आवडणाऱ्या गोष्टी निर्ममपणानं नाकारायच्या ठरवल्या तर सगळ्यातून निवृत्तच व्हावं लागेल. जगण्यासाठी उमेद बाळगायची तर काही कमअस्सल गोष्टी स्वीकाराव्या लागतात. नाकारण्यात वाइटाबरोबर चांगलंही नाकारलं जातं. आज आहे त्याहून अधिक चांगलं होण्याची शक्यताही नाकारली जाते... आणि एकदम कुठेतरी वाचलेली 'मिथून' कल्पना आठवली. हे दृश्य विश्व म्हणजे शुद्ध आणि हिणकस यांचं जणू एक मिथून आहे...! शुद्ध गोष्ट शुद्ध स्वरूपात 'आकार' घेऊच शकत नाही. कल्पनेतून ती आकारात 'उतरते' तेव्हा हिणकस गोष्टीच तो आकार पेलत असतात. जसं दागिना घडवताना शुद्ध सोन्यात इतर धातू मिसळावे लागतात... शुद्ध आत्मतत्त्वाला व्यक्त होताना मृण्मय देह धारण करावा लागतो..!

आपल्या अवतीभवती घडणाऱ्या गोष्टींकडे पाहताना हे भान असेल तर हिणकस गोष्टींना हिणवण्याऐवजी त्यांचं या एकूण असण्यातलं स्थान समजून घेता येईल. जगण्याच्या असंख्य पातळ्या असतात. आणि त्या त्या पातळीवर तिथल्या जगण्याची शैली समर्थनीय असू शकते. म्हटलं तर सगळं सार्थ.. म्हटलं तर सगळंच निरर्थ..! संत तुकारामांनी एका अभंगात म्हटलंय- ‘नटनाट्य तुम्ही केले याच साटी । कवतुके दृष्टी निववावी ॥ नाही तरी काय कळलेचि आहे वाघ आणि गाय लाकडाची..!’

पहाटपावलं : २९.१.२०१८

# एकटे नसतोच आपण..!

सकाळचे सहा वाजून गेलेत. घड्याळानुसार रात्र केव्हाच संपलीय. म्हणजे खरंतर उजाडायला हवं. पण उजाडलंयसं वाटत नाहीए. उजेड नाहीए पुरेसा. अंधारलेलंच वाटतंय अजून. शंका येऊन दुसरं घड्याळ बघितलं. त्यातही सहा वाजून गेलेत. म्हणजे उजाडायलाच हवं...

आता घरात थांबून चालणार नाही. बाहेर पडलंच पाहिजे. चहा घेतला.. आवरलं.. बूट घातले आणि बाहेर पडले. उजेड गेला तरी कुठे ते पाहावं म्हणून वर बघितलं सहज. आकाशात ढग दिसत नव्हते. अख्ख आकाशच एक मोठ्ठा ढग झालेलं वाटत होतं. पण ते ओथंबलेलं नव्हतं दिसत. नुसतीच एक अगम्य घुसमट ठासून भरलेली होती आत बहुधा. नजरेत मावू शकेल तेवढा आकाशाचा पूर्ण विस्तार त्याच एका अवस्थेनं व्यापलेला वाटत होता. कायम वास्तव्याला आल्यासारखी मख्ख मरगळ भूत-भविष्य गिळून सलग वर्तमान झाली होती....

खुद्द आकाशच आपला उजेड हरवून बसलेलं.. पण याची खंत करायला उसंत नसलेल्या पेपरवाल्यानं घराघरात पेपर टाकायला सुरुवात केली... मनात आलं, आता उजाडल्याची

बातमी मिळताच सगळ्यांना जाग येईल. सारी यंत्रं घरघरायला लागतील. घड्याळाचे काटे सरकत राहातील. त्यानुसार गाड्या धावू लागतील. लोक चढतील... उतरतील.. ऑफिसात पोचतील.. आपापल्या कामाला लागतील सारी. ठरल्यानुसार कॅलेंडरमधला आजचा दिवस सरकत राहील पुढे... आणि ठरलेल्या वेळी ठरलेल्या गोष्टी घडत राहातील...

मीही ठरलेल्या हद्दीपर्यंत जाऊन भोज्याला शिवून परतले. आकाशाच्या मरगळीची दखलही न घेता सगळं मागील पानावरून पुढे चालू होतं... सगळ्यांना आपापली वेळ गाठायची होती. मुक्कामी पोचायचं होतं. पार्श्वभूमीवर काहीही असो. एका स्वयंभू गतीत 'शो मस्ट गो ऑन' हे समजत असल्यासाखी सगळी पात्रं तिच्यापुढून सरकत राहतात...!

रहदारीच्या कडेकडेनं चालताना असं काहीबाही मनात येत होतं. आकाशाची मरगळ वातावरणात झिरपत होती. घरी आल्यावर पेपर उघडला... पहिल्याच पानावर दूर कुठेतरी समुद्रावर वादळ झाल्याची बातमी होती. कुठे कुठे पावसाची शक्यता वर्तवली होती.. म्हणजे सर्वव्यापी आकाशानं प्राशून घेतलं होतं तर ते दूरचं वादळ. आणि आपलं रूप बदलून त्याची वार्ता पोचवली होती आपल्यापर्यंत... सकाळपासूनच्या त्याच्या 'मरगळी'चा हा

संदर्भ लक्षात आल्यावर जाणवलं, किती शर्थीनं रोखलाय त्यानं अवकाळी पाऊस आपल्या आत..!

सकाळपासूनच्या मरगळीच्या विचारातून बाहेर पडले. कामाला लागले. आपल्या अवतीभवती कित्येकदा उसनं अवसान आणून वावरणारी माणसं दिसतात. ती निभावत असतात वाट्याला आलेली आपली कामं. हसून साजरं करत राहतात सगळं. तरी कुठल्या ना कुठल्या फटीतून त्यांच्या आतली घुसमट बाहेर पडतेच. डोकावत राहाते त्यांच्या वागण्या-बोलण्यातून. तीही शर्थीनं रोखत असतील असाच अवकाळी पाऊस आतल्या आत.. आपल्यातलं आकाशतत्त्व असंही आपल्या कामी येतं म्हणायचं..!

किती अतूटपणे जोडलेले असतो आपण यच्चयावत असण्याशी.. जे जे 'आहे' त्या साऱ्याशी..! एकटे नसतोच कधी आपण..!!

पहाटपावलं : ५.२.२०१८

## शब्दांनी सांगितलेली गोष्ट..

त्याला सर्कशीत विदुषकाची नोकरी मिळाली. इतर कसरतींच्या मानानं हे सोपं आहे असं वाटून तो खूष झाला. लहानपणापासून माकडचेष्टा करत उड्या मारायची सवय होती त्याला. त्यासाठी त्याला बोलणी बसायची... पण या नोकरीत तीच त्याची जमेची बाजू ठरली...

ठरल्या तारखेला तो रुजू झाला. त्याला चित्र-विचित्र, रंगीबेरंगी कपडे दिले गेले. पायमोज्यापासून मुखवट्यापर्यंत सगळं होतं त्यात. सर्कशीचा त्याचा पहिला दिवस उजाडला. सगळे आपापल्या पोषाखात सज्ज झाले. त्यानंही सर्व साज अंगावर चढवला. प्रेक्षकांसमोर येण्यापूर्वी आरशात पाहिलं. त्याला हसू आलं. पण ते त्याला दिसलंच नाही. मुखवट्यावर कोरलेलं होतं तेच त्याचं हसू असणार होतं...!

काही दिवस मजेत गेल्यावर त्याच्या लक्षात यायला लागलं की त्याचं असं काहीच दाखवता येत नाहीए त्याला. त्याचं हसणं, तो मारत असलेल्या उड्या, बोलत असलेली वाक्ये... सगळ्याचा बोलविता धनी दुसराच कुणी होता...!

घरात उत्स्फूर्त माकडचेष्टा करणारा तो एकदम शांत, गंभीर झाला. त्याला जाणवलं की अवतीभोवती वावरणारी इतर माणसंही सतत मुखवटे घालूनच तर वावरत असतात. कोणीच खरं, आतून वाटतं तसं वागत नाही. घरात प्रत्येकाशी असलेल्या नात्याच्या भूमिका निभावत राहायचं.. बाहेर कार्यालयात, 'दिलेलं' काम ठरलेल्या नियमांनुसार करायचं.. सहकाऱ्यांशी ठरलेल्या मॅनर्सनुसार वागायचं.. आणि समाजात अनोळखी रूपात वावरायचं...!

आपलं असं काहीच दाखवता येत नाही या जाणिवेनं 'आपलं असं काय आहे?, कोणती कृती आपली स्वतःची आहे असं म्हणता येईल?' याकडं त्याचं लक्ष वेधलं आणि त्याला स्वतःचा परिचय होऊ लागला. तो मग अंतर्मुख होऊन रोज डायरी लिहू लागला... लिहिता लिहिता त्याची शब्दांशी दोस्ती झाली... एके दिवशी त्याला स्तब्ध बसलेला पाहून ते त्याच्या जवळ आले आणि त्याला सांगू लागले जिवाच्या आतली गोष्ट...

'आमच्या उद्गारांच्या शहाण्या-सुरत्या... वेड्या-वाकड्या... श्लील-अश्लील सर्व लेकरांना शांत निजवून रात्रीच्या गडद अंधारात निवांत झोपायचं असतं आम्हाला पण ताऱ्यांच्या लुकलुक

प्रकाशानं हिंदकळत राहतो अंधार.. आम्हाला मग झोपताच येत नाही स्वस्थ....!

मग उघडतो आम्ही आमच्या बंद स्वगतांची दारं. दार उघडताच दशदिशांत कोंदलेली असंख्य रंग-रूपांतली असंख्य अस्फुटे घुसतात दारातून आत... आकाशातल्या गडद शांततेहून अधिक कर्कश, भूगर्भातल्या लाव्ह्याहून अधिक तप्त स्वरात चित्कारतात ती. मोकळं करतात अंतरंग.... तेव्हा ज्वालामुखीत वितळून जातात झाकापाक करणारे आमचे सर्व मुखवटे...

आतले निर्भय राहू पाहणारे आमचे चेहरे मग दीर्घ मोकळा श्वास घेतात...! पण पुरती पहाट व्हायच्या आत सुरू होते पक्ष्यांची किलबिल.. कुहुकुहूची जुगलबंदी... शांत झोपू न शकलेले आम्ही ताडकन उठून बसतो. तारवटलेल्या डोळ्यांनी घाईघाईत शोधू लागतो नवे मुखवटे...! भू-गोलाच्या परिघावरच्या कोणत्याही नव्या दिवसाला सामोरं जाता येत नाही आम्हाला आपल्या अनावृत्त ‘सत्’ रूपात...!’

तो अवाक् झाला शब्दांनी सांगितलेली गोष्ट ऐकून...! शब्दांकडे पाहातच राहिला..!!

पहाटपावलं- १२.२.२०१८

# माझं दैनिक

स्वतःशी रोज नव्यानं संवाद करणारं एक दैनिक चालवतेय मी केव्हापासून. याची संपादक लेखक मुद्रक प्रकाशक आणि वाचक सर्वकाही मीच आहे. या दैनिकाचं नाव आहे रोजनिशी... या अंतर्मुख स्वसंवादात नुकत्याच घडलेल्या, सलत राहिलेल्या एखाद्या घटनेसंदर्भात स्वतःचीच उलटतपासणी घेतली जाते. स्वतःला धारेवर धरत आत्मपरिक्षण केलं जातं. त्यातून स्वतःच्या मर्यादा स्पष्ट होतात. काय करता आलं असतं असा विचार होतो... या प्रकियेत नकळत स्व-समुपदेशन होत राहातं. या रोजनिशीत माझ्या घाबरटपणाचा मी बऱ्याचदा समाचार घेतलाय. त्या अनुषंगानं भीती म्हणजे काय? ती का वाटते? नेमकी कशाची असते ती? असा विचार होत राहिला. भीती वाटते त्याअर्थी माणसात या भावनेचे हेतूपूर्वक नियोजन झाले असणार... काय असेल तो हेतू? भीती अगदीच कुचकामी असणार नाही.. माणसाला सावध, सतर्क करणं ही तिची सकारात्मक भूमिका असणार.. असा काय काय विचार करून स्वतःला समजावलं तरी भीती आणि ती वाटण्याचा त्रास यातून सुटका होईना..! सदानकदा ही आपली हजर..! अजून पाऊस नाही.... तल्खी शिगेला पोचलीय.. म्हणून भीती.. आभाळ

भरून आलंय.. वादळ.. विजांची लक्षणं दिसतायत.. भीती हजर..! मग तिच्या पाठोपाठ अख्खी प्रश्नावली आणि तिचं शेपुट असलेली खंत... या संदर्भातल्या विचारांच्या रियाजामुळं एकदा भीतीनंतरची ही जुनी प्रतिक्रिया बदलली... एकदम वाटलं की ही भीती माझी नाही..! 'ही माझी नाही' या वाटण्यामुळं नंतरचं नेहमीचं आवर्तन थांबलं... तिला थारा न मिळाल्यामुळं ती आली तशी निघून गेली..! अर्थात यामुळं भीतीतून कायमची सुटका झाली असं नाही. पण भीतीशी किंवा कुठल्याही आंतरिक शत्रूशी कसं वागायचं ते त्यावेळच्या 'समुपदेशना'त समजलं..!

आपल्या अवतीभोवती बरंच काही घडत असतं. चहुकडून अंगावर धावून येणाऱ्या जगभरातल्या बातम्या एका स्तरावर आपल्याला हैराण करत असतात. बाह्य वास्तवाला तोंड देतादेता हताश व्हायला होतं. कुठेतरी काहीतरी घडतं आणि लोक रस्त्यावर येऊन पिसाटल्यासारखे तोडफोड करत सुटतात... आपल्या गल्लीत.. कॉलनीत.. शेजारी.. अगदी घरातही वेगवेगळ्या कारणांनी वेगवेगळ्या प्रकारे अशी 'तोडफोड' होत असते... आपण या सगळ्याशी अविभाज्यपणे जोडलेले असतो. या सर्व बाह्य वास्तवाचे पडसाद आपल्या आत उमटत राहतात. ते आतली व्यवस्था विस्कटून टाकतात. आपल्या विवेकावर आघात करतात.

ही गुंतागुंत आपल्याला गोंधळवते. काय करावं हे सुचेनासं होऊन जातं...

बाहेरची कुठलीच 'तोडफोड' रोखणं आपल्या हातात नाही. पण आपण आपल्या आतली 'तोडफोड' रोखू शकतो. त्यासाठी स्व-समुपदेशन साधणाऱ्या रोजनिशीचा उपाय करता येण्यासारखा आहे. मनातल्या मनात स्वतःशी झुंजत.. चरफडत बसण्यानं नुसतीच दमछाक होते. सकारात्मक काहीच घडत नाही. त्याऐवजी मनातली निःशब्द बडबड शब्दात मांडत गेलं तर गुंता सुटत जाईल. घुसमटीतून बाहेर पडण्याचा मार्ग दिसायला लागेल... आपण स्वस्थ झालो तर बाहेरची 'तोडफोड' रोखण्यासाठीही आपण काहीतरी करू शकू...

पहाटपावलं : १९.२.२०१८

# मोरपीस मिळण्याचे ठिकाण

आपली सगळी स्वप्नं तिनं जिद्दीनं पुरी केली. स्वतःच्या हिमतीवर एक प्रशस्त टेरेसफ्लॅट विकत घेतला... आता निवृत्त झाल्यावर टेरेसगार्डनमधल्या झोपाळ्यावर बसून निसर्गाच्या सान्निध्यात ती निवांत अनुभवतेय मनाची कृतार्थ अवस्था... कधी ती घेऊन बसते वाचायची राहून गेलेली महत्त्वाची पुस्तकं... कधी ऐकत राहाते जुनी गाणी. कधी लिहीत बसते... तिथं बसलेली असताना रोज ठराविक वेळी तिच्या कानावर पडतात कॉलनीतल्या बायकांनी गायलेल्या भजनाचे स्वर... एकदा पुस्तक बाजूला ठेवून लक्षपूर्वक ऐकले तिनं त्या स्वरांमधे अडखळत उमटणारे शब्द-

‘झाले भोजन अंबे आता
तांबुल घेऊन आले
या देहाचे पिकले पान
त्याचसाठी खुडले...’

कितीतरी वेळ या ओळींमधला आशय तिच्या मनात रेंगाळत राहिला. तिला वाटलं किती कृतार्थ भाव आहे या गाण्यात.. भोजन झाले आहे म्हणून आता विडा घेऊन देवीकडे निघालेली ही

श्रद्धाळू गृहिणी मनःपूत जगून झाल्यासारखी म्हणते आहे की या विड्यासाठी मी माझ्या देहाचेच पिकले पान खुडले आहे...! तिच्या मनात आलं, ‘झाले भोजन...’ असं म्हणण्यामधली सार्थ तृप्ती खरंच लाभली असेल का हे गाणं म्हणणाऱ्या या बायकांना? किती मनापासून आळवतायत त्या हे गाणं..!

ती अंतर्मुख झाली. तिला आठवत राहिलं... नात्यांच्या गुंत्यात अडकलेल्या, नवऱ्याशी जमवून घेणाऱ्या, मुलांची उद्धट बोलणी ऐकून घेणाऱ्या, जेवणा-खाण्यात.. कपड्या-लत्त्यात.. भांड्या-कुंड्यात वर्षंच्यावर्षं घालवणाऱ्या.. या बायकांच्या कळपातून ती जाणीवपूर्वक बाहेर पडली होती. तरी तेव्हाही तिला जाणवत होतं की त्या शहाण्या आहेत. गुंत्यात राहून हवं ते कसं मिळवायचं ते त्यांना चांगलं माहिती आहे... त्यांना कळतं की झिरपू द्यायचे नसतात घरात.. रस्त्यात.. बसमधे बसणारे धक्के त्वचेच्या आत. त्या प्रत्युत्तरं देत नाहीत प्रत्येक प्रश्नाला... आतल्या समुद्राची गाज ऐकू येते त्यांना मधूनमधून. उसळत्या लाटांबरोबर बाहेर फेकल्या गेलेल्या माशांची तडफडही दिसते एखाद्या एकट्या तिन्हिसांजेला. पण त्यामुळे त्यांची दिनचर्या विस्कटत नाही. तडफड ओलांडून त्या पुढे जातात. आणि बुडवून टाकतात कामात सगळी उसंत. तगमगीला बाहेर पडायला फटही ठेवत नाहीत. त्या समजून घेतात सामान्यांचा निरुपाय. आणि वाहाते ठेवतात दिवस...

याच अंतर्मुख विचारात ती वरून पाहात राहिली भजन संपवून हसत.. गप्पा मारत परतणाऱ्या बायकांच्या घोळक्याकडे. त्यांचं लक्षही नव्हतं तिनं तळहातावरच्या फोडासारख्या जपलेल्या तिच्या स्वत्वाकडे !. साधा ओरखडाही उमटू नये त्यावर म्हणून किती आकांत केला होता तिनं.. आयुष्याशी शर्थीने लढून स्वतःच्या अटींवर कमावले होते हवे ते सारे.. त्यासाठी स्वेच्छेनं मोजली होती चौकटीबाहेरची किंमत..!

आज त्यांच्याकडे पाहताना तिला वाटले आपल्यापेक्षा वेगळ्या शर्थीने त्यांनीही मिळवले आहे त्यांना हवे ते.. त्यासाठी मोजली असेल त्यांनी चौकटीच्या आतली किंमत. त्याच्या बदल्यात त्यांना सापडले आहे मोरपीस मिळण्याचे ठिकाण..! तिच्यातल्या प्रगल्भतेला आज समजून घेता आले त्यांच्या कृतार्थतेतले वेगळेपण..!

पहाटपावलं- २६.२.२०१८

# एक मिटलेली कविता...

आम्ही नागपूरहून परतत होतो. रेल्वेच्या वेळेआधी आर्धा तास स्टेशनवर पोचलो. वेटिंगरूममध्ये सामान ठेवले आणि थोडा वेळ इकडे तिकडे करून रिकामी सीट पाहून गाडीची वाट पाहात बसून राहिलो. जरा वेळ गप्पा झाल्या. मग घड्याळाकडे, समोरच्या टीव्ही-स्क्रीनकडे लक्ष जायला लागले. आमची गाडी राइट टाईम होती. पण प्लॅटफॉर्म नंबर दिसत नव्हता. गाडीची वेळ होत आली. सर्वांची चुळबुळ सुरू झाली. अंदाज घेण्यासाठी बाहेर फेऱ्या सुरू झाल्या... थोड्या प्रतीक्षेनंतर समजलं की गाडी अर्धा तास लेट आहे. वैतागाचा पहिला आवेग ओसरल्यावर सगळे स्थिरस्थावर झाले. चहा कॉफीचे मग्ज आत यायला लागले. आजुबाजूच्या प्रवाशांशी बोलणं सुरू झालं...

आम्ही वेटिंगरूममध्ये आल्यानंतर दहा पंधरा मिनिटांनी एक बाई तिथं आली होती. तिचं बरंच सामान होतं. एक मुलगा पोचवायला आला होता. सामान ठेवून तो निघून गेला. ही खुर्चीवर न बसता बॅगांवर हात ठेवून खालीच बसली होती. आल्याबरोबर बॅगेतून एक मोठं इंग्रजी पुस्तक काढून ती ते वाचत होती. गाडी लेट आहे हे कळल्यावर तिच्याकडं माझं लक्ष गेलं... बांधाबांध

केलेल्या सामानाच्या गराड्यात पाय जवळ घेऊन बसलेली ती एखाद्या बंद होल्डॉलसारखी दिसत होती. ती पुस्तक वाचतेय... पण केव्हापासून तिनं पान उलटलेलं दिसलं नव्हतं... तिचा चेहराही कोरा वाटत होता. जरा धीर करून सहज विचारलं, 'कोणतं पुस्तक वाचताय?' तिनं पुस्तक मिटून कव्हर दाखवलं. 'अबाउट भगवद् गीता..' असं काहीतरी नाव होतं. तिनं पुस्तक हातात दिलं. जरा चाळून मी ते परत केलं. पुस्तकापेक्षा तिच्याविषयीच जाणून घ्यायची उत्सुकता वाटत होती. पण तिनं परत पुस्तकात डोकं घातलं. 'कुठे निघालायत?' मी दुसरा प्रश्न विचारला. तिनं नुसतं वर बघितलं.... वाटलं, तिची व्याकुळ नजर भूतकाळाची पानं उलटत भिरभिरतेय भविष्यकाळाच्या पोकळीत... समोरच्या स्क्रीनवर गाडी लेट होत असल्याचे आकडे बदलत राहिले. आमची अस्वस्थता वाढत होती. पण ती स्वस्थ बसून होती. जणू ती गाडीची वाट पाहातच नव्हती. मनावर दगड ठेवून कशाचा तरी शेवट करून आल्यासारखी नव्या अनोळखी प्रारंभाच्या प्रतीक्षेत बसून होती ती...!

तिच्याशी काही बोलावं म्हणून मी परत तिच्याकडं बघितलं.. पुस्तकातून डोकं काढून तिनंही माझ्याकडं पाहिलं. तिला काय वाटलं कोणजाणे बॅग उघडून तिनं एक बारकसं पुस्तक काढलं. मला देत म्हणाली, 'माझ्या कविता आहेत.' मी पाहातच

राहिले... काही बोलणार इतक्यात आमची गाडी येत असल्याचं समजलं. आम्ही सामान घेऊन घाईघाईनं बाहेर पडलो... पुन्हा पुन्हा मी मागं वळून पाहिलं. ती जराही हलली नव्हती..

धाडधाड करत गाडी आली. लागली.. सुटलीही... पण मन अजून तिच्यापाशीच रेंगाळत होतं.. माझ्या हातात तिच्या कविता होत्या.. पण एक मिटलेली कविता वेटिंगरूममध्येच राहिली होती.. कोणजाणे कुठल्या रसिकाच्या प्रतीक्षेत..!

पहाटपावलं- ५ मार्च २०१८

# हे तर काहीच नाही...

‘आमच्याकडे एवढी थंडी असते की नळातून बर्फच येतं...’, ‘हे तर काहीच नाही... आमच्याकडे एवढी थंडी असते की म्हशीची धार काढायला लागलं तर कुल्फ्याच बाहेर येतात...’... फारसं लॉजिक नसलेले असे विनोद कल्पकतेचे नमुने असतात. सध्या ऑनलाईन चॅटिंगचा जमाना आहे. असे कितीतरी विनोद पदरची भर घालून इकडून तिकडे फिरत असतात...

पण मित्र-मैत्रिणी किंवा बहीण-भाऊ एकत्र येऊन प्रत्यक्ष गप्पा मारण्यातली मजा काही वेगळीच असते. इथं हातावर टाळी देऊन सहमती दर्शवता येते.. एखाद्या विनोदावर एकत्र मिळून खळखळून हसता येतं.. अशा गप्पांमधेही ‘हे तर काहीच नाही’ टाईप किस्से हमखास सांगितले जातात.. एकाचं ऐकत असताना दुसऱ्याच्या मनात त्याचा तसाच अनुभव हजर होतो.. आणि मग अनुभवांची जुगलबंदी सुरू होते...

एकदा एकजण सांगत होता... ‘आठवड्याची भाजी घ्यायला एका रविवारी मी मंडईत गेलो होतो. घाईघाईत स्कुटर लावली आणि आत गेलो. चार ठिकाणी हिंडून, नीट बघून भाजी खरेदी केली आणि परत गाडीजवळ आलो. किल्लीसाठी खिशात हात

घातला तर किल्ली नाही. चरकलो. पुन्हा पुन्हा सगळे खिसे तपासले. सापडेना. हवालदिल झालो. तेवढ्यात शेजारच्या दुकानातला एक माणूस आला. किल्ली माझ्या हातात ठेवत म्हणाला, तुम्ही गाडी लॉक न करता किल्ली गाडीला तशीच ठेवून गेलात हे मी पाहिलं होतं. गाडी लॉक करून किल्ली मी जवळ ठेवली होती. तुम्हाला किल्ली शोधताना पाहिलं आणि आणून दिली....'

पुढचं काही ऐकायच्या आत दुसरा म्हणाला, अरे हे तर काहीच नाही. मी तर लॉकरमधे ठेवण्यासाठी दागिने घेऊन बँकेत गेलो होतो. हातातले सामान तिथे एका मित्राजवळ दिले. लॉकरची किल्ली आणि दागिन्यांची पर्स घेऊन आत जाणार होतो तर दागिन्यांची पर्सच नाही... हादरलो. पर्स आणि इतर वस्तू स्कुटरच्या समोरच्या डिकीत ठेवल्या होत्या. आत येताना पर्स तिथेच राहिली की काय..? धावत बाहेर आलो. स्कुटर भर रस्त्यावर लावलेली. गाडीजवळ येऊन बघतो तर चक्क पर्स डिकीत अगदी सुरक्षित होती...!

'हे तर काहीच नाही..' म्हणत असे एकेक अनुभव त्या दिवशी गोळा व्हायला लागले. कुणाला रिक्षेवाल्यानं रिक्षात राहिलेली ऑफिस-बॅग आणून दिली होती तर कुणाला चुकून रद्दीत गेलेली

महत्त्वाची कागदपत्रं रद्दीवाल्याकडून परत मिळाली होती. कुणाला बसमधे पडलेलं घड्याळ बस-डेपोत जमा केलेलं मिळालं तर कुणाच्या वाट चुकलेल्या वृद्ध वडलांना कुणीतरी सुखरूप घरी आणून सोडलं होतं... एकेक करत प्रवासात.. आजारपणात.. पूर-त्सुनामी, भूकंपासारख्या संकटात अनपेक्षित मिळालेल्या मदतीचेही कितीतरी किस्से जमा झाले.... गप्पा चांगल्याच रंगल्या. घड्याळाकडे लक्ष गेल्यावर सगळे भानावर आले. भेटू परत असं म्हणत गप्पा संपवून परतताना प्रत्येकाला असे आणखी कितीतरी अनुभव आठवत राहिले आणि मनात जागलेली ‘अजूनही जग किती चांगलं आहे’ ही भावना जपून ठेवाविशी वाटली..!

पहाटपावलं- १२.३.२०१८

## ही प्रातःस्मरणीय मुलं...

एके दिवशी बाल्कनीत बसून चहा पित होते. अजून पेपर कसा आला नाही.. असं मनात येतंय तोपर्यंत पेपर समोर येऊन पडला. मी उठून खाली पाहिलं. पेपर वर टाकून वर्तमानपत्रांचे गठ्ठे सायकलीला लावून चाललेली एकदोन मुलं दिसली... काही मुलं दुधाच्या पिशव्या घेऊन येत-जात होती. काही गाडी पुसत होती. पेपर यायला जरासा उशीर झाला तर लगेच तो न आल्याची जाणीव झाली.. एरव्ही आपण उठायच्या आधी बाल्कनीतून उडी मारून पेपर आत आलेला असतो. दाराला अडकवलेल्या पिशवित दूध येऊन पडते. आवरून फिरायला बाहेर पडेपर्यंत गाडी स्वच्छ पुसलेली असते... पण हे सारं बिनबोभाट करणारी मुलं क्वचितच नजरेला पडतात. गोष्टी वेळच्यावेळी घडतात तोपर्यंत त्यांचं अस्तित्वही जाणवत नाही. बाल्कनीत उभं राहून त्या लगबग करणाऱ्या मुलांकडं पाहताना मनात आलं... ही मुलं किती प्रसन्नपणे आपला दिवस सुरू करून देत असतात. थंडी वारा पाऊस... काही असो पायांना भिंगऱ्या लावल्यासारखी पहाटेपासून भिरभिरत असतात ती. त्यांचे हात सुकाणूंसारखे वळवत राहतात त्यांचा दिवस... ठरल्यानुसार एकेका घरी ती पेपर.. दूध.. टाकत

जातात.. त्यांना कधी सुट्टी असत नाही. ती कधी संप पुकारत नाहीत. कॉम्प्युटरमधे फीड केलेल्या प्रोग्रॅमसारखा आखलेला असतो त्यांचा दिवस. ती उठतात आणि गतीचं बोट पकडून कामाला लागतात...

वाटलं, भोवती किती काय काय घडत असतं त्यानं ती बिथरत नसतील का? की पेपरमधून घराघरात वाटून टाकत असतील सर्वदूर पसरलेले सर्व अन्याय.. भ्रष्टाचार.. दंगली.. तोडफोड.. असंख्य जाहिरातींमधले उन्माद...? कशी सोडवत असतील ती बाहेरचा वेग आणि आतले आवेग यांचं गणित?.. त्यांच्या रक्तदाबाला उसंत असत नसेल वरखालीचे नखरे करायला.. जगण्याच्या अरुंद रस्त्यावरून धावताना त्यांचं हृदय धडधडत असेल निमूट शरीराच्या नियमांनुसार.... त्यांच्या देहबोलीवरून वाटत नाही की कधी ती अगतिक होत असतील..!

आपला दिवस सुरू करून देणारी ही प्रातःस्मरणीय मुलं पाहून छोटी छोटी कामं करणाऱ्या अशा अनेक माणसांचा विचार मनात पिंगा घालायला लागला. रोज घरी येणारी घरकाम करणारी बाई, जिने झाडून ओला सुका कचरा घेऊन जाणारा माणूस, रोज ठराविक ठिकाणी बसणारी भाजीवाली, प्लंबिंग, लाईटची किरकोळ कामं करणारी मुलं... ही सगळी साधीसुधी माणसं आपल्या कितीतरी

गरजा भागवत असतात. आपलं रोजचं जगणं सुरळीत करत असतात. राजकारण.. समाजकारणातल्या विविध वादांपासून, आजुबाजूला घडणाऱ्या समाजविघातक ‘ऐतिहासिक’ वाटणाऱ्या घटनांपासून चार हात दूर असतात. होता होईल तेवढं ती परिस्थितीशी जमवून घेतात. सहसा रस्त्यावर येत नाहीत. पण ती ‘निष्क्रीय’ असतात असं मात्र नाही. समाजस्वास्थ्य टिकवून ठेवण्याचं मोठं काम त्यांच्याही नकळत ती करत असतात...!

बाल्कनीतून त्यांच्याकडं पाहताना वाटलं, ही पृथ्वी केवळ गुरुत्वाकर्षणाच्या आधारावर नाही, जगभरातल्या अशा साध्या माणसांच्या अविचल जिजीविषेवर तोल सावरत फिरते आहे..!

पहाटपावलं : १९.३.२०१८

# कुणीही यावं आणि...

गाडी दहा मिनिटं थांबेल म्हणत कंडक्टर उतरला. सर्वांबरोबर मीही उतरले. गाडीत बसून खाता येईल म्हणून एस.टी. कँटीनमधून बिस्किटपुडा घेतला. पैसे दिले आणि पुडा उघडून द्या म्हटलं. पुड्याच्या दोन बाजूना धरून जरा ओढल्यावर पुडा उघडला... पुडा घेऊन गाडीत आल्यावर त्यानं तो इतक्या सहज कसा उघडला असेल ते पाहिलं. कात्रीशिवाय सहज उघडता येईल अशा पद्धतीनं पॅकिंग केलेलं दिसलं... त्या छोट्याशा अनुभवानं मला बऱ्याच गोष्टी जोर न लावता सहज उघडता येतात हे शिकवलं. औषधांच्या, खाद्यपदार्थांच्या बाटल्या, डबे, पॉउच.. जरा नीट पाहिलं की उघडायचं कसं ते समजतं... शिकण्यासाठी आपलं मन खुलं ठेवलं की मग वस्तूच काय मिटलेली मनं, नातीही फार जोर न लावता उघडता येतात...

आमच्या घरासमोर एक मैदान आहे. तिथेच मुलींची शाळा आहे. हॉस्टेलही आहे. सकाळी कधीकधी तिथे फिरायला जाते. मुलीही फेऱ्या मारत असतात, खेळत असतात... तिथं एक मोठं वडाचं झाड आहे. त्याला पार बांधलेला आहे. काही मुली तिथं बसून अभ्यास करत असतात... एकदा फिरत असताना दुरून

दिसलं की त्या झाडाखालच्या एका दगडावर एक छोटं निळं कुत्रं बसलंय... आश्चर्यानं माझी नजर तिथंच खिळून राहिली. कुत्रं निळं कसं असेल? तिथं कुठून आलं असेल? विचार करत घाईघाईनं झाडाजवळ गेले. बघितलं तर ते एका मुलीचं दप्तर होतं..! माझं मलाच हसू आलं. दुरून ते अगदी कुत्रंच वाटत होतं... स्वतःशी हसत मी चालत राहिले. मनात आलं, दुरून अक्षरशः काहीही वाटू शकतं.. गैरसमज असेच होत असतील. त्यातून केवढी भांडणं.. दुरावे... वेळीच घटनेच्या, माणसांच्या जवळ जाऊन समजून घेतलं तर खरं काय ते कळू शकेल... पुढलं सगळं वादळ टळू शकेल...! वाटलं, त्या दगडावर कुत्रं नाही.. दप्तरही नाही.. एक शहाणपण होतं. कुणीही यावं आणि उचलून न्यावं इतकं असुरक्षित..! परत येताना मी ते उचलून आणलं होतं..

कित्येक अनुभव असे छोटे, किरकोळच आसतात पण ते थोडं थोडं शहाणपण देऊन जातात. कधी कधी वाचलेल्या पुस्तकातला एखादा प्रसंग, एखादी ओळ किंवा एखादा शब्दही कायम स्मरणात राहतो आणि ऐनवेळी आधार देतो. गौरी देशपांडे यांच्या 'तेरुओ आणि काही दूरपर्यंत' या बऱ्याच वर्षांपूर्वी वाचलेल्या पुस्तकातल्या तेरुओच्या तोंडचं 'लेटीट् बी' असंच माझ्या स्मरणात राहिलंय. कथेतल्या 'लेटीट् बी'चा संदर्भ एका नात्यापुरता आहे.. पण 'आहे तसा स्वीकार' हा त्यातून मिळालेला

दृष्टिकोन मला कुठेही उपयोगी पडतो. वैयक्तिक जगण्यात घडून गेलेली एखादी गोष्ट आपल्याला कुरतडत असेल तेव्हा त्या कुरतडीतून बाहेर पडण्यासाठी कथानकाचा संदर्भ सोडून ते 'लेटीट् बी' माझ्या मदतीला येतं. 'असूदे..' म्हणून स्वस्थ होता येतं...! छोटे प्रश्न.. छोट्या सुटका.. छोटे अनुभव.. आणि 'कुणीही यावं.. उचलून न्यावं' असं छोटं शहाणपण..!

पहाटपावलं : २६.३.२०१८

# एका ‘कट्टी’चा किस्सा

बऱ्याच दिवसांनी एक स्नेही सहकुटुंब घरी आले होते. चहापाणी झालं. गप्पा सुरू झाल्या. एकेक विषय निघत गेला... गोष्टी घडून जातात. विसरून जातात. काही गोष्टी मात्र त्यातल्या उत्कटतेसह कायम स्मरणात राहतात. असाच एक किस्सा अगदी आत्ता अनुभवत असल्यासारखा ते सांगत होते...

“ते एक सज्जन गृहस्थ. आमच्या पूर्ण कुटुंबाचे स्नेही. कधी या भागात आले की घरी डोकवायचे. आणि दिलखुलास गप्पा मारून निघताना हमखास विचारायचे, बाजारातून काही आणायचंय का? मग काही असेल तर आई सांगायची. हवी ती वस्तू हवी त्या वेळेला ते आणून द्यायचे. एकदा असंच झालं... सांगितलं त्यानुसार ते औषधं घेऊन आले. औषधं आईच्या ताब्यात दिली. आईनं पैसे दिले. म्हणाली ‘बसा, चहा ठेवते’. पण न बसता ‘आता नको, पुन्हा येतो’ म्हणत ते घाईघाईनं जायला लागले. आग्रह करूनही थांबेनात. मला भयंकर संताप आला. मी रागावून जोरात म्हणालो, ‘कोण समजता तुम्ही स्वतःला?... थांबायला एवढाही वेळ होत नसेल तर येत जाऊ नका आमच्या घरी..’ आणखी काय काय बोलून गेलो कोणजाणे.. माझा अवतार

पाहून ते थांबले. मग चहा झाला. ते आईशी बोलत राहिले. मी धुमसत राहिलो. मी जरा शांत झाल्यावर आईचा निरोप घेऊन ते निघाले माझ्याकडे न बघता.. माझ्याशी न बोलता...! जाताना त्यांच्या डोळ्यात पाणी तरळल्यासारखं वाटलं. नेहमीप्रमाणे मी दारापर्यंत गेलो नाही. सॉरीही म्हटलं नाही. मला राग आला होता आणि तो चुकीचा आहे असं मला वाटत नव्हतं. पण मीही आतून कासावीस झालो होतो... नंतर ते घरी येईनासे झाले. फोनवरचं बोलणंही बंद झालं. माझी कासाविशी वाढत राहिली. लहानपणाच्या कट्टीपेक्षा ही कट्टी जीवघेणी होती... बरेच दिवस सलत रहिली ती. नंतर आईच्या पाठपुराव्यामुळं ती सुटली आणि आमचा स्नेह पूर्ववत झाला...!'

'एवढे का रागावलात पण तुम्ही?' मी न राहवून विचारलं.

'अहो, त्यांनी एवढं करायचं आमच्यासाठी आणि साधा चहा देण्याचं समाधान आम्हाला मिळू द्यायचं नाही म्हणजे काय? नेहमीचं होतं हे त्यांचं. एखाद्यानं नुसतं द्यायचं. घ्यायचं नाही काही... असा एकतर्फी चांगुलपणा नाही आवडत मला. बरेच दिवस मनात साठलेलं त्यादिवशी अनावरपणे बाहेर पडलं माझ्या तोंडून...' हे सांगतानाही तेव्हाचं धुमसणं त्यांच्या आवाजातून जाणवत होतं...!

एखाद्याच्या चांगुलपणाविषयी एवढा अनावर राग का यावा? विचारात पाडणारी गोष्ट आहे... वेगवेगळ्या तऱ्हांनी चांगल्या माणसांचा दुस्वास करणारी माणसं आपण पाहतो अवतीभोवती. अधिक चांगुलपणा बऱ्याचजणांना समजत नाही, पचत नाही, अवलंबता येत नाही. सहन होत नाही.. मग रागाच्या प्रतिक्रिया कमी अधिक तीव्रतेनं उमटतात. 'गांधी' चित्रपटात हत्याकांड थांबवावं म्हणून उपोषण करणाऱ्या गांधीजींच्या अंगावर रागानं ब्रेडचा तुकडा फेकून रडणारा माणूस आठवला.. आणि पाठोपाठ अशा रागाला बळी पडलेले जगभरातले अनेक संत.. महात्मे.. स्मृतिपटलावर तरळले..!

पहाटपावलं : २.४.२०१८

# एक टाळू... एक पोटाळू...

नात्यातल्या एका लग्नासाठी परगावी गेले होते. एक-दोन दिवस राहाणं पडलं. लग्नघर म्हणजे पाहुण्यांची गर्दी.. कामंही भरपूर... त्या घरात वयस्कर सासूबाई होत्या. आणि जाऊबाई मदतीला आलेल्या होत्या. सासूबाईंच्या आदेशानुसार त्या एकेका कामाचा उरका पाडत होत्या... आणि यजमानीणबाई आल्या-गेल्यांचं स्वागत, चहापाणी बघत होत्या. त्यांचं हसत खेळत गप्पा मारत, आलेल्यांवर इंप्रेशन पाडत लग्न एंन्जॉय करणं चालू होतं. आतल्या कामांकडे सोयीस्कर दुर्लक्ष चाललं होतं. जाऊबाईंचा कामानं पिट्टया पडत होता. पण त्या सगळं हसतमुखानं पार पाडत होत्या. घरचं लग्न असून एक छान मिरवतेय आणि एक राबतेय... हे दृश्य आलेल्या बायकांना खटकत होतं. सासूबाईंना तर सगळं दिसतंच होतं. नेहमीचंच म्हणून त्या गप्प होत्या. पण कुणीतरी या विषयी बोलून दाखवलं तेव्हा मात्र त्या जोरात म्हणाल्या, अगं एक टाळू आणि एक पोटाळू म्हटल्यावर असंच होणार..! सासूबाईंच्या या चिडचिड्या उद्गारात दोघींविषयीची नाराजी स्पष्ट जाणवत होती...

या घटनेला बरीच वर्षे झाली. पण त्या लग्नघरातल्या एकूण पार्श्वभूमीवर सासूबाईंनी आपला राग व्यक्त करण्यासाठी वापरलेली ती म्हण माझ्या चांगलीच लक्षात राहिली. अशा टाळू आणि पोटाळू माणसांच्या जोड्या आपल्याला सर्रास पाहायला मिळतात. टाळू माणसं पोटाळूंच्या चांगुलपणाचा फायदा घेतायत हे पाहतांना टाळू वृत्तीचा राग येतो आणि पोटाळूंना सहानुभूती मिळते. पण यात दोघांचं चुकत असतं. कुणी कामचुकारपणा करू नये. पण एखाद्यानं इतकंही कामसू असू नये की त्यामुळं दुसरं कुणी अधिक कामचुकार होत जाईल... घरातली जबाबदारी घेण्याबाबतीतही असं घडतं. एक मुलगा जबाबदारी ओळखून तत्परतेनं काम करत असेल तर दुसरा मुलगा हळूहळू अंग काढून घेण्याच्या प्रवृत्तीचा बनत जातो. 'टाळू'ना काम करणं, जबाबदारी घेणं भाग पडायला हवं. अंगावर पडलं की केलं जातं. स्वतः जबाबदारीनं काम करण्यापेक्षा दुसऱ्याकडून ते करवून घेणं अवघड आहे. पण 'टाळू' व्यक्तीनं जबाबदार, कामसू व्हायला हवं असेल तर 'पोटाळू'नी सजग राहायला हवं.

बरेचदा असा विचार मनात येतो की ज्याप्रमाणे श्रीमंत लोक अधिक श्रीमंत होत जातात तेव्हा कुणीतरी अधिक गरीब होत असतं.. तसं चांगुलपणाचं, सद्गुणांचंही होत असेल का? चांगली माणसं प्रयत्नपूर्वक अधिकाधिक उन्नत होण्याचा प्रयत्न करतात.

लौकिक जीवनात जसं एखादं यश मिळालं की उत्साह आणि आत्मविश्वास वाढतो. त्या सकारात्मक ऊर्जेतून कृतीशीलता आणि त्यातून आणखी यश... तसंच आंतरिक प्रगतीचंही आहे. या बाबतीत प्रयत्नशील असलेली व्यक्ती जाणीवपूर्वक आपल्या स्वभाव-दोषांवर मात करत राहाते. आपल्यातील नको ते ते सर्व बाहेर टाकण्याचा प्रयत्न करते. कमकुवत मनांमधे हे सारं शोषलं जात असेल का? घर स्वच्छ करताना कचरा बाहेर टाकला जातो. घर स्वच्छ होते. पण कचरा जिथे 'स्वीकारला' जातो ती जागा अधिकाधिक घाण होत जाते... असं काही मानसिक पातळीवर घडत असेल का?

पहाटपावलं : ९. ४. २०१८

## आपल्याच मनाची लीला

नुकताच पाऊस पडून गेलेला. तहानलेल्या भुईनं पिऊन घेतला होता ओटीत आलेला सगळा पाऊस. तिच्या तृप्तीचा गंध दरवळत होता. झाडं, वेलीही न्हाऊन निघालेल्या. चिंब भिजलेल्या पानाच्या टोकाशी कोणत्याही क्षणी निखळून पडेल अशा बेतात पाण्याचा एक थेंब अजून थरथरत होता.... तो क्षण टिपावासा वाटला. पण मोबाइल काढेपर्यंत तो निखळलाच..! छायाचित्रात टिपता न आलेलं ते दृश्य मनात साठवून पुढं चालत राहिले. तरी निसटलेपणाची चुटपुट रेंगाळत राहिलीच.

अशा चुटपुटी एकट्या नाही राहात कधी. त्या आठवण करून देत राहतात आपल्या भावंडांची.. मन लगेच धावतं त्यांच्या मागे.. पक्ष्याची भरारीही अशीच निसटते की चौकटीतून. कळीचे फूल होण्याचा क्षण किंवा पिकलं पान गळून पडण्याचा क्षण तरी कुठे टिपता येतो छायाचित्रामध्ये ?

आकाशात मुक्त विहार करणाऱ्या पक्ष्याच्या भरारीचा डौल टिपायचा ध्यास घेऊन तासन् तास दबा धरून बसलं तर क्वचित पकडता येतो तो किंवा थोडी चपळता साधली तर पानाच्या

टोकाशी आलेला थरथरता थेंबही बंदिस्त करता येतो छायाचित्राच्या चौकटीत.

पण अंथरुणावर पडल्यावर झोप लागण्याचा क्षण किंवा स्वप्नातून जाग येण्याचा नेमका क्षण कधीच कळत नाही. मौनातून उसळून मौनात विसर्जित होण्यापूर्वी निमिषभर रेंगाळणाऱ्या अमूर्त आशयासारखे मध्यसंधीवरचे असे कितीतरी क्षण आकलनाच्या चिमटीत धरता येत नाहीत.

प्रत्यक्ष जगतानाही अनुभवतो आपण निसटलेल्या क्षणांची रुखरुख. आभार मानावेत, क्षमा मागावी असे कितीतरी प्रसंग घडतात प्रत्येकाच्या आयुष्यात. पण बऱ्याचदा अशा भावना व्यक्त करायच्या राहून जातात. शक्य असून, मनात येऊनही कुणाला हवी ती मदत करायची राहून जाते. आजारपणात कुणाला भेटायचं राहून जातं. बराच वेळ उभ्या असलेल्या व्यक्तीला आपण उठून बसायला जागा द्यावी असं मनात येतं पण तशी कृती घडत नाही. किरकोळ वाटणारे असे कितीतरी प्रसंग संवेदनशील मनाला बोचत राहतात. पण ती कृती करण्याची वेळ निघून गेलेली असते. माणूस म्हणून उन्नत होण्याच्या या छोट्या छोट्या संधी असतात. पण त्या आपण तत्पर कृतीशीलतेच्या अभावी गमावतो...

निसटलेले असे क्षण तर परत नाहीच भेटत. पण दिवस उगवल्यापासून सवयीनं पार पडणाऱ्या दिनचर्येत किती वर्तमान क्षण पूर्णांशानं अनुभवतो आपण? जिवंत क्षणांची माळ सतत ओघळत असते आपल्या ओंजळीतून आणि आपल्याला त्याचा पत्ताही नसतो. आपण बहुतेक वेळा भूतकाळातल्या मृत क्षणात किंवा भविष्यकाळातल्या अजन्मा क्षणात जगत असतो. आणि जिवंत वर्तमान क्षण पाऱ्यासासारखे निसटूनच जात असतात...

मात्र वेदना आणि प्रतीक्षा या अशा अवस्था आहेत ज्यातून आपल्याला पटकन बाहेर पडायचं असतं. पण त्यातला प्रत्येक क्षण आपण अगदी गिरवल्यासारखा अनुभवतो.. मोठा करतो. काही क्षण तर गोंदल्यासारखे त्वचेखाली ठसठसत राहतात. जे क्षण निसटायला हवेत ते सोबत करतात आणि ज्यांची सोबत हवीहवीशी असते ते मात्र निसटून जातात...! आपल्याच मनाची लीला असते ही..!!

पहाटपावलं : १६.४.२०१८

## चालणं आणि पोचणं...

परीक्षा जवळ आली की मुलं अभ्यासाचं वेळापत्रक बनवतात. कोणत्या विषयाला किती दिवस, त्यातल्या प्रत्येक टॉपिकला त्यातला किती वेळ असं सगळं ठरतं. वेळापत्रक बनवण्यातच पहिला दिवस जातो. पण दुसऱ्या दिवशीपासून यानुसार अगदी कसून अभ्यासाला लागायचं पक्कं केल्यावर तो दिवस गेल्याचं काही वाटत नाही. मस्त वेळापत्रक तयार केल्याच्या समाधानात मस्त झोप लागून जाते. इतकी मस्त की दुसऱ्या दिवशी उठायला उशीर होतो आणि पहिल्याच दिवशी वेळापत्रक कोलमडतं..! मग चिडचिड.. मूड जाणं.. यात बराच वेळ जातो. काटेकोर वेळापत्रकातला इतका वेळ असा फुकट गेल्यावर आता काहीच नको अशी टोकाची प्रतिक्रिया मानात उमटते....

शाळेबाहेरच्या बऱ्याच परीक्षांच्या वेळी आपली अशीच अवस्था होते. घरगुती, बाहेरचा कुठलाही कार्यक्रम असो, एखाद्या कलाकृतीची निर्मिती असो की मुलांना घडवणं असो... आपल्याला सगळं खूप छान, अगदी परिपूर्ण व्हावं असं वाटत असतं. हे वाटणं चांगलंच. त्या दिशेनं नियोजन, ते आमलात आणण्याचे प्रयत्न करणं यात वावगं काहीच नाही. पण

परिपूर्णतेच्या अपेक्षेच्या नादात माणसं काहीशी बेभान होतात. खाईन तर तुपाशी नाहीतर उपाशी ही टोकाची भूमिका खचवणारी, निराशेच्या गर्तेत ढकलणारी ठरू शकते. पण पूर्णत्वाच्या ध्यासाला थोड्या विवेकी शहाणपणाची सोबत मिळाली तर हाच 'प्रवास' सुखाचा होऊ शकतो...

पूर्ण क्षमतेनं, पोचण्याची जिद्द मनात ठेवून नियोजनपूर्वक चालायला लागायचं. पण आपली नजर 'पोचण्या'वर नाही आपल्या चालण्यावर ठेवायची. कितीही दूर जायचं असलं तरी एकावेळी एकच पाऊल टाकू शकतो आपण... चालताना या एकाच पावलाचा विचार करायचा. पाऊल टाकणं अनुभवायचं. इप्सित स्थळी पोचण्यातला.. यश-प्राप्तीचा सर्वोच्च आनंद एकेका पावलानं आपल्या जवळ येत असतो. आनंदाचं दर क्षणी जवळ येणं आपण अनुभवत राहिलं तर प्रत्येक पावलाला त्याचं त्याचं श्रेय मिळेल. आणि 'अजून एवढं चालायचंय' असा ताण राहणार नाही. सर्वात महत्त्वाचं म्हणजे शर्थीचे प्रयत्न करूनही काही अनपेक्षित कारणानं 'पोचता' आलं नाही तरी जेवढं चालून झालं तेवढा ताणरहित आनंद आपण आधीच कमावलेला असतो...! आणि आपण पूर्ण क्षमता वापरून चाललो, त्यात कोणतीही कुचराई केली नाही, आपले प्रयत्न चोख होते... हे समाधानही गाठीशी असतं..!

हे साधं आवाक्यातलं शहाणपण म्हणजेच 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' हे अवघड वाटणारं तत्त्वज्ञान. यातलं 'मा फलेषु कदाचन' म्हणजे, फळाची.. ('पोचण्या'ची) अपेक्षा करू नका हेच अधिक लक्षात आणून दिलं जातं. खरं तर या वचनातला पहिला भाग महत्त्वाचा आहे... 'कर्मण्येवाधिकारस्ते' म्हणजे प्रयत्न करणं... चालणं आपल्या हातात आहे, जे हातात आहे त्यावरच आपला अधिकार.. नियंत्रण आहे. म्हणून जे हातात आहे, जे करू शकतो ते पूर्ण क्षमतेनं करावं. त्या प्रयत्नाला यश मिळेल की नाही याचा विचार करत बसू नये. पूर्णत्वाचा ध्यास असावा पण समाधान मात्र 'पूर्ण प्रयत्न' करण्याशी निगडित असावं..!

पहाटपावलं : २३.४.२०१८

# सुविचारांचे कवडसे

उत्साहात रोजची कामं करता करता सहज बाहेर लक्ष गेलं. बाल्कनीत टांगलेल्या आकाशकंदिलाची चांदी चमकत होती. त्यावर पडलेलं ऊन परावर्तीत होऊन माझ्या चेहऱ्यावर रंगीत कवडसा बनून घुटमळू लागलं. डोळे दिपले तसा मी चेहरा बाजूला केला आणि लहान मुलासारखा नकळत हात पुढे केला. पण कवडसा हातातून निसटलाच. मला तो थेट पाहता आला नाही की मुठीत पकडता आला नाही. वाऱ्यानं आकाशाकंदिल हलेल तसा तो हलत राहिला. भिंतीवर नाचत राहिला. दुरून त्याच्याकडं पाहताना वाटलं की तो हाती न गवसणाऱ्या एखाद्या सनातन प्रश्नाच्या सुभाषितवजा उत्तरासारखा वाकुल्या दाखवतोय मला..!

या विचारासरशी नाचून असं लक्ष वेधणारे, जागोजागी लिहिलेले असंख्य सुविचार डोळ्यांपुढून सरकू लागले... रस्त्यांवरच्या पाट्यांवर, ट्रकच्या मागे, छापील डायरीच्या प्रत्येक पानावर, शाळा, मंदिरं, बागा, लहान-मोठी कार्यालयं... अशा सार्वजनिक ठिकाणी असलेल्या फलकांवर लिहिलेले अगणित सुविचार... आता तर व्हाट्सअपवर रोज सकाळी ‘सुप्रभात’ बरोबर भरपूर सुविचारांचे वाटप होत असते. मात्र अतिपरिचयात अवज्ञा

होऊन ते दुर्लक्षित राहतात. कुठून कुठून सतत समोर येणारे हे सुविचार भिंतीवर नाचणाऱ्या कवडशासारखेच असतात. त्यांच्या अर्थाकडे डोळे उघडून पाहावं तर डोळे दिपतात.. आणि धरू जावं तर आशयासह निसटून जातात…!

तरी त्यांनी सतत डोळ्यासमोर असायला हवं. कारण कधी कधी यातूनच एखाद्या मिटलेल्या मनाला अचानक उभारी मिळते. बराच काळ कुरतडणारा एखादा सल गळून पडतो. तिष्ठत जागीच उभ्या असलेल्या प्रश्नाला उत्तराची दिशा कळते… आणि दिवस सुखरूप होऊन जातो…!

मात्र शारिरीक वेदनेच्या विळख्यात सापडलेल्या, उव्दिग्नतेच्या गदारोळात हरवलेल्या व्यक्तीला हे सुविचार खिजवणारे वाटू शकतात. शरीराबरोबर मन.. बुद्धीही थकलेल्या, मृत्यु जवळचा वाटू लागलेल्या त्या अवस्थेत स्वतःतून बाहेर पडून ते पाहू शकत नाहीत सुविचारांमधल्या मार्गदर्शक शब्दांकडे. त्यांच्या आधारानं स्वतःला सावरत खुरडत जगण्याऐवजी सर्व थांबवून टाकावसं वाटतं त्यांना… अशावेळी त्यांच्या वेदनेला सुविचारांच्या कुबड्या आधार देऊ शकत नाहीत.

पण सामान्यतः आयुष्य गृहीत धरलेलं असतं तेव्हा तटस्थ कोरडेपणानं पाहिलं जातं सुविचारांकडे. सहसा कुणी शिरत नाही

सुविचारांतील शब्दांच्या गाभ्यात. समजून घेत नाही मुळातून त्या शब्दांचे अर्थ किंवा ते विचार मांडणाऱ्याचा हेतू. प्रत्येकजण बदलून घेतो त्यांचे अन्वयार्थ आपल्याला हवे तसे. कापून टाकतो मागचे पुढचे संदर्भ आणि बनवतो त्यांना आपल्या आकाराचे, आपल्या अर्थाचे... तयार कपडे घरी आणून आपल्या मापाचे करून घेऊन घालावेत तसं काहीसं. एखादी कविता प्रत्येकाला वेगळी कळते. त्यातल्या उत्कटतेची तीव्रता ज्याच्या त्याच्या संवेदनशीलतेनुसार बदलते. तसे सुविचारही प्रत्येकाला वेगळे कळतात आणि वेगळेच वळतात..!

आपल्यातल्या 'मी'च्या इयत्तेनुसार बदलते आपल्याला उमगलेल्या सुविचाराची इयत्ताही. कधी तो डोळे दिपवणारा वाटतो तर कधी हातातून निसटून जातो, कधी खिजवणारा वाटतो तर कधी थेट मनाच्या गाभाऱ्यात झेपावतो.... समया उजळवतो. तेव्हा ग्लानीचा अंधार मावळून जातो आणि लख्ख उजाडते आत...!

पहाटपावलं : ३० एप्रिल २०१८

## जाग येतच नाही..

एके दिवशी झोपेतून जाग आल्यावर कितीतरी वेळ रात्रीच्या स्वप्नाचा ताण जाणवत होता. चहा पिताना सहाजिकच आम्ही स्वप्नांविषयी बोलत राहिलो. भयंकर स्वप्नातून जाग आल्यावर 'अरे.. हे खरं नव्हतं.. स्वप्न होतं' हे जाणवून आपण सुस्कारा सोडतो. रिलॅक्स होतो. त्या दिवशी बोलता बोलता वाटून गेलं खरंतर आपण जे प्रत्यक्ष जगतोय, भोगतोय, अनुभवतोय तेही एक स्वप्न आहे. आपण एका दीर्घ स्वप्नाच्या गुहेत हेलपाटत राहतोय. रीवाईंड करून पुन्हा पुन्हा एकच स्वप्न पाहातोय. भावनांचे तेच चढ-उतार अनुभवतोय...

मग कुठेतरी वाचलेली चिनी गुरू कन्फ्युशियसच्या स्वप्नाची गोष्ट आठवली.. त्याला आपण फुलपाखरू झालोय असं स्वप्न पडतं. कितीतरी वेळ तो त्या स्वप्नात रमून जातो. या दीर्घ स्वप्नातून जाग आल्यावर त्याला कळेनासं होतं की आपण फूलपाखरू झालो हे स्वप्न होतं की आता माणूस झालोय हे स्वप्न आहे फूलपाखरू पाहात असलेलं?

स्वप्न आणि वास्तव यातल्या अशा मनस्वी गुंत्यातून आपण खरे कोण? असा प्रश्न निर्माण होतो. तिकडे लक्ष वेधणारी ही गोष्ट

आहे. तत्त्वज्ञानातला हा सनातन प्रश्न. पण स्वप्न आणि जागृतीच्या संधीकालात तो आपला बनून आपल्याला विचार करायला लावतो. त्याचं प्रश्नपण अगदी आतून भेडसावतं. त्या दिवशी वाटून गेलं की माझं नाव म्हणजे केवळ एक लेबल आहे. एका असण्याला दिलं गेलेलं. व्यवहारापुरतं. घाई गर्दीत कुठेही गळून पडेल असं. केव्हाही बदलता येईल असं...

मूल जन्माला येतं. असंख्यातला एक जीव असतो तो. माणूस या प्रजातीतला. सामान्य. समारंभपूर्वक त्याला नाव दिलं जातं. त्या नावानं हाक मारून मारून ते नाव म्हणजेच तू अशी समजूत त्या जीवावर सर्वांगानं ठोकून ठोकून घट्ट बसवली जाते. त्याला त्या नावाशी जखडून ठेवण्याचा तो एक सर्वसंमत विधी असतो शतकानुशतके चालत आलेला. हा उत्सव अंगांगात असा संचारतो की जिवाला कळतंच नाही वरून काही ठोकून बसवलं जातंय असं. तेल मॉलिश करून, चोळून चोळून ते नाव अंगात मुरवलं जातं. अंगडी टोपडी बिनल्या वाळे घालून सजवलं जातं. कुणीही यावं गालाला हात लावून जावं. नाव मुरलंय ना पाहावं... हळू हळू नाव पालथं पडायला लागतं. घोडा घोडा करत रांगायला लागतं. उभं राहातं. चालायला लागतं. आपलं आपलं तोल सावरत बसतं. बोलायला लागतं. कानी कपाळी बिंबवलेलं ते नाव आपलं म्हणून सांगायला लागतं. ‘विधी’ची यशस्वी सांगता होते. हे नाव म्हणजेच

मी अशी त्याची पक्की श्रद्धा बनून जाते. स्वतःचा परिचय देताना प्रथम ते नाव येतं मग बाकी तपशील...

आपण खरे कोण? हा प्रश्न पाडणारा स्वप्न आणि जागृती यांच्या मधला संधीकाल मनाला दंश करत नाही तोपर्यंत हे नाव म्हणजेच मी असं वाटत राहातं. आणि हा भ्रम जिवंत असेपर्यंत अरे हे स्वप्न होतं हे कळेल अशी जाग येतच नाही..!

पहाटपावलं : ७ मे २०१८

# न झालेली भेट

एक चिमणी आली एक दाणा घेतला उडून गेली... या बडबडगीतातली चिमणी दाणा घेऊन उडून जाते... पण एक चिमणी आली एक दाणा दिला उडून गेली... असा अनुभव देणारी काही माणसं आपल्या आयुष्यात येत असतात...

अशा माणसांपैकी ती एक... तिची ओळख तिच्या कवितेमुळे झाली. कवितासंग्रहातल्या तिच्या मेल आयडीवर मी तिला कविता आवडल्याची मेल केली. तिचं उत्तर आलं. तेव्हा ती फ्रान्समधे राहात होती. मेलवरच आमचा संवाद सुरु झाला... आमचे विचार जुळले. तिचं वाचन चांगलं होतं. मुख्य म्हणजे तिला नुसतं जगण्याच्या पलिकडलं बरंच काही समजत होतं असं तिच्या बोलण्यावरून वाटायचं.

तिकडलं सगळं सोडून अचानक ती भारतात, पुण्यातच राहायला आली तेव्हा आमची प्रत्यक्ष भेट झाली. ओळख वाढली. परदेशात अनेक वर्षे राहिल्याचा तिच्या व्यक्तित्वावर चांगला परिणाम झाला होता. फार मनस्वी होती ती. मनःपूत जगायची. तिच्याशी संवाद ही मेजवानी वाटायची. पण पुरेशी ओळख होतेय तोपर्यंत अचानक ती कुठेतरी निघून गेली. तिथं तिनं स्वतःचं नाव

बदललं. अंतर्बाह्य बदलण्याचा तो एक भाग होता म्हणे... मग आमचा संपर्क तुटला. बरेच दिवस गेले. जगण्याच्या आपापल्या शैलीत आम्ही रमून गेलो. दूरच्या प्रवासात एक-दोन दिवस शेजारी बसलेल्या व्यक्तीशी मैत्री व्हावी तशी आमची मैत्री. अल्पायुषी पण आगदी जवळची...

एकेदिवशी अचानक तिची तीव्रतेनं आठवण झाली म्हणून तिला मेल केली. अनपेक्षितपणे तिचं लगेच उत्तर आलं... 'आता मी पॅरीसमधे आहे. आठ-दहा दिवसांनी पुण्याला येणार आहे..' अनेक दिवस काही संपर्क नसताना मेलवर तिची अशी लगेच भेट झाली याचा आनंद वाटला. पंधरा दिवसांनी तिच्या पुण्यातल्या घरी फोन केला तर समजलं की ती आलीय पण तिला बरं नाहीए....

काही दिवसांनी परत फोन केला तर तिला हॉस्पिटलमधे ठेवल्याचं समजलं. भेटायला जावसं वाटलं. जाण्यापूर्वी परत फोन केला तेव्हा ती कोमात असल्याचं समजलं. तरी भेटायला गेले. तिचे नातेवाईक खोलीच्या बाहेर उभे होते. त्यांना विचारून आत गेले. तिच्या जवळ कुणी नव्हतं. एक मुलगा बेड नीट करत होता. कोमातल्या व्यक्तीला ऐकू येतं असं कुठेतरी वाचल्याचं आठवलं आणि तिच्या मिटलेल्या चेहऱ्याकडं पाहात म्हटलं, 'मी आलीय तुला भेटायला...' त्या मुलानं प्रश्नार्थक नजरेनं माझ्याकडं पाहिलं.

तिकडं लक्ष न देता मी बाहेर पडले. कुणाशी काही न बोलता घरी आले... नंतर समजलं की ती आदल्या दिवशीच गेलेली होती..!

अचानक आठवण येताच केवळ एका मेल-आयडीमुळे काही थांगपत्ता नसलेल्या तिच्याशी पुन्हा संवाद सुरू झाला होता... अंतर्बाह्य बदलासाठी ती कुठे गेली होती? कसा झाला तिचा परिवर्तन-प्रवास? याविषयी तिच्याकडून समजणार होतं. पण ती संवाद-भेट झालीच नाही... एकही दाणा न देताच उडून गेली ती..!

अचानक भेटी होण्यात.. किंवा अशा निसटून जाण्यात काही अदृश्य नियोजन असत असेल का?

पहाटपावलं : १४ मे २०१८

# पुनर्वाचन

आपल्याला रंग.. रूप.. स्वभाव.. लकबी... सर्व आई-वडलांकडून मिळतं. इतकंच काय विचार करण्याची शैलीही त्यांच्याकडून आपल्यात संक्रमित झालेली असते. यात आई-वडलांइतकाच आपल्या भोवतीच्या सामाजिक स्थितीचा आणि ज्या काळात आपण जन्माला आलो त्या काळाचाही वाटा असतो. रूढ विचार-पद्धती ओलांडून सहसा विचार केला जात नाही...

आपल्या विचारांना ठराविक, रूढ पद्धतीनं 'चालायची' कशी सवय लागते ते एका ट्रेनिंग कोर्समधे मजेशीर रीतीनं समजलं. सरांनी एक अगदी सोपं गणित सोडवायला सांगितलं. सगळ्यांनी ते लगेच सोडवलं. मग त्याच फॉर्म्युल्यानं सुटतील अशी आणखी चार-पाच गणितं दिली गेली. तीही जरा आकडेमोड करून सगळ्यांनी पटकन सोडवली. नंतरचं गणित सोडवायला बराच वेळ लागायला लागला. फॉर्म्युला माहित झाला असला तरी आकडेमोड बरीच मोठी होत होती. पण एकानं पहिल्याइतकं लगेच उत्तर दिलं. सगळ्यांना त्याचं कौतुक वाटलं. त्याला विचारलं गेलं की त्यानं कसं सोडवलं गणित इतक्या लवकर? त्यानं कसं ते सांगितलं... त्यानं फॉर्म्युला वापरलाच नव्हता. फक्त दोन आकड्यांचा गुणाकार

केला होता...! उत्तर ऐकून सगळ्यांना हसू आलं. वाटलं, अरे खरंच की... किती साधं होतं हे.. आपण गरज नसताना उगीचच फॉर्म्युल्यात अडकलो..!

एकाच तऱ्हेनं सलग गणितं सोडवत गेल्यावर लगेच सगळ्यांना फॉर्म्युल्याची सवय झाली. स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विसरून सगळी त्या साच्यात अडकली... रोजच्या जगण्यात आपलं असंच होतं. आपण बऱ्याच गोष्टी मागील पानावरून पुढे चालू ठेवतो. ठरलेल्या साच्यात विचार करतो. माणसांकडेही स्वतंत्र व्यक्ती म्हणून न बघता त्यांच्या भूमिकेतच बघतो. रिक्षावाले, दुकानदार, वॉचमन, भाजीवाले, पोलीस... अशा सगळ्यांना आपण त्या त्या वर्गात घालतो. त्यांच्याविषयी अनेकांच्या अनुभवातून आलेला एक सामायिक ग्रह करून घेतो. आणि त्यांच्याशी व्यवहार करताना या पूर्वग्रहातूनच वागतो. माणसं समजून घेताना पूर्वग्रहांच्या साच्यातून बाहेर येऊन स्वतंत्र विचार केला तर माणसं नव्यानं कळतात. कवितेतल्या प्रतिमांचा अर्थ आपण लावू त्यानुसार कवितेच्या आशयाचा पैस बदलत जातो. कवितेतले शब्द तेच असतात. तरी प्रत्येक वाचनात कविता वेगळी होऊन जाते... कवितेसारखी प्रत्येक व्यक्ती, घटना, समस्या पुन्हा पुन्हा वाचावी. असं स्व-तंत्र ‘पुनर्वाचन’ आपली समज सुंदर करणारं ठरू शकतं.

या संदर्भात एका जुन्या हिंदी चित्रपटातला एक सीन आठवला.. त्यात सुरुवातीला गरीब नायक केळेवालीला केळयाचा दर विचारतो. ती म्हणते, ‘आठ आणे डझन. सुटी हवी तर दोन आण्याला तीन.’ घासाघिस करण्याच्या पवित्र्यात नायक म्हणतो, ‘दो आने के तीन..? ना बाबा.. तीन आने के दो..’ केळेवाली म्हणते, फुकटचा माल आहे का? घ्यायची तर दोन आण्याला तीन घे. नाही तर चालायला लाग..’.. एक केळेवाली आणि गिऱ्हाईक यांच्यातला हा टिपिकल संवाद. ‘घासाघिस करावीच लागते.../ गिऱ्हाईक भाव पाडूनच मागणार...’ या पूर्वग्रहातून झालेला...! नायक निघून चालल्यावर तिच्या लक्षात येतं की ‘तीन आने के दो’ म्हणजे जास्तच पैसे देतोय हा. यडाच दिसतोय म्हणत ती त्याला परत बोलावते आणि म्हणते, तीन आने के दो पाहिजे ना, घे. पण नायकाकडे प्रत्यक्षात पैसेच नसतात. खिशात पैसे नाहीत म्हणून परत चाललेल्या नायकाला मग ती पैसे न घेताच दोन केळी देते. म्हणते, पैसे दे नंतर. गोंधळून तो म्हणतो, ‘पण मी पैसे दिलेच नाहीत तर?’ त्याच्याकडं प्रेमानं बघत ती म्हणते, ‘मी समजेन माझ्या मुलानं खाल्ली’...

फार निरागस होते आपापल्या भूमिकांमधून बाहेर येऊन माणूस झालेल्या त्या दोघांच्या चेहऱ्यावरचे भाव..!

पाहाटपावलं : २१ मे २०१८

# पॅकेज डील

लेकाला अगदी हवी तशी नोकरी मिळाली म्हणून ती खूप खुश होती. आता मुली बघायला हरकत नाही ही उमेद वाढवणारी पुढची गोष्ट..! तिची ही खुशी साजरी करत आमचं चहा पिणं झालं. मनसोक्त गप्पा झाल्या. तिच्या देहबोलीतूनही लेकाला मनाजोगी नोकरी मिळाल्याचा आनंद व्यक्त होत होता. भक्कम रकमेचं पॅकेज होतं. आता त्याना स्वतःचं घर घेता येणार होतं.. पाठोपाठ बऱ्याच गोष्टी साधणार होत्या. बोलून मन भरल्यावर ती घरी गेली...

काही दिवसांनी एका दुकानात ती पुन्हा भेटली. माझ्या मनात अजून तिची खूप खुश असलेली तेव्हाची प्रतिमा होती. मी उत्साहानं पुढच्या प्रगतीबद्दल तिला विचारलं तर काहीशा विरजलेल्या स्वरात म्हणाली, अगं कसली प्रगती.. जरा बसून बोलायला वेळ मिळत नाही त्याला. घरी असला तरी सारखा फोनवर किंवा लॅपटॉपसमोर... आणखीही बरंच काही सांगत होती. थोडक्यात, घी देखा लेकिन बडगा नही देखा अशी तिची अवस्था झाली होती... मुलानं स्वीकारलेल्या 'पॅकेज डील'मधला पगाराचा आकडा तेवढा तिनं पाहिला होता. त्यासोबत असलेल्या इतर बाबी तेव्हा गौण वाटल्या होत्या. त्या प्रत्यक्ष अनुभवताना त्याबद्दल

तिची कुरकुर सुरू झाल्यावर मुलानं तिला समजावलं, 'अगं, एकदा नोकरी स्वीकारल्यावर पगाराबरोबर येणाऱ्या जबाबदाऱ्या, कष्ट, कंपनीचे नियम..अटी सर्व स्वीकारावंच लागतं. 'पॅकेज डील' आहे हे...! '

तिला ते पटलं. पटवून घ्यावंच लागलं. मग त्यावर तिचा विचार होत राहिला. हळूहळू ते तिला अगदी आतून उमगलं... आपल्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या एकाच गोष्टीकडे पाहून आपण खूश होतो. त्या सोबत येणाऱ्या इतर बाबी हळूहळू समोर येतात तेव्हा आपण भानावर येतो. पण 'पॅकेज डील' आपण स्वीकारलेलं असतं. काट्याशिवाय गुलाब नाही मिळत कधी..!

विचारपूर्वक केलेला नोकरीतला बदल, नव्या घराची खरेदी, लग्न करून घरात आलेली सून, किंवा आयुष्याचा जोडीदार... अशा बाबतीतले निर्णय आपण जाणीवपूर्वक स्वीकारतो. कारण ती आपली निवड असते. पण अनेक गोष्टी न मागता आपल्या वाट्याला आलेल्या असतात. आपण कुठल्या देशात, गावात, घरात, कुणाच्या पोटी जन्माला यावं हे आपल्या हातात नसतं. आपण जन्माला येतो आणि त्याबरोबर या सर्व गोष्टी ठरून जातात. रंग-रूप, रक्ताची नाती, परिसर हे सगळं आपल्याला जन्मासोबत भेट मिळालेलं असतं... आपण स्मार्ट फोनवर नवनवीन सुविधा

असलेले ॲप्स डाउनलोड करायला लागतो तेव्हा त्याबरोबर असलेल्या टर्म्स-कंडीशन्स आपल्याला स्वीकाराव्याच लागतात. त्याशिवाय डाउनलोडची प्रक्रियाच पूर्ण होत नाही. ॲप्सच्या सुविधांबरोबर आपण काय काय स्वीकारलंय त्याकडे आपण दुर्लक्ष करतो आणि सुविधांचा लाभ घेत राहतो. तसा जन्म नामक ॲपच्या सुविधांचा लाभ घ्यायचा मात्र 'अटी लागू' हे लक्षात ठेवायचं..!

पुढच्या आयुष्यातही वाट्याला येणारी परिस्थिती, भेटणारी माणसं आपल्या निवडीची असतील असं नाही. या सगळयाकडेच एक 'पॅकेज डील' म्हणून पाहता आलं तर तडजोड करणं हा पराभव वाटणार नाही..!

पहाटपावलं- २८ मे २०१८

## समृद्ध तहान...

लहान मुलं हट्ट करून आपल्याला हवं ते मिळवतात. बोलता येत नसतं तेव्हाही हवं ते मिळेपर्यंत रडून गोंधळ घालतात. मग पालकही आपापल्या ऐपतीनुसार मुलांचे हट्ट पुरवत राहतात... इच्छा पूर्ण करणं ही जगण्याची मूलभूत प्रेरणाच झालेली असते. तहानं मूल स्वतःची शारिरीक गरज भागवण्याच्या उपजत प्रेरणेतून रडतं. तेव्हा त्याची इच्छा 'मूलभूत गरज' या स्वरूपाची असते. वय वाढत जातं तसं या इच्छांचं स्वरूप बदलत जातं- गंमत, आनंद, त्याच्याजवळ आहे तसं मला हवं ही हाव, असंख्य लालसा, किंवा कलोपासना, अध्यात्मिक उन्नती.... शारीरिक गरज ते आत्मिक आनंद अशा अनेक छटा असलेल्या इच्छा जगण्याला वेगवेगळी क्षितिजं दाखवतात.. जगणं गतिमान करतात.. ! 'स्वतःची इच्छा पूर्ण करणं' हा परीघही वयाबरोबर विस्तारत जातो. स्वतःच्या जागी मग हळूहळू जोडीदार, मुलं, आई-वडील, भोवतीचा समाज.. असे विविध घटक या परिघात सामावायला लागतात...

मात्र इच्छापूर्ती ही प्रेरणा केवळ जगण्याला उभारी देऊन बाजूला होत नाही. ती त्वचेसारखी अंगाला चिकटून बसते. जखडून ठेवते. इतकी की तत्त्वज्ञानालाही तिची दखल घ्यावी

लागते. त्यातून त्यागपूर्ण भोगाचे.. कर्मयोगाचे धडे शिकवणारे मुक्तीचे तत्त्वज्ञान जन्माला येते. पण ते सामान्य माणसांच्या पचनी पडत नाही. ती इच्छांच्या मागं धावतच राहतात.

बहुतांश माणसाच्या सगळ्या इच्छा सामान्य, वरवरच्याच असतात. ध्यास पातळीवरची तीव्र इच्छा फार क्वचित कुणी धरतं. एखादा शास्त्रज्ञ, कलाकार, समाजसुधारक, संशोधक, तत्त्ववेत्ता... अशा महनीय व्यक्ती समाजाचं चित्रच बदलून टाकत असतात. मात्र अशी माणसं मोजकीच. समर्पणाची गरज असलेल्या अशा महान इच्छांचा आयुष्यभर पाठपुरावा करणं बहुतेकांना जमत नाही. मग अनेकांच्या अनेक इच्छा अपुऱ्या राहतात...! त्यांच्या पाठोपाठ येणारं असमाधान, पराभवाची भावना.. दुःख.. डिप्रेशन.. यामुळं आयुष्य नासून जातं..! हे टाळायचं तर लहानपणापासूनच हवं तेव्हा हवं ते मिळण्याची सवय मुलांना असू नये. शक्य असूनही काही वेळा योग्य संस्कार व्हावेत म्हणून जाणीवपूर्वक मुलांचे हट्ट पुरवणं टाळावं. अपुऱ्या इच्छांचं व्यवस्थापन त्यांना करता यायला हवं... अभावात जगणाऱ्यांचं आयुष्य त्यांना समजून घेता यायला हवं..

मात्र इच्छांचं व्यवस्थापन इच्छांवर बंधन घालूनच करता येईल असं नाही. दृष्टिकोन बदलून एकदम यू टर्नही घेता येईल... अपुऱ्या इच्छांचा कसलाही बाऊ न करता ‘Not failure but low aim

is crime' या भूमिकेतून खुशाल स्वप्नं पाहावीत. मोठमोठ्या इच्छा धराव्यात. त्यांच्या पूर्ततेसाठी रोज नवी ऊर्जा घेऊन प्रयत्नशील राहावं... गाऊन, नाचून, अभिनय करून बघायचाय, हिमालय पाहायचाय, जगप्रवास करायचाय, पॅराग्लायडिंग... स्कुबाडायव्हिंग अनुभवायचंय... काय काय करायचंय ते आठवताना पार क्षितिजाला भिडलेल्या दिसाव्यात आपल्या इच्छा..! भलेही त्या अपुऱ्या राहातील. पण स्वप्नं पाहण्यात कद्रुपणा कशाला? आयुष्य हरतऱ्हेनं समृद्ध करण्याची इच्छा बाळगण्याचं धैर्य बाळगावं, क्षितिजापर्यंत पसरलेल्या आपल्या इच्छांकडे पाहून अभिमानानं म्हणता यावं, किती विशाल... किती समृद्ध आहे माझी तहान..!

पहाटपावलं – ४ जून २०१८

## असेही देहदान...

स्वतःबरोबर दुसऱ्यांचं जगणं अधिक सुखकारक करण्याचे बरेच मार्ग आपल्या हातात असतात. जगण्याशी थेट संबंध असलेले रक्तदान... अवयवदान... देहदान हे त्यापैकी काही उदात्त मार्ग..! याविषयी व्यक्तिगत, सामाजिक पातळीवर वेगवेगळ्या माध्यमांमधून प्रबोधन केले जाते. त्याचे महत्त्व पटवून दिले जाते. त्याविषयीची भीती, गैरसमज दूर केले जातात. याबाबत आता बरीच जगरुकता निर्माण झाली आहे. काही लोक मृत्युनंतर आपला देह वैद्यकीय अभ्यासासाठी दिला जावा अशी नोंद मृत्युपत्रात करून ठेवतात. अवयवदानाची इच्छाही काहीजण नोंदवून ठेवतात. त्यांच्या माघारी बऱ्याचदा त्यांची इच्छा पूर्णही केली जाते.. रक्तदान तर कारणप्रसंगाने पुष्कळजण करतात..!

कधीकधी अगदी नतमस्तक व्हावं अशा या संदर्भातल्या बातम्या वाचायला, ऐकायला मिळतात... 'अपघातात आपला तरूण मुलगा दगावल्याचं खचवणारं दुःख पचवून त्याच्या आई-वडिलांनी त्याचे सुस्थितीतले अवयव गरजू रुग्णांना देण्याची तत्परता दाखवली...', 'एक मरू घातलेलं धडधडतं हृदय घेऊन एक रुग्णवाहिका गर्दी कापत सुदृढ हृदयाच्या प्रतीक्षेत असलेल्या

दुसऱ्या रुग्णापर्यंत वेळेवर पोहोचली आणि त्या रुग्णाला जीवदान मिळालं.' इत्यादी... गरज निर्माण झाल्यावर वडिलांनी मुलाला, भावानं भावाला... किडनी दिल्याच्या घटनाही घडत असतात. प्रत्यक्ष अवयवदानाच्या या घटनांविषयी आपण ऐकतो तेव्हा त्या व्यक्तींचं आपल्याला कौतुक वाटतं. दुर्धर आजार.. त्यावरचे असे गुंतागुंतीचे उपचार या संदर्भातल्या घटना दुरून ऐकताना कथेसारख्या वाटतात.

पण आपण स्वतः अशा एखाद्या अनुभवातून जातो तेव्हा त्यातल्या बारीकसारीक अडचणी आणि वेदना आतून कळतात... त्या अंतर्मुख करतात. मग त्यांना सामोरं जायचं बळ आतूनच उगवतं. एकदा काही उपचारादरम्यान मला सलाईनच्या अनुभवातून जावं लागलं. सलाईनसाठी आय. व्ही. लावताना नर्सला बराच वेळ शीरच सापडत नव्हती. शीर सापडेपर्यंत ती इथे तिथे टोचत राहिली... असं आता आणखी किती वेळा सोसावं लागणार या कल्पनेनं मला रडू कोसळलं. त्यापेक्षा उपचारच नको म्हणून मी अडून बसल्यावर डॉक्टरांनी समजावलं आणि अनुभवी नर्सकडून ते काम करवून घेतलं. मी तिचे मनापासून आभार मानले. सगळं स्थिरस्थावर झाल्यावर मनात आलं की जिचे आपण आभार मानले ती नर्सही सुरुवातीला चुकलीच असेल. सुरुवातीला सगळ्याच शिकावू असणार. प्रत्यक्ष अनुभवातूनच त्या शिकणार.

त्यातूनच त्यांना त्या त्या गोष्टीतलं प्राविण्य प्राप्त होणार... मृत्युनंतर विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी देहदान करतात. आपण जिवंतपणी थोडा त्रास सहन करून त्यांना शिकायची संधी द्यायला काय हरकत आहे? डॉक्टरही वेगवेगळ्या प्रकृतीधर्मांच्या रुग्णांवर उपचार करण्यातून शिकत असतात. उपचार घेताना असेही 'देहदान' करता येईल असा विचार आपण केला तर?..

उपचारादरम्यान होणारा असा त्रास नाइलाजानं सहन करणं किंवा छोट्या छोट्या गोष्टींसाठी तक्रार करत राहून स्वास्थ्य घालवणं यापेक्षा मी 'असेही देहदान' करता येईल असा विचार करून पाहिला. त्यातून मला वेगळं बळ मिळालं. आपण उपचार घेतोय ही भूमिकाच बदलून गेली. मग उपचारादरम्यान अनेकदा वेदना झाल्या तरी त्यांचा त्रास झाला नाही..!

पहाटपावलं – ११ जून २०१८

# अभावाचे असणे

एके दिवशी सकाळी बागेत शिरताच पिवळ्या नाजूक पाकळ्यांचा सुंदर सडा पडलेला दिसला. सहज वर लक्ष गेलं तर शेजारी शेजारी उभी असलेली दोन झाडं छोट्या छोट्या पिवळ्या चेंडूसारख्या फळांनी लगडलेली दिसली. मंद सुगंध दरवळत होता... जागीच थांबून मी बरोबर आलेल्या मैत्रिणीचं त्या झाडांवरच्या फळांकडे लक्ष वेधलं. तर ती म्हणाली, ‘अगं ही फळं नाहीत. कदंबाची फुलं आहेत. त्याच्याच पाकळ्या पडल्यायत या..’ मी पाहातच राहिले त्या झाडांकडे. कदंब नाव ऐकताच नेहमीची बाग एकदम वेगळी वाटायला लागली. या वृक्षाशी असलेलं कृष्णलीलांचं नातं आठवलं आणि क्षणार्धात मन गोपींसमवेत कुठं कुठं जाऊन आलं. गंमतच वाटली... वृक्षाचं केवळ नाव कळताच मन नावाच्या अदृश्य इंद्रियापुढे कितीतरी कृष्णलीला दृश्यमान झाल्या..!

ज्ञानेंद्रियांना कळणाऱ्या शब्द, स्पर्श, रस, रूप, गंध यापैकी कोणतीही मिती अशा आठवणींना असत नाही. तरी प्रत्यक्षाहूनही त्या उत्कट असू शकतात..! अंगावर शहारे.. डोळ्यात पाणी आणतात. हृदयात आनंद तरंग उमटवतात. इंद्रियसंवेद्य असं

प्रत्यक्षात काही नसून असण्याचा जिवंत परिणाम करणाऱ्या या ‘अभावा’चा क्षणिक अनुभव घेतल्यावर याला भारतीय तत्त्वज्ञानात विश्वरचनेतील मूलभूत ‘पदार्था’चा दर्जा का दिला असेल ते काहीसं उमगल्यासारखं वाटलं.

अस्तित्वात असलेल्या वस्तूविश्वाच्या गराड्यात आपण देहाने वावरत असतो. पण मन आपल्या सोबत असतंच असं नाही. ते कधी काल-परवाच्या किंवा त्याहूनही मागच्या भूतकाळात तर कधी उद्या-परवाच्या किंवा त्याहूनही पुढच्या भविष्यकाळात हेलपाटत असतं. बाहेर एक दृश्य खेळ आणि आत एक वेगळाच अदृश्य खेळ चालू असतो. आपल्या असण्याचा किती भाग वर्तमानात, प्रत्यक्षात उपस्थित असतो आणि किती भाग भूत-भविष्याच्या कल्पनांमधे.. ‘अभावां’मधे रमलेला असतो याचा हिशोब केला तर आपण थक्क होऊन जाऊ. जगण्याच्या वर्गात हजेरी घेतली जाते तेव्हा हजर म्हणून आपण हात वर केलेला असतो. पण स्वतःला बाकावर बसवून आपण क्षणाक्षणाला तिथून पळ काढत असतो...!

अभावातून भावरूपात साकारलेली आणखी एक सर्वव्यापी कल्पना म्हणजे सगुण ईश्वर... ही कल्पना जनमानसात कशी रुजली असेल? आधी तर्क केला गेला की हे सर्व दृश्य विश्व अस्तित्वात

आहे त्या अर्थी याचा निर्माता कुणीतरी असला पाहिजे. हा कुणीतरी म्हणजेच ईश्वर. पण तो कसा असेल? ही जिज्ञासा प्रज्ञावंतांना गप्प बसू देईना. प्रयत्नांती ज्यांना तो उमगल्यासारखा वाटला त्यांनी त्याचं निर्गुण.. निराकार.. शून्य... नेती नेती.. असं वर्णन केलं. म्हणजे काही नाहीच. केवळ अभाव..! मग या उमगलेल्या सत्याची प्रचिती यावी म्हणून त्या काही नसण्यालाच ते शरण गेले. त्यालाच प्रार्थना केली की या विश्वरूपाचा मोहक मुखवटा बाजूला कर आणि आम्हाला तुझे दर्शन दे..! प्रार्थना करण्यासाठी योजला गेलेला हा 'तू' म्हणजेच भाषेत अवतरलेला ईश्वर..! अभावाचे असणे ईश्वर झाले.. संतांसाठी विठ्ठल झाले..! तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगात म्हटलंय, 'शून्य निरसूनि राहिले निर्मळ / ते दिसे केवळ विटेवरी..!'

पहाटपावलं – १८ जून २०१८

# परिवर्तन

बऱ्याच वर्षांनी आम्ही पूर्वी राहात होतो त्या भागात गेलो होतो. सहजच आमच्या जुन्या घराच्या शोधार्थ नजर भिरभिरली. पण ते घर, तिथले शेजारी, त्या घराकडे जाणारा रस्ता, तिथला ओळखीचा परिसर, रोज जाता-येता ज्यांची स्थित्यंतरं अनुभवली ती झाडं.... काहीच तिथं दिसलं नाही. आम्ही राहात होतो तो हाच भाग असं म्हणायला त्या भागाच्या नावाखेरीज काहीच तिथं राहिलेलं नव्हतं. सगळं झपाट्यानं बदलतंय हे माहिती असलं आणि प्रत्यक्ष तसा अनुभवही येत असला तरी त्या दिवशी अनेक वर्षं वास्तव्य असलेलं आपलं घर... परिसर काहीच तिथे नसण्याचा अनुभव अस्वस्थ करून गेला... ‘You cannot step into the same river twice...’ या ग्रीक तत्त्वज्ञ हेराक्लिटसच्या विधानाचा प्रत्यय आल्यासारखं वाटलं क्षणभर...

अखंड परिवर्तन हा निसर्गाचा नियमच आहे. त्यानुसार सतत सगळं बदलत असतंच. पण हा बदल एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जाण्याइतका स्पष्ट असत नाही. प्रत्येक बदलाची गती, दिशा आणि मर्यादा ठरलेली असते. कळीचं एकदम फूल होत नाही... आतल्या ऊर्जेचं बोट धरून फूल होण्याच्या दिशेनं ती

उलगडत राहाते. हे उलगडणं प्रत्येक क्षणीच चालू असतं.. पण फुलण्याचा प्रत्येक क्षण आपण अनुभवू शकत नाही... एका संपृक्त क्षणी कळीचं पूर्ण फुलात रूपांतर होतं. मग हळूहळू सुकत जाणं.. गळून पडणं.. नंतर पुन्हा रुजणं.. उगवणं.. फुलणं.. अशी आवर्तनं चालू राहतात. आपण परिवर्तनाचे हे टप्पेच फक्त अनुभवतो. पण नियत गतीने परिवर्तन-प्रक्रिया अखंडपणे चालूच आहे हे एखाद्या प्रज्ञावंतालाच जाणवतं...!

या संदर्भात विचार करताना जाणवलं की परिवर्तन सरळ एका दिशेनं होत नाही. पूर्ण वाढीनंतर ऱ्हासाच्या उलट दिशेनं आणि पुन्हा निर्माणाच्या दिशेनं परिवर्तनाची आवर्तनं होताहेत.. निसर्गात असंख्य प्रजातींचे जे नमूने एकदा तयार झाले त्याच्या आवृत्त्या पुन्हा पुन्हा होत राहिल्या. कालौघात काही प्रजाती नष्ट झाल्या. काही नवीनही निर्माण होत असतील. माणसाच्याही आवृत्त्याच निर्माण होत राहिल्या. एक प्रजाती म्हणून तो अधिक उन्नत स्तरावर गेलेला दिसत नाही. त्याच्या शरीर-रचनेसह राग लोभ द्वेष प्रेम करूणा... सगळं अनादी कालापासून होतं तसंच आजही आहे. उत्पत्ती-स्थिती-लय या पातळीवरचं परिवर्तन निसर्ग-नियमांनुसार होत असतं. बरेच भौतिक बदल माणूस घडवून आणत असतो. पण माणूसपणाच्या उन्नतीसाठी आवश्यक अशा आंतरिक परिवर्तनाचं काय? नैसर्गिक रीत्या ते आपोआप होत नाही. त्यासाठी माणसाला

स्वतःशीच सतत संघर्ष करावा लागतो.. संपूर्ण जीवसृष्टीत माणूस ही एकमेव अशी प्रजाती आहे की तिच्यात चांगलं-वाईट कळण्याची क्षमता आहे. त्यामुळे श्रेयस काय आहे, ते कसं प्राप्त करायचं ते माणसाला कळू शकतं. त्यासाठी आंतरिक परिवर्तन व्हायला हवं हेही त्याला कळतं, पण वळत मात्र नाही. हीच माणसाची सर्वात मोठी शोकांतिका आहे..!

मानव-निर्मितीच्या प्रोग्रॅमिंगमधे अशी कोणती मेख असेल की माणसाला सारं काही ‘कळावं’ पण सहजी ‘वळू’ मात्र नये?

पहाटपावलं- २५ जून २०१८

# आम्ही खेळतोय..!

पहाट झाली की किलबिलाट सुरू होतो. पाखरं घरट्याबाहेर पडतात तशी संध्याकाळ झाली की कॉलनीतली लहान मुलं त्यांच्या आया-दायांबरोबर बाहेर पडतात. अगदी लहान कडेवर, जरा मोठी तीन चाकी सायकलवर. त्याहून मोठी लपाछपी किंवा बॅट-बॉलने खेळत असतात. बाहेर, लांब जाऊ न शकणाऱ्या वयस्कर बायका कॉलनीतच फेऱ्या मारत असतात. त्यांचं लक्ष असतं या मुलांकडे. त्यांचा खेळ बघणं, जाता येता त्यांच्याशी बोलणं हा त्यांचा विरंगुळा असतो. दमल्या की बसतात बाकावर एकमेकींशी बोलत...

एकदा चार पाच वर्षांची मुलं खेळता खेळता जोरजोरात भांडायला लागली. आवाज वाढला. मारामारीपर्यंत वेळ गेली. शेजारून फेऱ्या मारत असलेल्या एका आजींचं त्यांच्याकडे लक्ष गेलं. त्या त्यांना म्हणाल्या, ‘अरे, काय चाललंय? भांडू नका बरं..’ आजींचा आवाज ऐकून त्यातला एक मुलगा कपाळावर आठ्या घालत आजींकडे पाहात म्हणाला, “का पण? आम्ही खेळतोय..!’ मुलाचा एकूण आविर्भाव बघून आजी गप्प राहिल्या. ‘चालू दे खेळ’ म्हणत त्यांनी त्यांचं फिरणं सुरू केलं. हल्ली लहान मुलंही

किती उद्धट बोलतात ना... त्या पुटपुटल्या. मग त्या दिवशी गप्पांना हाच विषय मिळाला..

फिरणं संपवून सगळ्या आपापल्या घरी गेल्या. त्या आजींच्या मनातून ‘का पण..?’ म्हणणारा मुलगा गेला नव्हता. टी. व्ही. मालिकांची वेळ झालेली. रोजच्या सारख्या त्या टी. व्ही.समोर बसल्या तरी ‘आम्ही खेळतोय..’ हे शब्द त्यांना आठवत राहिले. राहून राहून त्यांच्या मनात येत होतं भांडणं, मारामारी हा कसला खेळ?.. इतक्यात घरातून सुनेचा मोठ्यानं ओरडण्याचा आवाज आला. तीन-चार महिन्यांचा नातू रडत होता आणि सून त्याच्यावर ओरडत होती. आधीच अस्वस्थ असलेल्या आजींना सुनेचं ओरडणं ऐकून गलबलायला झालं. त्या विचलित झाल्या. त्यांना आत जावसं वाटलं. पण त्यांनी स्वतःला रोखलं. जागच्या हलल्या नाहीत. टी.व्हीत मन रमवण्याचा प्रयत्न करत राहिल्या. पण लक्ष आतल्या आवाजांकडे होतं... थोड्या वेळानं सुनेचा लाडात बोलल्याचा आवाज आला. नातू रडतच होता. पण आजी जरा सावरल्या. त्यांना एकदम त्या मुलाच्या ‘आम्ही खेळतोय..’ या शब्दांचा वेगळाच अर्थ जाणवला.. त्यांना वाटलं, मूल रडतंय.. आई ओरडतेय.. मग लाडात बोलतेय.. माय-लेकरांचा हा खेळच तर चाललाय... या विचारासरशी त्यांना हसू आलं. चालू दे खेळ असं मनात म्हणत त्या मालिका बघण्यात रमून गेल्या...

पण मनाच्या स्क्रीनवर त्या पाहात होत्या लहानपणापासून वेळोवेळी कुणाकुणाशी झालेली भांडणं, रुसवे-फुगवे, अबोले, मनःस्ताप... आजही आठवून अस्वस्थ करणाऱ्या अशा कितीतरी घटना म्हणजे त्या त्या वेळचे वेगवेगळे खेळच होते.. आपण त्यांना खरी भांडणं मानत राहिलो. दुखावत राहिलो आतून. 'आम्ही खेळतोय..' हे तेव्हाच समजलं असतं तर किती वेगळं झालं असतं स्मृति-चित्र..! असू दे. आत्ता तर त्या आठवणींना खेळ म्हणता येईल..! त्यांना मजा वाटली. त्या सुखावल्या. त्या मुलाचा उद्धट वाटलेला चेहरा त्यांना एकदम निरागस वाटायला लागला...!

पहाटपावलं – २ जुलै २०१८

# चौकटी...

पेन न उचलता, रेषेवरून रेष न नेता एक चौकोन आणि त्यात फुली काढायची. अनेकांना माहिती असलेलं हे एक साधं कोडं. खूप प्रयत्न केले तरी सहजी सुटत नाही. हे कोडं कसं सोडवायचं त्याचा एक व्हिडीओ एकदा पाहायला मिळाला. त्यात एकानं हे सहज सोडवून दाखवलं होतं. ते पाहताना कोडं सहज का सुटत नाही ते लक्षात आलं. आपण कोड्याचा विचार दिलेल्या नियमांच्या चौकटीत राहून करत राहतो. चौकटीच्या बाहेर पडायचं नाही असं कुणी सांगितलेलं नसतं तरी आपण आतच घुटमळत राहातो. प्रश्न सोडवायचा असेल तर प्रश्नाची चौकट ओलांडायला हवी... चौकटीसंदर्भात अशा तऱ्हेचे विचार बऱ्याच वेळा मांडले जातात. त्या त्या संदर्भात त्यांचे महत्त्व आहेच. वेगळं काही मिळवायचं असेल, गुरफटलेपणातून सुटायचं असेल तर चौकटींचे बंधन झुगारावे लागतेच...

छायाचित्र काढतांना मात्र मला चौकटींचे वेगळेच दर्शन झाले. त्यांचे वेगवेगळे आयाम जाणवले. फोनशिवाय घड्याळ, रेडिओ, कॅलेंडर... अशा सर्व गरजा भागवणाऱ्या मोबाईलने कॅमेराही हातात आणून ठेवला. आणि सगळे छायाचित्रकार झाले..! मलाही तो नाद

लागला. छायाचित्र काढता काढता त्यावेळची प्रक्रिया जाणवू लागली. चौकटींची वेगवेगळी रूपं दिसू लागली. असीम आकाश.. अथांग समुद्र.. सृष्टीची नित्यनूतन रूपं पाहतांना आपण लगेच कॅमेरा सरसावतो. भराभर छायाचित्रं टिपली जातात. तेव्हा नजरेनं निवडलेल्या 'चौकटी' दृश्यं नुसती टिपून घेत नाहीत. त्या आसरा देतात त्यांना. अर्थ देतात. त्यांच्यातलं सौंदर्य अधोरेखित करतात. आणि यच्चयावतातून वेगळं काढून त्यांना त्यांचं स्वतंत्र अस्तित्व बहाल करतात. ममतेनं कवेत घेतात आणि त्यांना त्यांचं नाव देऊन त्यांच्यावरचा असीमाचा भार अलगद उतरवून ठेवतात..!

छायाचित्र काढलं जातं तेव्हा नजरेनं निवडलेल्या दृश्यांशाभोवती चौकटी आपल्या असण्याचा बांध घालतात आणि क्षितिजासारख्या उभ्या राहतात दृश्यांच्या सीमेवर त्यांना अबाधित राखण्यासाठी. त्या असतात तिथे पण दिसत नाहीत. विसर्जित होत राहतात दृश्यांमध्ये..! छायाचित्रांच्या चौकटी नजरेनं टिपलेले माणसांचे चेहरेच नुसते सांभाळत नाहीत. आठवणींचे असंख्य अनुबंधही जतन करून ठेवतात आणि जसेच्या तसे परत करतात पाहणाऱ्याला प्रत्येक वेळी..!

पानांच्या कुशित विसावलेल्या प्राजक्ताच्या फुलांचं छायाचित्र ती गळायच्या आत वरच्यावर टिपलं जातं तेव्हा चौकटींनी

शिताफीनं रोखून धरलेला असतो पाना-फुलांचा वियोग..! टिपलेल्या फुलांच्या पाकळयांची शुभ्रता कोमेजू नये, देठातली केशरी पहाट मावळू नये आणि कायम साजरा होत राहावा पूर्ण उमललेला क्षण म्हणून त्या सतत गस्त घालत राहतात त्याच्याभोवती..! पानाच्या टोकावरून ओघळणाऱ्या पावसाच्या थरथरत्या थेंबाला चौकटी चिरंजीव करू शकत नाहीत. पण तत्परतेनं टिपून तिथल्या तिथे त्या सावरतात त्याला. जिवात जीव असेपर्यंत थोपवून धरतात त्यांचे पतन..! आरपार होऊ देतात उन्हाचे कवडसे आणि इंद्रधनूच्या शक्यतेसह त्यांना बहाल करतात दीर्घायुष्य...!

छायाचित्रांच्या ‘पालक’ चौकटींनी लक्षात आणून दिलं की घराच्या, सामाजिक नियमांच्या किंवा एखाद्या समस्येच्या चौकटी केवळ बंधनकारकच असतात असं नाही. आमच्यासारख्या त्या बहुआयामीही असू शकतात..!!

पहाटपावलं- ९ जुलै २०१८

# डी-कोडींग

टेलिग्राफिक ट्रान्सफर.. हा पूर्वीचा तातडीनं पैसे पाठवण्याचा मार्ग होता. बॅंकेच्या एका शाखेतून दुसऱ्या शाखेला तार केली जायची. त्यात सांकेतिक भाषेत किती रक्कम कोणत्या खात्यात जमा करायची हे लिहिलेलं असायचं (कोडींग). त्यासाठी सांकेतिक भाषा आणि त्याचा अर्थ दिलेलं एक पुस्तक असायचं. तार आली की या पुस्तकाच्या आधाराने सांकेतिक भाषेचा अर्थ लावून (डी-कोडींग) त्यानुसार खात्यात पैसे जमा केले जायचे. कोडींग - डीकोडींग मधे काही गडबड झाली तर मोठाच घोटाळा व्हायचा..! पण काळजीपूर्वक काम केलं तर असे घोटाळे टाळणं शक्य असतं.

मात्र आपल्या रोजच्या सहज संवादात बोलण्याचे चुकीचे अर्थ लावले जाऊ शकतात आणि त्यातून कधी कधी निस्तरता न येण्यासारखे घोटाळे होतात... कारण आपण सतत वापरत असलेली आपली अख्खी भाषाच सांकेतिक आहे. तांब्या हा शब्द तांब्या या वस्तूचा निदर्शक आहे हे केवळ संकेताने ठरले. तांब्या या वस्तूचा तांब्या या उच्चाराशी काहीही तार्किक संबंध नाही. एकेक करत ठरले गेलेले असे सर्व संकेत मिळून भाषा तयार झाली.

जन्माला आल्यावर सतत ऐकून ऐकून हे संकेत आपोआप आत्मसात होतात. मात्र ठरलेले संकेत शब्दांमधे बांधून ठेवलेले नसतात. भाषा प्रवाही असते. काळाबरोबर ती बदलत असते. हे बदलही सहज स्वीकारले जातात. आपण बोलत-ऐकत असतो तेव्हा आतल्या आत बिनचूक कोडींग – डीकोडींग चालू असतं. त्यामुळे बरेच व्यवहार सुरळीतपणे चालतात. पण कधी कधी आपण बोलतो ते दुसऱ्यापर्यंत अपेक्षित अर्थानं पोचत नाही. मग गैरसमज होतात. 'मला असं म्हणायचं नव्हतं' हे पटवून देता देता पुरेवाट होते. भाषेच्या सांकेतिक आणि लवचिक स्वरूपामुळे एखाद्याच्या बोलण्याचा सोयीचा अर्थ लावणे, विपर्यास करणे शक्य होते. भाषा-वापरातल्या कोडींग - डीकोडींग मधे असे घोटाळे बरेचदा होतात.

भाषेचं हेच स्वरूप साहित्यनिर्मितीला पोषक ठरतं. लेखक आपलं कल्पनाविश्व शब्दांमधून साक्षात डोळ्यांसमोर उभं करू शकतो. दीर्घ काल स्मरणात राहतील अशा व्यक्तीरेखा साकारू शकतो... इतर कोणत्याही साहित्य-प्रकारापेक्षा कविता-लेखनात भाषेच्या सामर्थ्याचा परिपूर्ण वापर केला जातो. रोजच्या व्यवहारातल्या भाषेतल्या शब्दांना कवी आपल्या भावनांचे अस्तर लावतो, ठरलेले संकेत ओलांडून त्यांना आपले अर्थ देतो आणि रचतो कवितेचा व्यूह. मधल्या रिकाम्या जागांमधे पेरून ठेवतो

आशयाची उत्कटता आणि शब्दांच्या मांडणीत झंकारत ठेवतो नादसौंदर्य... आस्वाद-प्रक्रियेत रसिक जेव्हा कवितेचा व्यूह भेदत आत शिरतो तेव्हा कवीने रिकाम्या जागेत पेरलेला आशय त्याच्या मनात उगवू लागतो. शब्दांमधे झंकारत ठेवलेलं नादसौंदर्य त्याला ऐकू येऊ लागतं. कविता लिहिताना कवीमनात उमटलेले शहारे संवेदनशील रसिकापर्यंत तरंगत येतात... ये हृदयीचे ते हृदयी जाते.. मात्र जसेच्या तसे नाही. या ‘डी-कोडींग’ प्रक्रियेत ती कविता कवीची राहिलेली नसते. रसिकाची झालेली असते. पण यामुळं काहीच ‘घोटाळा’ होत नाही. उलट ते कवितेचं यश असतं. एका कवितेपोटी नव्या कवितेचा जन्म झालेला असतो..!

पहाटपावलं – १६.७.२०१८

# ‘आडोशा’साठी राबणारे हात

एखाद्या रंगमंचासारखी जमीन आपल्याजागी स्थिर असते. तिच्या ओटीत अलगद एक बीज येऊन पडतं. तिला कळत नाही कुणाच्या चोचीतून ते पडलंय. ती विचारत नाही त्याचं नाव गाव... सामावून घेते उदरात... बीजाच्या हाका ऐकून इकडून तिकडून पाणी येतं. गरजेनुसार ऊन.. वारा.. आणि सर्वसाक्षी आकाशही डोकावतं. बीज रुजू लागतं. खालचा अंधार असह्य झाला की मातीतून बाहेर डोकावू लागतं. प्रकाश दिसताच आतल्या ऊर्जेला पानं फुटतात. देठ वाढत जातं. त्याचा छोटासा बुंधा होऊ लागतो. पानं फुटता फुटता देठांच्या खाली डहाळी तयार होते. एके दिवशी हळूच पानाआडून कळी डोकावते. ओळखीचं हसते. लाल-केशरी रंग दरवळतो वातावरणात. कर्दळ तरारते...! अशी उगवून आलेली ती एकटी नसते रंगमंचावर. रानही उगवत असतं तिला बिलगून. इमारतीच्या आडोशाला हे नाट्य आपसुक घडतं. कित्येकजण जवळून जात येत असतात. पण कुणाला याचा थांगपत्ताही नसतो... आपण कुण्या नाटकातली भूमिका निभावतोय हे घडलेल्या नाट्यातल्या पात्रांनाही ठाऊक नसतं..!

आकाशात भिरभिरणारं एक पाखरू अचानक खाली झेपावतं. त्याला माहीत नसतं कर्दळीच्या जन्मापूर्वीचं नाट्य. ते सहज येऊन बसतं तिच्या एका डहाळीवर. विचारत नाही तिचं नाव गाव.. उघड्यावरच बहरलेल्या त्या झुडुपाच्या पानांच्या आत आत जाऊन आडोसा शोधतं. विसावतं क्षणभर. मग इवल्या चोचीनं इवले पंख घासतं. तिथल्या तिथंच उडून पाहतं जरासं. आणि किलबिलत उडून जातं..! त्याला थांगपत्ताही नसतो की आपल्याला क्षणभर आडोसा मिळावा म्हणून घडलंय एवढं सगळं..!

माणसांच्या जगातही असं घडत असतं. कधीकधी आपण त्याच त्या दिनचर्येत नवी ऊर्जा भरता यावी म्हणून दूर अनोळखी प्रदेशात ट्रीपला निघतो. जाता-येताचं रेल्वेचं तिकीट रिझर्व केलेलं असतं. रेल्वे आली की आपण चढतो. सामान लागतं. प्रवास सुरू होतो. हुश्श करेपर्यंत चहा समोर येतो. चहा पितापिता खिडकीतून बाहेरचं धावतं जग बघण्यात रमून जातो.. जेवणाची वेळ झाल्याचं लक्षात यायच्या आत जेवणाची ऑर्डर घ्यायला मुलगा येतो. बसल्याजागी हवं ते जेवण मिळतं... आपण मुक्कामाच्या दिशेनं धावत असतो आणि आत सर्व घरातल्यासारखं चाललेलं असतं. काही तासात मुक्कामाचं ठिकाण येताच झुडुपात आडोसा शोधून

‘तयार’ होऊन उडून जाणाऱ्या पाखरासारखे आपण खाली उतरतो...

आपल्याला काही तासांसाठी असा ‘आडोसा’ देऊन शेकडो मैल दूरच्या गावी नेऊन पोचवलं जातं यामागे केवढं नियोजन असेल याचा विचारही आपल्या मनात येत नाही. सगळीकडे आपण पैसे मोजलेले असतात. आणि हे सगळं आपण गृहीत धरलेलं असतं. पण विचार करत रेल्वेचा शोध लागला या टप्प्यापर्यंत मागे गेलं तर या सगळ्यामागे केवढी यंत्रणा केव्हापासून राबतेय हे लक्षात येऊ शकतं. यातलं काहीच आपसुक, केवळ आपल्यासाठी घडलेलं नसतं. पण हे घडलेलं आहे म्हणून आपल्याला काही तासांसाठी ‘आडोसा’ मिळू शकतो हे विसरलं जातं...

काही क्षण, काही तास, काही वर्षं आपल्याला ‘आडोसा’ मिळावा म्हणून कुठे कुठे कोण कोण राबत असेल याचा आपल्याला थांगपत्ताही नसतो..!

पहाटपावलं- २३.७.२०१८

# एक अनाम मैत्र

रविवारची सुट्टी म्हणून मी निवांत होते. आरामात चहा पितापिता पेपर वाचत होते. तेवढ्यात दारावर थापा पडलेल्या ऐकू आल्या. बेल असून दार कोण वाजवतंय असा विचार करत बाहेर आले. दार उघडलं तर शेजारच्या इमारतीतला पाच वर्षांचा नीरज दारात उभा. चेहरा रुसलेला. धावत चार जिणे चढून आलेला दिसत होता. दार उघडताच त्यानं घाईत विचारलं, ‘काका आहेत?’ मी म्हटलं, ‘नाही रे, बाहेर गेलेत.’ काका नाहीत म्हटल्यावर म्हणाला, ‘त्यांना सांगा की त्यांचा मित्र आला होता म्हणून’ आणि हिरमुसून आल्यापावली परत निघाला. मी म्हटलं, अरे थांब की. काय काम होतं काकांकडे? तसा जरा घुटमळला आणि म्हणाला, ‘आईचं नाव सांगायचंय..’ म्हटलं, का? काय केलं आईनं? तर म्हणाला, ‘ती मला दोरा घेऊ देत नाहीए..’ मी आणखी काही म्हणायच्या आत तो पळाला... मी पाहातच राहिले. त्याच्या असं येण्याची मला गंमत वाटली. मनात आलं, याला दोरा कशाला हवा असेल? आणि आई का घेऊ देत नसेल? त्यापेक्षा गंमत वाटली ती याची की घरातच किंवा शेजारी कुणाकडे न जाता ही गोष्ट सांगण्यासाठी त्याला दुसऱ्या बिल्डिंगमधल्या काकांकडेच यावसं का वाटलं

असेल? मी त्याच्या समोर होते. पण त्याला माझाही भरोसा वाटला नाही...! काय म्हणता येईल काकांशी असलेल्या त्याच्या या ‘मैत्री’ला? कोणत्या विश्वासानं आला असेल तो..? बराच वेळ तो मनात घुटमळत राहिला.

या गोष्टीला बरीच वर्षं झाली. तरी त्या गोड रुसलेल्या चेहऱ्यासह अधुन मधून तो आठवत राहिला. आम्ही जागा बदलली. मग काहीच संपर्क राहिला नाही. अलिकडे काही दिवसांपूर्वी एक स्नेही आजारी असल्याचं समजलं म्हणून त्यांना भेटायला एका हॉस्पिटलमधे गेलो. तिथं पहिल्यांदाच जात असल्यामुळं हॉस्पिटलच्या आवारात आम्ही शोधक नजरेनं फिरत होतो. तेवढ्यात मागून ‘काका’ अशी हाक कानावर आली. आम्ही मागं वळून पाहिलं तर एक उंच, रुबाबदार मुलगा आमच्याकडे चालत येताना दिसला. जवळ येऊन म्हणाला काका, ‘ओळखलंत का मला? मी नीरज.’ आम्ही ओळखलंच नव्हतं. कसं ओळखणार? कितीतरी वर्षांनी भेटला होता तो. मधल्या वर्षांमधे काय काय घडलं काहीच माहिती नव्हतं. बोलताना समजलं की तो डॉक्टर झालाय. आणि त्याच हॉस्पिटलमधे प्रॅक्टिस करतोय.. इतकी जुनी जिवलग ओळख निघाल्यावर आमचं त्या हॉस्पिटलमधलं काम सोपं झालं. तिथून बाहेर पडताना न राहवून

मी ती जुनी आठवण काढली. सगळ्यांनाच गंमत वाटून हसू आलं. भेटू पुन्हा म्हणत आम्ही एकमेकांचा निरोप घेतला.

लहानपणची त्याची ती भेट आणि आता इतक्या वर्षांनी झालेली भेट यात फक्त वर्षांचं अंतर नव्हतं. तेव्हा त्याला छोटासा आधार हवा होता. आणि आत्ता त्यानं आम्हाला छोटासा आधार दिला होता. वयातलं अंतर गौण ठरवणारं एक अनाम मैत्र अबाधित राहिल्याची खूण म्हणून ही भेटही आमच्या हृद्य आठवणींमधे सामिल झाली...!

पहाटपावलं : ३०.७.२०१८

# सूर्यास्ताचं आकर्षण

एका कार्यक्रमाच्या निमित्तानं आम्ही गुहागरला गेलो होतो. कार्यक्रम आटोपताच संध्याकाळी समुद्रकिनाऱ्यावर गेलो. मुख्य कार्यक्रमापेक्षा समुद्राचं आकर्षण जास्त होतं सगळ्यांनाच. रोज नेमानं उगवून मावळणाऱ्या सूर्याचं मावळणं समुद्रकिनारी बसून पाहणं हा एक नयनरम्य सोहळा असतो. आपलं तेज आवरून घेत तो दिमाखात खाली उतरू लागतो तेव्हा त्याच्या बदलणाऱ्या रंगछटा न्याहाळताना भान हरपून जातं.. आम्ही सगळे बोलणं थांबवून ते दृश्य अनिमिष नेत्रांनी पाहात होतो. नजर न हलवता एका मैत्रिणीनं उत्स्फूर्तपणे ‘मावळत्या दिनकरा अर्घ्य तुज जोडुनी दोन्ही करा..’ हे गाणं म्हणायला सुरुवात केली. या अर्थपूर्ण स्वराशयाची पार्श्वभूमी मिळताच त्या दृश्याला गहिरेपण आलं. समुद्र अखंड रोरावत होता. लाटा किनाऱ्यावर येऊन परतत होत्या. पण सगळ्याचं लक्ष बुडणाऱ्या सूर्याकडं होतं. कुणीतरी साद घातल्यासारखा तो झपाट्यानं खाली उतरायला लागला. बघता बघता त्याचा केशरी रंग लाल होत गेला आणि डोळ्यांसमोर तो बुडताना दिसला. काही क्षण लालसर उजेड रेंगाळला. मग तोही

नाहीसा झाला. तेव्हा आम्ही भानावर आलो. परतलो. स्मृतीपटलावर ते पूर्ण चित्र कोरलं गेलं..!

हे दृश्य तसं फार दुर्मिळ नाही. पण परत परत त्याची भूल पडत राहाते. प्रत्येक वेळी ते तितक्याच उत्कटपणे व्याकूळ करतं. आणि स्मृतीकोषात जमा होतं...! किनाऱ्यावरून दिसणाऱ्या सूर्यास्ताचं एवढं आकर्षण का वाटत असेल? विचार करताना कुठे कुठे पाहिलेले सूर्यास्त आठवले. वाटलं की समुद्र कोणताही असो त्याचा ऐल किनाराच फक्त अनुभवू शकतो आपण. गर्जना करत लाटांचं दूरवरून धावत येणं आणि किनाऱ्याशी पोचण्यापूर्वीच विरून जाणं अनुभवताना प्रत्येक वेळी वेगळाच अर्थ लागतो या खेळाचा. कधी वाटतं लाटा म्हणजे नृत्य करत आवेगानं धावत येणाऱ्या गोपी आहेत. आणि किनारा म्हणजे त्यांना साद घालणारा कृष्ण..! त्या कधीच्या धावतायत पण त्यांना भेटतच नाहीए कृष्ण-किनारा... हाच किनारा कधी तटस्थ निरीक्षक वाटतो तर कधी पहारा देणारा रक्षक वाटतो. कधी तहानलेला तर कधी संपृक्त वाटतो... आपल्या प्रत्येक भावावस्थेला साजेसं रूप घेणाऱ्या ऐल किनाऱ्याची सोबत वाटते...!

पैल किनारा इतका पैल असतो की तो कधीच दिसत नाही. पण किती सुंदर असतं ते न दिसणं. सगळं एकाकार झालेलं. समुद्र

कुठे संपला आणि आकाश कुठे सुरू झालं हे समजतच नाही. आपण अवाक होऊन पाहात राहातो त्या अथांगाकडे. मात्र कधीकधी ही अनाकलनीयता अस्वस्थ करते. समुद्राची गाज गूढ वाटायला लागते. आजुबाजूच्या गर्दीतही पैल किनाऱ्याचं न दिसणं अनुभवत आपण आपल्या कोषात शिरतो. भोवतीच्या उजेडाचं लख्खपण कोमेजू लागतं. अंतर्मुख मनाला सूर्य उतरणीला लागल्याची चिन्हं जाणवू लागतात. सूर्यास्ताचा क्षण जवळ येऊ लागतो. सूर्यास्त होतो... आणि त्या क्षणार्धात दिसतो समुद्र आणि आकाशाच्या मध्यसीमेवर अखंड पहारा देत असलेला पैल किनारा..! धन्य झाल्यासारखं वाटतं..!

सूर्यास्त पाहण्याच्या आकर्षणाच्या पोटात पैल किनाऱ्याच्या दर्शनाची ही असोशीच दडलेली असेल का?

पहाटपावलं- ६.८.२०१८

# पाचवीतले दिवस-

मी तेव्हा पाचवीत होते. सातारला आजी-आजोबांकडे शिकायला आले होते. आमचा चौसोपी वाडा होता. मागे बाग होती. त्यात आंबा फणस पेरू चिकू अशी फळझाडं आणि गुलाब मोगरा अबोली कोरांटी तगर.. अशी फुलझाडं होती. एक मोठं औदुंबराचं झाडही होतं. त्याच्या खाली छोटसं दत्ताचं देऊळ होतं... आम्ही वाड्यातली मुलं वाडाभर, बागेत लपाछपी खेळायचो. तेव्हा लपायला देवळाचा उपयोग व्हायचा. शेजारच्या वाड्यातली मुलंही मधल्या भिंतीवरून उड्या मारून खेळायला यायची. वाड्यात एक विहीर होती. त्यात भरपूर पाणी असायचं. आमच्या घरात मोठ्या लाकडी पेट्या, मोठमोठे तांब्याचे हंडे, पितळी घंगाळं, सुंदर आणि आता दुर्मिळ वाटतील असे वेगवेगळया आकारांचे कंदील, वेगवेगळया रंगांचे नक्षी कोरलेले काचेचे सट... असं काय काय होतं. त्याचं तेव्हा काही अप्रुप वाटायचं नाही. पण माझ्या खेळातही अशी सगळी छोटी भांडी होती. अजून लक्षात राहिलाय तो खेळातला छोटा पलंग आणि त्याच्या आकाराची मोत्याची मच्छरदाणी..! आता आठवताना जाणवतंय की वाडा

म्हणजे केवढं वैभव होतं... पण त्या समृद्धीची चव तेव्हा कळली नव्हती...!

वाड्यातली पाच-सहा मुलं मिळून एकदा आम्ही घरी सांगून बागेत खेळायला गेलो. थोड्याच वेळात आम्हाला तिथे कंटाळा आला. मग कुणीतरी टुम काढली की आपण ‘चार भिंती’वर (साताऱ्यातलं डोंगरावरचं फिरण्याचं ठिकाण) जाऊ. ठरलं आणि लगेच गेलोही. डोंगरावर चढायला सुरुवात करण्यापूर्वी आमच्यातल्या लहान मुलांना चढायला जमणार नाही म्हणून एका झाडाखाली बसवलं आणि आम्ही ‘मोठे’ बागडत वर गेलो. तिथं बराच वेळ फिरलो. खूप मजा आली... एकदम लक्षात आलं, अंधार पडायला लागलाय. मग खाली उतरलो. झाडाखाली बसवलेल्या लहानांना घेतलं आणि घरी गेलो. तोपर्यंत चांगलाच उशीर झाला होता. घरची सगळी काळजीत पडलेली. आम्ही घरी जाताच प्रश्न सुरू झाले ‘उशीर का झाला? कुठे गेला होतात?’ खरं सांगणं भाग होतं. ऐकून सगळे चांगलेच संतापले. आम्हाला सपाटून मार बसला. सगळ्या मजेचं खोबरं झालं...! पण आता ही उनाड आठवणही त्या दिवसांना निरगसतेची समृद्धी बहाल करणारी वाटते आहे.

तिथे मी एकच वर्ष राहिले. एका वर्षासाठी आधीची चांगली शाळा सोडून म्युनसीपालटीच्या शाळेत शिकण्याचं कुणालाच काही वाटलं नाही. मार्कांचाही काही प्रश्न उद्भवला नाही. पास झाले एवढं पुरेसं होतं. शिक्षणाच्या दृष्टीनं या वर्षात माझ्यात काहीच फरक पडला नाही. पण आता अप्रुप वाटेल अशा कितीतरी गोष्टी मी त्या वर्षात अनुभवल्या. त्यामुळे शाळेच्या इतर वर्षांपेक्षा वाड्याच्या सहवासातलं पाचवीचं ते वर्ष संस्मरणीय झालं. आता तो वाडा.. तिथलं काहीच राहिलेलं नाही. पण आठवतांना तेव्हाचं सगळं दुरावल्यामुळे असेल बहुधा अधिकच वैभवशाली वाटतं आहे. खरं तर आताच्या तूलनेत तेव्हा कितीतरी गोष्टींचा अभाव होता. पण तोही कधी खुपला नाही. न वैभवाचा रुबाब वाटला न अभावांचं वैषम्य..! असेल त्यात मौज करण्याचे निरागस दिवस होते ते..!

पहाटपावलं- १३ ८ २०१८

# गुड न्यूज

गेले दोन-तीन दिवस संततधार पाऊस पडतोय. रस्ते वाहतायत. झाडं निथळतायत. घरांवर साचलेलं पाणी पन्हाळीतून ठिबकतंय थेंब थेंब खाली उभ्या असलेल्या गाडीवर. त्याचा आवाज लक्ष वेधून घेतोय. गाडीच्या बंद काचांवरून पाण्याचे थेंब ओघळतायत. गाडीचा आरसा बाहेर आहे. त्यावरही थेंबांचा पाठशिवणीचा खेळ चाललाय. आधीचे थेंब ओघळून दुसरे थेंब पडण्याच्या क्षणार्धात बाहेरचे दृश्य डोकावतेय आरशात. सुस्नात भवतालाला मोह आवरत नाहीए स्वतःला निरखण्याचा. प्रत्येक मध्यंतरात स्वतःचं वेगळं रूप पाहून तो उत्फुल्ल झालाय अगदी...

वातावरणातला तोच उत्साह ओंजळीत भरून घेऊन सकाळी सकाळी आनंदानं निथळत 'गुड न्यूज...' म्हणतच ती घरी आली. 'अरे वा.. सुंदर सकाळी काय सुंदर बातमी आणलीयस ? मी अधीरपणे विचारलं. 'ओळख ओळख..' तिचा मूड, एकूण आविर्भाव पाहून ती भलतीच खुशीत असल्याचं जाणवत होतं. बऱ्याच शक्यता लक्षात घेऊन एकेक विचारत गेले. तिची मान नाही नाही म्हणत राहिली.. शेवटी न राहवून म्हटलं, 'सांग बाई आता.. किती ताणशील उत्सुकता..' तशी हसत म्हणाली, 'अगं, काही

नाही... आपण भेटलो हीच गुड न्यूज..!’ तिच्या उत्तेजित मूडमधे सामिल होत म्हटलं, हा हा... खरंच की. ही पण गुड न्यूजच आहे. चांगलं वाटायला आणखी दुसरं काही कशाला घडायला हवं. किती दिवसांनी भेटलो आपण. चला आता.. आपण आपली भेट सेलिब्रेट करू...’ ओव्याच्या पानांची गरमागरम भजी आणि फक्कड चहा असा खास पावसाळी बेत केला आणि आम्ही आमच्या भेटीचा आनंद साजरा केला. बऱ्याच दिवसांच्या राहिलेल्या गप्पा झाल्या. एकदम तिला सकाळच्या कामांची आठवण झाली. ‘येते परत’ म्हणत ती उठली आणि निघूनही गेली. तिच्या उत्साहानं निथळत येण्याचा दरवळ घरभर पसरलेला राहिला. कामं भराभर हातावेगळी करून मी बाहेरच्या खोलीत आले. मस्त मूडमधे खूण घालून ठेवलेलं पुस्तक वाचायला घेतलं. बरेच दिवस वाचनाला ग्रीप येत नव्हती. आताही तसंच झालं. लक्ष सारखं खिडकीतून बाहेर जात होतं. बाहेरची उत्फुल्ल हिरवाई पुस्तकात डोकं घालू देत नव्हती...

वाटलं बाहेर बघत नुसतं बसून राहावं. पावसाचा खेळ अनुभवावा... आपल्याच तंद्रीत स्तब्ध बसून राहिले. इतक्यात एक जोराची सर आली. पाऊस थांबलेला पाहून हळूच नजर चुकवून आलेलं ऊन आल्यापावली मागे फिरलं. जाता जाता त्यानं साचलेल्या पाण्यात डोकावलं. पण जातानाचं त्याचं पाठमोरं

प्रतिबिंब नजरेलाही टिपता आलं नाही. साचलेल्या पाण्यानं उन्हाचा पदर सोडून दिला आणि आवेगात कोसळणाऱ्या पावसाच्या सरींचं दिलखुलास स्वागत केलं. मी खिडकीतून अनिमिष पाहात राहिले तो अद्भुत खेळ.. एका लयदार आवेगात कोसळणाऱ्या त्या पावसाच्या सरी खालच्या संपृक्त पाण्याला स्पर्शताच आतून थरथरती पारदर्शी पाणफुलं उगवून येत होती आणि आनंद उधळत क्षणार्धात विरघळूनही जात होती. त्या मोहक पाणफुलांची उघडमिट पाहताना मला सकाळी सकाळी आनंदानं निथळत 'गुड न्यूज' घेऊन घरी आलेल्या मैत्रिणीच्या फुलपंखी डोळ्यांची आठवण झाली..!

पहाटपावलं- २०.८.२०१८

# चंद्र आणि निळा पक्षी

चंद्र-चांदण्यांचा लवाजमा घेऊन रात्र परतत होती. हळूच तिचं बोट सोडून हट्टी मुलासारखा चंद्र एका उंच डौलदार झाडाच्या शेंड्यावरच्या पानांमधे लपून बसला. रात्रीच्या हाकांना न जुमानता तो तिथंच खेळत राहिला. रात्रपाळी संपत आली होती. तिला जायलाच हवं होतं. त्याला सोडून ती निघून गेली. पहाटेची पाळी सुरू झाली. चंद्र पानांआडून पाहात होता आपापल्या घरट्याबाहेर पडलेल्या पक्ष्यांची.. माणसांची लगबग... सूर्योदयाच्या आत त्याला निघावं लागणार होतं. तोपर्यंत तो भोवतीची मजा पाहात होता...

माझ्या रोजच्या जाण्या-येण्याच्या वाटेवरच डावीकडल्या ग्राउंडवर होतं ते झाड. तिथून जाताना माझं हमखास लक्ष जायचं त्या झाडाकडे. तसंच त्याही दिवशी गेलं. मावळायचं विसरून झाडावरच राहिलेला, खाली डोकावून पाहणारा चंद्र दिसला. मी ओळखीचं हसणार तेवढ्यात एक निळा पक्षी आकाशातून झेपावत आला आणि झाडातल्या त्या चंद्राच्या शेजारीच येऊन बसला..! निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर हिरव्या पानांनी गच्च भरलेल्या झाडावर चंद्र आणि शेजारी निळा पक्षी... केव्हाही नाहीसं होऊ

शकेल असं ते अनुपम्य दृश्य डावीकडे वळालेली मान न हलवता रस्त्यातून चालता चालता मी निरखत राहिले. वाटलं, त्या स्वर्गीय सौंदर्याला मी मानवंदना देते आहे..!!

विलक्षण आनंदाच्या अनुभवाचं गारुड मनावर होतं. तशीच चालत राहिले. वळसा घेऊन ग्राऊंडवर गेले. तिथून पुन्हा झाडाकडे पाहिलं. निळा पक्षी उडून गेला होता. चंद्रही दिसेनासा झाला होता... त्यांच्या दुर्मिळ युतीची वार्ता कुणालाही समजली नाही. त्यांना स्वतःलाही नाही. माझ्या मनःपटलावर उमटलेलं ते दृश्य विरून जाऊ नये म्हणून मी धरून ठेवू पाहात होते. आतलं ते दृश्य पुन्हा पाहताना वाटलं, चंद्र तर दूर आकाशात होता. झेपावत आलेला निळा पक्षीही त्याच्या रोजच्या सवयीनं तिथं येऊन क्षणभर बसला असेल... मलाच दिसला चंद्र झाडात असल्यासारखा आणि तो निळा पक्षी त्याच्या शेजारी येऊन बसल्यासारखा..! अद्भुत वाटलेलं ते दृश्य म्हणजे माझ्याच मनाची निर्मिती होती..! काही क्षणांचा तो दृश्याभास आणि मनातल्या मनात दिलेली मानवंदना.. सूर्योदयाच्या लख्ख उजेडात धुक्यासारखं विरून गेलं सारं... मात्र मी अनुभवलेला आनंद स्मृतीत दरवळत राहिला... सूर्योदय, सूर्यास्त, क्षितिज, इंद्रधनुष्य, ग्रहण... निसर्गातली अशी कित्येक 'सौंदर्यस्थळं' म्हणजे दृश्याभासच तर असतात. आपल्या विशिष्ठ स्थानामुळे दुरून साजऱ्या दिसणाऱ्या डोंगराप्रमाणे नजरेला हे

सगळं सुंदर दिसतं. विज्ञानानं त्यामागचं तथ्य सांगितलं तरी त्या 'घटनां'पासून आपण इतके दूर असतो की त्यांचं सौंदर्य अबाधित राहातं... हे सौंदर्य सर्वांना दिसू शकतं. ते सगळ्यांचं असतं. मात्र झाडावरच्या चंद्राजवळ येऊन बसलेला निळा पक्षी ही फक्त मी अनुभवलेली घटना आहे. त्याचा मला झालेला आनंद फक्त माझा आहे.

प्रत्येकाच्या मनात कुठे न कुठे.. कधी न कधी अनुभवलेला फक्त त्याचा असा आनंद कोरलेला असेल. त्याचं असं झाड.. त्यात विसावलेला चंद्र आणि त्याच्या जवळ येऊन बसलेला निळा पक्षी त्याला माझ्यासारखा आनंद देऊन गेलेला असेल...!

पहाटपावलं- २७.८.२०१८

# ‘तुळसमाय’

लोकसाहित्य म्हणजे असंख्य दुर्मिळ गोष्टींचा खजिनाच..! कोणत्याही संस्कृतीचा अभ्यास करायचा तर त्यासाठी हा खजिना लुटता यायला हवा. कोणतंही शीर्षक नसलेल्या आणि कुठेही निर्मात्याचं नाव नसलेल्या लोकसाहित्यात एका पूर्ण समाजाचं पूर्वसंचित दडलेलं असतं. त्याचा अभ्यास आपल्याला वेगळ्याच वातावरणात घेऊन जातो. त्यातली लोकगीतं तर विशेषच मनस्वी वाटतात. बरेच दिवसांपूर्वी कुठेतरी ऐकलेल्या ‘तुळसमाय हिंडू नको गं रानात / ये माझ्या घरी जागा देते अंगणात’ या दोन ओळी चालीसह मनात रेंगाळत राहिल्या ते यामुळंच. कळायला तशा सोप्याच आहेत. तरी ही तुळसमाय म्हणजे आपण पूजनीय मानतो तीच तुळशी की या प्रतिमेखाली आणखी कुणी असेल? रानात हिंडू नको असं तिला कोण म्हणत असेल? माझ्या घरी ये तुला माझ्या अंगणात जागा देते असं म्हणताना तिच्या मनात काय भावना असतील? या दोन ओळीतल्या शब्दांच्या मागून आणखी कुठपर्यंत जाता येईल? विचार करताना जाणवलं की कुण्या अज्ञात स्त्रीच्या या ओळी... तिच्या मनातला नेमका भाव कळायला काही मार्ग नाही. पण ‘हिंडू नको गं रानात’ असं म्हणत ‘तुळसमाय’ला

आपल्या घरी बोलावणाऱ्या या स्त्रीचं मन नक्कीच मोठं असेल..! या विचारापाठोपाठ जाताना घडलेल्या एका प्रसंगाची आठवण झाली...

लांबच्या ओळखीच्या एक बाई अभ्यासासाठी पुण्यात आलेल्या होत्या. एकट्याच राहात होत्या. त्यांच्याविषयी ऐकलं तेव्हा कौतुक वाटलं. एकदा त्यांचा फोन आला 'राहात्या जागेत पाण्याची फार अडचण आहे. दुसरी जागा बघतेय...' त्यांना म्हटलं जागा मिळेपर्यंत या आमच्या घरी. दुसऱ्याच दिवशी त्या जागा सोडून सर्व सामानासह आमच्या घरी आल्या. आम्हाला हे अनपेक्षित होतं. रोज लागणाऱ्या आवश्यक तेवढ्याच गोष्टी घेऊन त्या येतील असं वाटलं होतं. पण घरी आल्यावर स्वागत करणं भाग होतं. सुदैवानं शेजाऱ्यांचा फ्लॅट रिकामा होता. त्यांना विचारून सामान तिथं ठेवलं. आणि त्या आमच्याकडं राहायला लागल्या... बोलण्यातून लक्षात आलं की त्या दुसरी जागा बघतच नव्हत्या. जागा मिळालीच आहे अशा स्वस्थतेत होत्या. हे लक्षात आल्यावर दोन तीन दिवसातच माझे पेशन्स संपले. वागण्यातून माझी नाराजी व्यक्त व्हायला लागली. शेवटी स्पष्टच बोलावं लागलं. प्रत्यक्षात त्यांनी जागा सोडलेलीच नव्हती. आमच्याकडे अधिक काळ सोय होत नाही म्हटल्यावर त्या सामान घेऊन परत गेल्या...!

त्या राहात होत्या तेव्हा चिडचिड होत होती. पण गेल्यावर मनापासून हुश्श झालं नाही. दुरून एक विदुषी म्हणून आदर वाटत होता पण जवळ आल्यावर मात्र त्या विदुषीपणाचा परिचय करून घेतला गेला नाही. ते तेव्हा गौण ठरलं होतं. त्यांना जागा कुठे मिळेल.. म्हणजे त्या घरातून कधी जातील हे अधिक महत्त्वाचं होतं..! त्या निघून गेल्यावर हे जाणवून वाईट वाटण्याला काहीच अर्थ नव्हता... ‘हिंडू नको गं रानात’ असं म्हणत ‘तुळसमाय’ला आपल्या घरी बोलावणाऱ्या त्या अनाम स्त्रीचा विचार करताना या आठवणीनं मला पुन्हा खोलवर अस्वस्थ केलं..!

पहाटपावलं : ३.९.२०१८

# सॉरी म्हणण्याचा धडा

‘अलिकडेच एक पुस्तक वाचलं..’ असं म्हणण्याच्या जागी आता ‘अलिकडेच एक व्हिडीओ पाहिला’ असं म्हणता येऊ लागलं आहे. सोशल मीडियावर अंतर्मुख करणारे काही व्हिडीओज सहज पाहायला मिळतात. ‘सॉरी’ नावाची अगदी लहान फिल्म असलेला व्हिडीओ त्यापैकीच एक..

यामधे दोन छोट्या मुलींना घेऊन वडील मॉलमधे गेलेत. छोटीचा मोठीला धक्का लागतो. वडील तिला ‘सॉरी म्हणायला सांगतात. पण चुकून तर लागला म्हणून ती सॉरी म्हणत नाही. फरशीवर लोळण घेऊन आरडाओरडा करते. वडील तिला पुन्हा पुन्हा सॉरी म्हणायला सांगतात. हे पाहून बघणारे म्हणतात, ‘एक थोबाडीत ठेवून द्या.. ऐकत नाही म्हणजे काय?..’ पण वडील तिला उचलून उभी करतात आणि पुन्हा समजावतात. सॉरी म्हणणं इतकं अवघड नाहीए असं म्हणत सॉरीचा उच्चार करून दाखवतात... शेवटी ती एक दीर्घ श्वास सोडते आणि बहिणीकडे वळून सॉरी म्हणते. बहीण आभार मानते. इतक्यात मोबाइलवर बोलत एक बाई भराभरा चालत येते आणि छोटीला धडकून पुढे निघून जाते. छोटी म्हणते, ‘बघा.. ती तशीच गेली. तिनं सॉरी म्हणायला हवं.’

खरंच होतं ते. वडील त्या बाईजवळ जातात आणि तिला सॉरी म्हणायला सांगतात. बोलण्यात व्यत्यय आला म्हणून ती चिडते पण मग नाइलाजानं म्हटल्यासारखं सॉरी म्हणते. वडील म्हणतात, 'मला नाही तुम्ही माझ्या मुलीला सॉरी म्हणायला हवं..' चुकून लागलं त्याचा एवढा काय इश्यू करायचा म्हणून सॉरी न म्हणता ती वाद घालत राहाते. प्रकरण मॉलच्या मॅनेजरपर्यंत जातं. पण मॅनेजरचंही ती ऐकत नाही. मॅनेजर पोलीसांना बोलावून घेतो. पोलीस तिला बेड्या घालून नेऊ लागतात तेव्हा छोटी पुढे येते आणि त्या बाईला म्हणते, 'सॉरी म्हणणं इतकं अवघड नाहीए. मला वडलांनी शिकवलंय..' कसं ते सांगत ती सॉरी म्हणून दाखवते. तिचा निरागस भाव पाहून त्या बाईचा आतापर्यंतचा सगळा ताठा गळून पडतो. तिला गहिवरून येतं. ती छोटीला सॉरी म्हणते. तेव्हा, 'असूदे, मला माहितीए चुकून धक्का लागला' असं म्हणत छोटी दोन्ही हात पसरून तिच्या जवळ जाते. तिला जवळ घेत ती बाई ओक्साबोक्शी रडू लागते... वडील खुणेनं पोलीसांना जायला सांगतात. सॉरी म्हणण्याचा धडा शिकवून झालेला असतो..!

या छोट्याशा फिल्ममधे बऱ्याच गोष्टी वाखाणण्यासारख्या आहेत. पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे फिल्मचा विषय आणि त्यासाठी निवडलेला अगदी साधा सर्वपरिचित असा प्रसंग.

आपल्या मुलीला जगण्यातला एक महत्त्वाचा धडा शिकवताना वडलांनी दाखवलेलं कौशल्य आणि चिकाटी कौतुकास्पद आहे. यातून छोटी चुकून झालेल्या चुकीबद्दलही सॉरी म्हणायला हवं हे शिकते. त्यामुळं त्या बाईचा चुकून धक्का लागला तरी तिनं सॉरी म्हणायला हवं हे तिच्या लक्षात येतं. पण सगळ्यांनी सांगूनही ती सॉरी म्हणत नाहीए, पोलीस तिला घेऊन चाललेत हे पाहिल्यावर छोटी जेव्हा समजावून सांगत तिला सॉरी म्हणायला लावते तेव्हा सॉरी म्हणण्याचा धडा दुसऱ्याला समजावण्याइतका पक्का झालेला असतो..!

पहाटपावलं : १०.९.२०१८

# ही खरी श्रद्धा..

माझी आजी गोष्टी खूप रंगवून सांगायाची. त्यामुळे आम्ही त्या लक्ष देऊन ऐकत राहायचो. ती एक गाणंही बरेचदा म्हणायची. ते गाणं म्हणजे एक गोष्टच होती. ती गाण्यात गोवल्यामुळे भावपूर्ण वाटायची. आजी हे गाणं अगदी मन लावून म्हणायची. त्या गाण्यातली गोष्ट अजूनही चांगली लक्षात राहिलीय ती तिच्या विलक्षण शेवटामुळे.

या गोष्टीत एक साधू असतो. तो रामभक्त होता. सतत रामनाम घ्यायचा. भेटेल त्याला राम म्हणायला सांगायचा. सगळे म्हणायचे. कुणी त्याला नाही म्हणायचं नाही. एका संध्याकाळी त्याला वाटेत एक गुराख्याचा मुलगा भेटला. गुरं चारून आपल्याच नादात गाणं म्हणत तो घरी परत चालला होता. त्याला थांबवत साधू म्हणाला, 'राम म्हण'. पण साधूचं न ऐकता तो चालत राहिला. साधू त्याच्या मागे जात त्याला राम म्हणण्याचा आग्रह करू लागला. पण मुलगा म्हणेना. याला रामनामाचं काय ओझं झालं साधूला कळेना. तो हट्टाला पेटला. वाटेत येणारे जाणारे मुलाला समजावू लागले. पण मुलगा ऐकेना. नुसतं राम म्हणण्यात याला काय अडचण आहे? लोकांना कळेना. लोकही 'राम म्हण' म्हणत त्याच्या मागे लागले.

पण मुलगा ऐकेना... बघता बघता ही बातमी गावात पसरली. सगळ्यांनाच मुलाच्या राम न म्हणण्याचं नवल वाटलं. हळूहळू या नवलाची जागा रागानं घेतली. शेवटी हे प्रकरण राजाकडे गेलं. राजापुढे मुलाला हजर करण्यात आलं. राजानं 'राम म्हण.' अशी आज्ञा केली. राजापुढे त्याचं काही चाललं नाही. तो म्हणाला महाराज, 'माझी ती वेळ अजून आलेली नाही. पण आपली आज्ञा असेल तर मला म्हणावं लागेल. म्हणतो मी.' त्यानं राजाला नमस्कार केला. जमलेल्या सगळ्या लोकांना नमस्कार केला. खांद्यावरची घोंगडी खाली अंथरली. सगळे आश्चर्यानं हा काय करतोय म्हणून पाहात राहिले. तो घोंगडीवर बसला. डोळे मिटले. तो कशाचं तरी स्मरण करतोय असं वाटलं सगळ्यांना. मग त्यानं पाय पसरले, घोंगडीवर पाठ टेकली आणि सर्वांना ऐकू येईल अशा आवाजात प्राण कंठाशी आणून राम म्हटलं...!

सगळ्यांना अगदी विजय मिळवल्यासारखा आनंद झाला. राम म्हणण्याचं कुणाला काही महत्त्व नव्हतं. पण त्याचा हट्ट मोडून त्याला राम म्हणायला लावलं याचाच त्यांना आनंद होता. राजा साधूला म्हणाला, मुलानं घेतलं रामाचं नाव. झालं ना समाधान? साधूनं मान हलवली. मग राजा मुलाला म्हणाला, 'ऊठ, आमचं काम झालं. आता तू जाऊ शकतोस. पण मुलगा उठेना. राजानं मोठ्यानं पुन्हा सांगितलं. पण मुलगा उठेना. त्याच्या हट्टीपणाचं

नवल करत सगळे पाहात राहिले. राजानं सेवकाला त्याला उठवायला सांगितलं. सेवक त्याच्या हाताला धरून त्याला उठवू लागला. पण त्याच्या हातातून तो निर्जीव झालेला हात खाली गळून पडला. सगळ्यांनी डोळे विस्फारले. त्यांच्या काळजात चर्र झालं...!

'राम म्हणणे म्हणजे आत्मारामाशी एकरूप होणे' इतका मनस्वी अर्थ त्या मुलाइतका तिथल्या कुणालाच कळलेला नव्हता..!

पहाटपावलं : १.१०.२०१८

# गतकालातिल लेणी

वर्षं नुसतीच जात नाहीत कधी. ती त्वचेला एकेक सुरकुती देऊन जातात. हे केवळ माणसालाच लागू नाही. काळाचे घाव सोसून सुरकुतलेले जुने वाडेही हळूहळू ढासळायला लागतात. मग धोका नको म्हणून वाड्याचा उरलासुरला भागही उतरवला जातो. एकेकाळी वैभवाचं प्रतिक असलेली वास्तू भुईसपाट होऊन जाते. वाड्याचं अस्तित्व पुसलं जाण्याचं दुःख ओसरू लागतं. आणि बघता बघता माणसाच्या माघारी त्याचा वंश चालू राहावा तशी वाड्याच्या जागी अनेक मजली इमारत उभी राहते. वाडा पडला तरी वाड्यातल्या काही दुर्मिळ वस्तू बरेचदा जतन केल्या जातात. त्या वस्तू म्हणजे गतकाळाच्या आठवणी असतात. त्यांच्याशी निगडित व्यक्तींच्या आठवणी असतात. काळाच्या त्या टप्प्याकडे दुरून पाहताना त्यावेळच्या संस्कृतीची, राहाणीची, संस्कारांची आठवण होत राहाते...

एका अत्याधुनिक घरात जाण्याचा योग आला. तिथं जागोजागी अशा वस्तू ममतेनं सजवून ठेवलेल्या दिसल्या. त्यात एक अष्टकोनी फ्रेम होती. वेगवेगळया रंगांचे मणी ओवून एक सुंदर रांगोळीसारखी गोल कलाकृती बनवलेली फ्रेममधे जतन केलेली

होती. त्या प्रशस्त हॉलमधे दर्शनी भागात मांडून ठेवलेली ती फ्रेम घरी येणाऱ्या प्रत्येकाच्या नजरेत भरत होती. माझंही लक्ष तिनं वेधून घेतलं. मी त्या फ्रेमचा एक फोटो काढला. फोटो जवळून पाहताना नकळत मी त्या काळात पोचले... कित्येक जुन्या घरात अशा फ्रेम्स लावलेल्या असायच्या. सगळी कामं उरकून दुपारच्या निवांत वेळी मणी, दोरे असं साहित्य घेऊन बसलेल्या, गप्पा मारत त्यातला एकेक मणी ओवत असलेल्या स्त्रिया डोळासमोर आल्या. त्यावेळची स्त्रियांची सामाजिक स्थिती लक्षात आली. मनात आलं, कोणत्याच अर्थानं फारसं बाहेर पडू न शकणाऱ्या स्त्रिया आपल्या दबलेल्या भावना अशा हरप्रकारे सजवून ठेवत असतील. असंच वातावरण सर्वत्र असण्याच्या त्या काळात त्यांना उमगतही नसेल की त्यांची घुसमट होतेय. आणि वेळ घालवण्यासाठी त्या करत असलेली कलाकुसर म्हणजे त्यातून बाहेर पडण्याचा काव्यात्म मार्ग आहे. एकमेकींच्या नादानं, एकमेकींकडून शिकून घेत त्या विणत, भरत, ओवत, रेखत राहायच्या. सडा सारवण करताना, दारात रांगोळी काढताना, जात्यावर दळताना, भाकरी थापताना काय काय येत असेल त्यांच्या मनात? या प्रश्नामागे जात झालेला माझ्या मनाचा प्रवास त्यांच्या मनाच्या प्रवासाशी समांतर असणं अवघडच होतं. पण उगीचच वाटलं आणि जाणवलं की सडा-सारवण करताना त्या पाण्याबरोबर घरादारासाठी शुभेच्छा शिंपत

असतील. दारात रेखत असतील मनात रोखून ठेवलेल्या स्वगतांचे ठिपके आणि जोडून टाकत असतील ते मनातल्या दबलेल्या भावनांच्या रेषांनी. आणि मग वेगवेगळे रंग भरून झाकून टाकत असतील ते 'ठिपके' आणि 'रेषा'... त्यावेळी नकळत त्यांच्या मनातले सारे आवेग रिते होत असतील... एक फ्रेम पाहून कुठे कुठे जाऊन आले मी...!

त्या फ्रेमचा फोटो मोबाइलमधे सेव्ह करून ठेवला होता. तो मैत्रिणींना पाठवताना त्याखाली लिहिलं-

'धाग्यात गुंफले त्यांनी ते मणीच की आठवणी
झाकलाय खाली धागा, की गतकालातिल लेणी?'

पहाटपावलं : ८.१०.२०१८

# एका व्रताचा भावार्थ...

निवृत्तीनंतर दिनचर्या धावपळीची राहात नाही. निवांतपणा लगेचच अंगवळणी पडतो. तारीख-वार विसरायला होतं. एकदा काहीतरी प्लॅनिंग करण्यासाठी सहज कॅलेंडर पाहात होते. भरपूर वेळ असल्यामुळे कॅलेंडर हातातच घेऊन बसले. एरव्ही तिथी वगैरे माहिती आवर्जून पाहिली जात नाही. पण जवळून पाहिल्यामुळे प्रत्येक तारखेच्या भोवती बरीच माहिती असते हे समजलं. तारखेच्या एकेका चौकोनातली माहिती वाचत गेले. वाटलं, कितीतरी दिनविशेष ओलांडून आपण नुसते तारखेच्या आकड्यांमागेच धावत असतो... मग जरा रस घेऊन प्रत्येक चौकोन नीट पाहू लागले. सप्टेंबर महिना चालू होता. अठरा तारखेच्या चौकोनात 'भाद्रपद शु. ९, अदुःख नवमी, श्री चंद्र जयंती, उदासी सांप्रदाय महोत्सव- वाशिम' असं लिहिलेलं दिसलं. त्या चौकोनानं मला थांबवून ठेवलं. त्यातली प्रत्येकच गोष्ट विचारात पाडणारी, उत्सुकता जागवणारी वाटली. पण सर्वात अधिक लक्ष वेधलं ते 'अदुःख नवमी'नं..! हे नाव मी पूर्वी कधी ऐकलं नव्हतं. त्यानं मला आकर्षित केलं. काय असेल याचा अर्थ? याची उत्सुकता वाटली. मिळवलेल्या माहितीतून असं समजलं की 'अदुःख नवमी' हे एक

व्रत आहे. हे व्रत सर्वांसाठी असतं पण प्रत्यक्षात फक्त स्त्रियाच ते करतात... या नवमीला पार्वतीची पूजा केली जाते. अखंड सौभाग्य प्राप्तीसाठी बंगालमधे हे व्रत केलं जातं... इथं महाराष्ट्रात हे व्रत फारसं रूढ असलेलं ऐकिवात नाही.

ही माहिती मिळाली तरी माझं विचारचक्र थांबलं नाही. अदुःख या शब्दानं मला त्याच्या अर्थवलयात बराच वेळ फिरवत ठेवलं... आवर्जून असा शब्द वापरलाय त्या अर्थी तो सुखाला समानार्थी असणार नाही. ‘सर्वांसी सुख लाभावे...’ या आपल्या सर्वपरिचित प्रार्थनेत सुरुवातीला ‘सुख लाभावे’ असं म्हटलेलं असूनही शेवटी पुन्हा ‘कोणी दुःखी असू नये..’ असं म्हटलं आहे. म्हणजे सुखासाठी काहीतरी करणं आणि दुःख होऊ नये म्हणून काहीतरी करणं या दोन गोष्टीत सूक्ष्म फरक आहे... विचार करता करता मनात आलं की ‘अदुःख नवमी’कडे एक संकल्पना म्हणून पाहता येईल. परंपरेत रूढ झालेलं स्त्रियांसाठीचं एक व्रत एवढाच याचा अर्थ सीमित न ठेवता त्याचा पैस आपल्या विचारांनी, कृतींनी विस्तारता येईल. त्यात कालसुसंगत नवा अर्थ भरता येईल...

आपण वेगवेगळी निमित्तं शोधून सामूहिक, घरगुती आनंदोत्सव साजरे करत असतो. आपल्या जिवलगांना त्यात सामिल करून घेऊन आनंदाचे वाण वाटत असतो. पण ‘कोणी

दुःखी असू नये’ यासाठी आवर्जून काय करतो? करत नसू तर काय करता येईल? वैयक्तिक, संस्थात्मक पातळीवर वेगवेगळ्या प्रकारे दुःख-निवारणाचे कार्य होत असते... पण अनेक सणवार.. व्रतवैकल्ये आपल्या रोजच्या जगण्याचा भाग झालेली आहेत. ती निष्ठेनं केली जातात. त्यात ‘कोणी दुःखी असू नये’ यासाठी काहीतरी करण्याचे एखादे ‘व्रत’ नव्याने सामिल करता येईल का? किंवा ‘अदुःख नवमी’सारख्या आपल्या परंपरेत आधीपासूनच असलेल्या व्रताला त्याचा मूळ अर्थ बहाल करून ते पुनर्स्थापित करता येईल का?

पहाटपावलं : १५.१०.२०१८

# निरागस होण्याची मुभा

डीजे.. डॉल्बीला बंदी..., बंदीला विरोध.. पर्यावरणाचे संरक्षण.. यावर माध्यमांमधे होणाऱ्या चर्चांकडे... 'नेमेची येतो मग पावसाळा' म्हणून बघत घराघरांमधे गणपतीच्या स्वागताची जोरात तयारी सुरू होते. मोदकांची पूर्वतायारी, पत्री, दुर्वा गोळा करणे, पाहुण्यांची व्यवस्था आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे गणपतीची आरास... हे काम मुलांचं. यंदा काय वेगळं करता येईल याचा विचार करण्यापासून ते तो आमलात येईपर्यंतचा काळ फार मजेत जातो. कुठल्याही वादविवादात न पडता, सामाजिक प्रश्न सोडवण्याच्या मागे न लागता आपल्यापुरता पर्यावरणाचा विचार करून कितीतरी विवेकी सर्वसामान्य कुटुंबांमधे सण साजरे होत असतात..

सोसायटीतल्या गणपतीचा माहोल तर आणखीनच उत्साहवर्धक असतो. त्यात सजावटीबरोबर करमणुकीचे कार्यक्रम आणि वेगवेगळया प्रकारच्या स्पर्धा यांचे आकर्षण जास्त असते. नृत्य, नाट्यछटा, गाणी... अशा विविध कार्यक्रमांमुळे सोसायटीतल्या मुलामुलींच्या कलागुणांना वाव मिळतो, प्रोत्साहन मिळतं, सर्वांसमोर काही सादर करण्याचा सराव होतो... रांगोळी,

चित्रकला, निबंध, पाककला, धावणे, सायकलिंग, चमचा-लिंबू... अशा वेगवेगळ्या स्पर्धांमुळे लहान थोर सर्वांमधे उत्साहाचं वातावरण निर्माण होतं. या सगळ्यामधे आयोजन हा सर्वात महत्त्वाचा भाग असतो. प्रत्येकात यापैकी काही ना काही गुण असतात. ज्याला जे जमेल त्याला ते करण्याची संधी मिळते...

घरी-दारी चाललेल्या अशा कोणत्याच उत्सवात फारसा सक्रीय सहभाग न घेणाऱ्यांपैकी काहीजण दुरून सगळ्याचा आनंद घेतात तर काहीजणांना या आनंदाच्या जागा दिसू शकत नाहीत. बंद दारांमधूनही आत घुसून कानांवर, छात्यांवर आदळणाऱ्या कर्णकर्कश्श आवाजांनी ते इतके गलितगात्र होतात की त्यांच्यात असा आनंद घेण्याची क्षमताच उरत नाही. दिवसेंदिवस अनावर होत चाललेल्या या उन्मादी वास्तवात तग धरून राहण्यासाठी ते आपला समजुतदारपाणा कसाला लावतात. जीव मुठीत धरून थकलेल्या नजरेने शोधत राहतात स्वतःला सावरण्याच्या जागा. एकटं वाटलं की काहीतरी निमित्त योजून एकत्र येतात.. संवाद साधू पाहतात...

सगळीकडले उत्सव पार पडल्यावर आमचीही पोस्टपोन झालेली पुस्तकभिशी ठरली. जवळ राहणारी एक मैत्रीण सगळ्यात आधी आली. आल्याआल्या तिनं उत्साहानं एक व्हिडीओ

दाखवला. नुकताच बसायला लागलेला आपला सात-आठ महिन्यांचा नातू गोड हसत कशा टाळ्या वाजवतोय हे दाखवताना तिचा चेहरा आनंदानं फुलून गेला होता. ती बरेच दिवस त्याला टाळ्या वाजवायला शिकवत होती पण त्याला जमत नव्हतं. त्यामुळं गणपतीच्या पाच दिवसात तो आपणहोऊन टाळ्या वाजवू लागला याचा तिला मनस्वी आनंद झाला होता. व्हिडीओ पाहून मी म्हटलं, 'अगं, तो टाळ्या वाजवायला नाही, आनंद घ्यायला शिकलाय...!' तिला ते अगदीच पटलं. हळूहळू सगळ्या मैत्रिणी जमल्यावर मग 'आनंद घेता येणं' या विषयावरच चर्चा सुरू झाली आणि आपापल्या नातवंडांची कौतुकं सांगण्यात सगळ्या रमून गेल्या...

मनात आलं, 'आनंद घेता येणं' हा एक आयुष्याकडे बघण्याचा कलात्मक दृष्टिकोन असू शकतो. मात्र त्यासाठी अनेक पावसाळे अनुभवून झाल्यावर गाठीशी जमा झालेल्या शहाणपणाला पुन्हा निरागस होण्याची मुभा देता यायला हवी..!

पहाटपावलं : २२.१०.२०१८

# आनंदाची शिकवणी

एका मैत्रीणीची मुलगी परदेशी जायची होती. अनेक स्तरांवर पूर्वतयारी चालली होती. त्याचाच एक भाग म्हणून तिनं भाज्या कशा कराव्यात हे शिकण्यासाठी क्लास लावला होता. हे ऐकून मला नवलच वाटलं. कितीतरी गोष्टी बघून बघून सहज शिकल्या जातात खरंतर. पण हल्ली सगळं काट्या-चमच्यावर तोलून मापून, अगदी तंत्रशुद्ध शिकवलं जातं... मेंदू तल्लख करण्याची पाच तत्त्वे, प्रभावी व्यक्तिमत्वासाठी प्रभावी उपाय, डिप्रेशनमधून बाहेर कसे पडाल.., पंधरा दिवसात वजन कमी करा.. अशा हरप्रकारच्या शिकवण्यांच्या जाहिराती सगळीकडे झळकत असतात.

परवा तर चक्क 'हॅपीनेस क्लास'ची जाहिरात पाहण्यात आली. हातातलं काम टाकून मी ती जाहिरात उत्सुकतेनं पाहू लागले. त्यात आनंदानं जगण्याची कला शिकवण्याविषयी काय काय लिहिलेलं होतं. 'काय एकेक स्तोम माजवतात लोकं.. असं काय शिकून आनंदानं जगता येतं का?' ही माझी पहिली प्रतिक्रिया झाली. जाहिरातीचा कागद बाजूला टाकून मी परत कामाला लागले. तरी मनातून ती जाहिरात जाईना. परत शोधून ती पाहिली

तर योगा, मेडीटेशन, प्राणायाम, आहार नियंत्रण... अशा नेहमीच्याच मार्गांविषयी, त्याच्या फायद्यांविषयी लिहिलेलं होतं. पुन्हा कागद बाजूला गेला. पण वाटत राहिलं की या सगळ्याची आपल्याकडून अतिपरिचयात अवज्ञा तर होत नाहीए ना? काही गोष्टी आपल्याला ऐकून माहिती असतात. त्याच्या खोलात आपण शिरत नाही. समजलेलं प्रत्यक्ष करून पाहात नाही. केलं तरी त्यात सातत्य ठेवत नाही. पण सगळं करून झालंय या थाटात आपण नव्या गोष्टींना स्तोम ठरवून मोकळे होतो... जाहिरातीच्या निमित्तानं अंतर्मुख होऊन विचार करताना ध्यानधारणा, प्राणायाम इत्यादींविषयी पूर्वी वाचलेलं आठवू लागलं...

आपल्या श्वासाचं निरीक्षण केलं तर लक्षात येतं की भावनांनुसार प्रतिक्षिप्तपणे आपला श्वास कमीजास्त जोरात होतो. भावना जर श्वसनावर प्रभाव टाकत असतील तर श्वसन नियंत्रित करणाऱ्या प्राणायामाच्या आधारे भावनांचं व्यवस्थापन करता येईल. त्या प्रक्रियेत भावनांचा उगम आणि स्वरूप लक्षात येईल. भावनांच्या गदारोळात हरवलेलं सूख आपल्याला सापडू शकेल... असंही कुठेतरी वाचलेलं आठवलं की आपण करत असलेल्या प्रत्येक कामात आनंद शोधावा. ही शोध-प्रक्रिया सर्जक होऊ शकते. त्यातून निर्मितीचा आनंद मिळू शकेल. आणखी कुठेतरी हॅपी हार्मोन्सविषयी वाचलं होतं. चार प्रकारच्या हार्मोन्समुळे म्हणे

माणसाला आनंद मिळतो. व्यायाम, खळखळून हसणं, ठरवलेल्या कामाची परिपूर्ती आणि त्यासाठी मिळालेली शाबासकी.. झालेलं कौतुक, दुसऱ्यासाठी काही करण्यातून मिळालेलं समाधान, आणि प्रेमानं जवळ घेणं, घेतलं जाणं... यातून हे हार्मोन्स शरीरात तयार होतात आणि त्यातून आनंद ही भावना निर्माण होते.

त्या जाहिरातीच्या निमित्तानं एकामागून एक काय काय आठवत राहिलं. 'आपल्याला मोर हवा तर आपणच मोर व्हायचं..' हे काव्यात्म तंत्रही आठवलं.. त्यासरशी मनात आलं, आनंदाच्या शिकवणीचा बाहेर कुठे शोध घेण्यापेक्षा आपल्यासाठी आपणच ती सुरु करावी. आपल्यातल्या विखुरलेल्या स्वतःला गोळा करून समोर बसवावं आणि म्हणायला लागावं- चल, आपण जगण्यावरती प्रेम करूया..!!

पहाटपावलं : २९.१०.२०१८

## आत्मविश्वासाचं मोल

एका व्यंगचित्रात दोन मुलं दाखवली होती. एकाच्या हातात प्रथम क्रमांक असं लिहिलेलं प्रमाणपत्र होतं. ते हातात घेऊन तो शिक्षा केल्यासारखा उभा होता. दुसऱ्याच्या हातात तिसरा क्रमांक असं लिहिलेलं प्रमाणपत्र होतं. त्यानं ते विश्वकप हातात धरून उंचवावं तसं उंच धरलं होतं आणि त्याच्या सर्वांगातून आनंद ओसंडत होता. चित्रकारला त्यातून दोन दृष्टिकोन दाखवायचे असतील. किंवा आणखी काही. बघणाऱ्याचे अन्वयार्थ आणखी वेगळे असतील. मला वाटलं, आपण कुठे पोचलो या बरोबरच कुठून तिथपर्यंत पोचलो यावरही समाधान अवलंबून आहे. त्या व्यंगचित्रातल्या तिसऱ्या नंबरचा मुलगा माझ्या स्मरणात राहिला...

'एकटीनं केलेला प्रवास' या विषयावर आमच्या गप्पा चालू होत्या. एकेकीनं कितीतरी लांबलांबचे प्रवास अडचणींना तोंड देत केले होते. त्यांच्या मानानं मी केलेला प्रवास अगदीच छोटा होता. तरी मी तो अनुभव त्या तिसऱ्या नंबरच्या मुलाच्या रुबाबात सांगितला. कारण लहानपणापासून मी कधीच कुठे एकटी गेले नव्हते. अगदी गावातल्या गावात कुठे जायचं असलं तरी मला सोबत लागायची.

या पार्श्वभूमीवर एकदा एका कार्यक्रमासाठी हैदराबादला एकटं जायची वेळ आली. लांबचं शहर असूनही काहीकाही निमित्तांनी पूर्वी बरेचदा जाणं झालं होतं. शिवाय सोबत बराच उत्साह होता त्यामुळं एकटीनं जायची विशेष काळजी वाटली नाही. एकटीनं जायचं म्हणून मी विमानानं जायचं ठरवलं. विमानतळावर जाण्या-येण्याची सोय केली. सगळं प्लॅनिंगप्रमाणे सुरू झालं. विमान आलं. सुटलं. जरा स्थिरस्थावर झाल्यावर खिडकीतून बाहेर लक्ष गेलं. हात लावता येईल इतके जवळ ढगांचे पांढरे शुभ्र पुंजके.. खाली नकाशातल्या सारख्या मानवी अस्तित्वाच्या रेषा.. एका जागी बांधून बसलेली मी एरव्ही सहज साध्य नसलेल्या उंचीवरून दिसणारी दृश्यं अनुभवत होते... तेवढ्यात भोवती लगबग जाणवली. विमान खाली उतरत होतं.. एकेक टप्पे पार करत रुबाबात बाहेर पडले. घ्यायला गाडी येणार म्हणून निवांतपणे आतल्या आनंदात मग्न राहिले. पण गाडी आलीच नाही. बरेच फोन करून पाहिले. कुणाचाही फोन लागेना. तेव्हा खरी खाली उतरले..! पण भीतीला डोकवायला मनात जागाच नव्हती. एक टॅक्सी ठरवली आणि लिहून घेतलेला पत्ता सांगून मैत्रीणीच्या घरी गेले.

तिथं गेल्यावर समजलं की मला घ्यायला येणाऱ्या मैत्रीणीनं स्वतः येण्याऐवजी दुसरीला पाठवलं होतं. विमानाची वेळ आधीची

सांगितली गेली. त्यानुसार ती दुसरी मैत्रीण आली आणि मी नाही म्हणून परत गेली.. त्यानंतरच्या प्रत्येक गोष्टीत वेगवेगळा अपेक्षाभंग होत राहिला. कार्यक्रमाच्या जागी सकाळपासूनच हजेरी लावली. पण फार कुणी ओळखीचं नव्हतं. उपऱ्यासारखं वाटत राहिलं. कार्यक्रम, उपस्थिती.. सर्वच निराशाजनक...

पण यापैकी कोणत्याच अपेक्षाभंगानं मला अस्वस्थ केलं नाही. एवढ्या दूरच्या शहरात मी एकटी जाऊ शकले, कोणी घ्यायला आलं नाही तरी विचलित झाले नाही यातून मिळालेल्या आत्मविश्वासानं मला एक नवी समृद्धी दिली होती. माझ्यातल्या न आजमावलेल्या क्षमतांचा प्रत्यय मला आला होता. इतर कशाहीपेक्षा याचं मोल कितीतरी जास्त होतं..!

पहाटपावलं : ५.११.२०१८

## छंद कौतुकाचा...

आमच्या एका स्नेह्यानी निवृत्तीनंतर एक आगळावेगळा छंद जोपासल्याचं ऐकून होतो. त्याविषयी जाणून घ्यायची उत्सुकता होती. एकदा त्यांना भेटायला गेलो तेव्हा गप्पांमधून हा छंद त्यांना कसा सापडला ते समजलं... त्यांनी नोकरीतली सगळी वर्षे मिळेल ते काम कसलीही कुरकुर न करता प्रामाणिकपणे केलं होतं. पण वरीष्ठांनी कधी त्यांचं कौतुक केलं नाही. त्यांनीही त्याची अपेक्षा ठेवली नाही. आपण करतोय ते आपलं कर्तव्यच आहे अशी त्यांची भावना असे. कामातून मिळणाऱ्या समाधानावर ते खुश असत. मात्र स्वतः कामचुकारपणा करणारे काही सहकारी जेव्हा त्यांच्या प्रामाणिकपणाचा फायदा घेऊन वर त्यांची टिंगल करायचे तेव्हा ते दुःखी होत...

निवृत्तीनंतर त्यांनी मनाशी ठरवलं की आता नोकरीची वेळ गाठायची नसली तरी दिनचर्या फारशी बदलायची नाही. त्यांनी बसचा पास काढला. रोज ठराविक वेळेला बाहेर पडायला ते सोईचं झालं. शहरातले बरेच नवे रस्ते समजले. सुरुवातीला असं निरुद्देश फिरण्याचा आनंद ते घेत राहिले. एकदा वृत्तपत्र वाचत असताना, 'स्व-खर्चाने रस्त्यातले खड्डे बुजवायचं काम करणारा पिता' या

मथळ्यानं त्यांचं लक्ष वेधून घेतलं. बातमी वाचून त्यांना त्या गृहस्थांचं कौतुक वाटलं.

त्यांचा पत्ता शोधून ते त्यांना भेटायला गेले. बोलण्यातून समजलं की रस्त्यातल्या खड्ड्यामुळे झालेल्या अपघातात त्यांचा मुलगा त्यांना गमवावा लागला होता. त्याविषयी तक्रार करत बसण्यात अर्थ नव्हता. खड्डे बुजवून रस्ता दुरुस्तीचं काम होईपर्यंत आणखी कितीजणांना प्राण गमवावे लागतील... म्हणून त्यांनी ठरवलं की मुलाच्या दुःखात झुरत बसण्यापेक्षा आपल्या कुवतीनुसार आपणच जमेल तेवढे खड्डे बुजवावेत... आणि ते कामाला लागले. गरजेच्या मानानं त्यांची कुवत अगदीच थोडी होती. तरी जमेल तेवढं काम करत असल्याचं समाधान त्यांना मिळत होतं. या कामाबद्दल त्यांचं कौतुक करणारे थोडेच. दुर्लक्ष करणारे, ही कामं ज्यांची आहेत त्यांच्याकडून ठणकावून करून घ्यायला हवीत असं म्हणून त्यांचा हिरमोड करणारे बरेच होते. पण ते स्वतःला पटलेलं निष्ठेनं करत होते... त्यांची हकिगत ऐकून आमचे स्नेही प्रभावित झाले. नोकरीमधे त्यांच्या वाट्याला आलेल्या उपहासाची त्यांना आठवण झाली. अशा गोष्टींना किती सकारात्मक प्रतिक्रिया देता येते ते ऐकून त्यांना गहिवरून आलं. बरोबर नेलेला पुष्पगुच्छ देऊन त्यांचं मनभरून कौतुक करून ते परतले.

परत येताना त्यांच्या मनात काहीसं समाधान आणि बराचसा हुरूप होता. त्यांच्या मनात एक कल्पना आली. आपल्यापरीनं काम करत राहणाऱ्या अशा छोट्या माणसांचा शोध घ्यायचा, त्यांना घरी जाऊन भेटायचं, त्यांचा सविस्तर परिचय करून घ्यायचा, त्यांच्या कामाची माहिती करून घ्यायची, थोडंफार आर्थिक सहकार्य करायचं आणि त्यांचं कौतुक करून परत यायचं... आपल्या कल्पनेवर ते खुश झाले. त्यांनी ही कल्पना लगेच आंमलात आणायला सुरुवात केली. बसनं रोज बाहेर पडायला त्यांना एक सुंदर निमित्त मिळालं. नोकरीत वाट्याला न आलेल्या कौतुकाची भरपाई ते इतरांचं कौतुक करून करू लागले..!

पहाटपावलं : १२.११.२०१८

## काहीच निरर्थक नसतं..

रस्त्यात जागोजाग खड्डे.. पावसाळ्यात त्यात पाणी भरतं. पाऊस थांबला, रस्ते वाळले तरी खड्ड्यांमधे साचलेलं पाणी तसंच राहातं बरेच दिवस. मग त्यावर डास घोंघावू लगतात. चिलटं फिरू लागतात... हे दृश्य दुर्मिळ नाही. आणि आकर्षक, लक्षवेधीही नाही. तरी चालता चालता एकदा अशा खड्ड्याकडे सहज लक्ष गेलं. एक कावळा चोचीत कशाचा तरी वाळका तुकडा घेऊन तिथं आला. त्यानं तो खड्ड्यातल्या पाण्यात टाकला आणि उडून गेला. परत येताना पाहाते तर तो परत तिथं आलेला. चोचीनं मऊ झालेल्या त्या तुकड्याचा फडशा पाडत होता. खाऊन, पाणी पिऊन झाल्यावर तो उडून गेला. रस्त्यानं जातायेता सहज दिसलेलं हे दृश्य पाहून मनात आलं, जिला आपण घाण समजतोय, यामुळे रोग फैलावतात म्हणून तक्रारी करतोय ती या छोट्या जिवांसाठी पाणपोई झालीय...!

ते दृश्य आणि त्या संदर्भातले विचार घरी आल्यावरही मनात रेंगाळत राहिले. हळुच विचारांनी त्या दृश्याचा ठाव सोडला. ते स्वतंत्र झाले. आणि त्यांनी एक शहाणा निष्कर्ष हाती ठेवला. पाऱ्यासारखा तो निसटून जाऊ नये म्हणून डायरी उघडून त्यात

लिहिलं- ‘कोई भी चीज खाली नहीं होती / कोई भी चीज बेवजह नहीं होती / हर चीज का कुछ न कुछ मकसद होता है / जीने का अपना अपना अंदाज होता है..!

डायरीतली जुनी पानं चाळताना या ओळींकडे लक्ष गेलं आणि हे सगळं आठवलं... ‘कोई भी चीज बेवजह नहीं होती’ या ओळीनं मला नव्यानं विचारात पाडलं... अगणित वस्तूंनी भरलेल्या जगातल्या प्रत्येक वस्तूच्या अस्तित्वाला कोणता समर्थनीय हेतू असेल? हे गळून पडलेलं पक्षाचं पीस... याच्या इथं गळून पडण्यामागे काय हेतू असेल? मन दिसेल त्या वस्तूच्या असण्याचा हेतू शोधू लागलं.. बराच वेळ हेतूंच्या मागे फिरून झाल्यावर ‘जीवो जीवस्य जीवनम्’ हे वचन आठवलं. वाटलं, या वचनाच्या आधारे प्रत्येक असण्याचा अर्थ समजून घेता येणं शक्य आहे..

पण माणसाला केवळ जिवंत राहाणं पुरेसं वाटत नाही. आपलं जगणं अर्थपूर्ण असावं असं वाटतं. किमान आपल्या असण्याचं कुणाला ओझं होऊ नये अशी प्रत्येकाची इच्छा असते. आमच्या ओळखीतल्या एक वृद्ध बाई कित्येक दिवस अंथरुणाला खिळून होत्या. त्यांचं सगळं दुसऱ्याला करावं लागायचं. एक दिवस त्या गेल्याचं समजलं. वाटलं, सुटल्या बिचाऱ्या. प्रथा म्हणून भेटायला

गेले तर त्यांची सून धाय मोकलून रडत होती. मला नवल वाटलं. खरंतर त्यांच्या बरोबर तीही त्रासातून सुटली होती. पण जरा सावरल्यावर ती म्हणाली, ‘त्यांची सेवा करण्यामुळं मी या घरात मानानं जगत होते. आता माझ्या असण्याला काय अर्थ?’... म्हणजे ज्या व्यक्तीचं जगणं इतरांच्या दृष्टीनं निरर्थक ठरलेलं होतं ती व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या जगण्याला अर्थपूर्णता देत होती...! परतताना मनात आलं, खरंच कोणतंही अस्तित्व विनाकारण असत नाही.. प्रत्येक असण्याला काही ना काही समर्थन असतंच..!

पहाटपावलं : १९.११.२०१८

# ज्येष्ठोत्सव

आपण एकत्र येण्यासाठी, आनंद मिळवण्यासाठी कसले ना कसले उत्सव सतत आयोजित करत असतो. संगीत हा एक विषय डोळ्यासमोर आणला तरी त्याचेच कितीतरी लहान मोठे उत्सव वर्षभर जागोजाग चालू असतात. आपण त्यातून संगीताचा आस्वाद घेतो. अमूर्त आनंदाचा अनुभव घेतो. साहित्य-क्षेत्रातही अनेक स्तरांवर विविध कार्यक्रम होत असतात. अशा कार्यक्रमांमुळे आपल्याला आपल्या मर्यादित परीघाबाहेरच्या जगाचं दर्शन घडतं. आपल्या विचारकक्षा रुंदावतात. त्यातून जगण्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन घडत राहातो. वर्षभरातले सगळे सणही रोजच्या दिनचर्येच्या साच्यातून बाहेर पडायला अवसर देणारे असतात. अशा प्रत्येक उत्सवातून आपण जगण्यासाठी उमेद, उत्साह मिळवत असतो.

काही दिवसांपूर्वी यापेक्षा एका वेगळ्या उत्सवात सहभागी होण्याची संधी मला मिळाली. कार्यक्रमाचं नाव होतं ज्येष्ठोत्सव. या नावानंच मला खुश केलं. ज्येष्ठोत्सव- ज्येष्ठ असण्याचा उत्सव.. एकप्रकारे जिवंत असण्याचाच उत्सव.. वा..! अशा उत्सवाची सर्वात जास्त गरज आहे. कारण तरूण वयात काहीतरी करून

दाखवण्याची आंतरिक ऊर्मी जगण्याला बळ देत असते. पण वय वाढत जातं तशी सामान्य माणसाची शारीरिक, मानसिक, बौद्धिक क्षमता कमी होत जाते. हळूहळू त्याचं उपयोग-मूल्य घटत जातं. ऐन उमेदीच्या काळात घरादारावर ‘राज्य’ करणाऱ्या माणसांच्या वाट्याला उपेक्षा येऊ लागते. त्यांचं ओझं वाटू लागतं. तरी एकेकाळी त्यांनी पार पाडलेल्या जबाबदाऱ्यांचं, कुटुंबासाठी खाल्लेल्या खस्तांचं स्मरण ठेवून बरेचजण त्यांचा मान राखतात. सामाजिक पातळीवरही हे दृश्य अगदीच अपवादात्मक नाही. सरकारकडूनही आता ज्येष्ठ व्यक्तींना सर्व प्रकारचा प्रवास, कर, व्याजदर अशा बऱ्याच बाबतीत सवलती मिळत आहेत. त्यामुळं त्यांचं जगणं सुकर झालेलं आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे हल्ली त्यांना म्हातारे, वृद्ध, म्हणण्याऐवजी ‘ज्येष्ठ’ असं संबोधलं जातं. हे संबोधनही वयाचा मान राखणारं आहे. अनेक सामाजिक संस्थाही समाजातील या महत्त्वाच्या पण उपेक्षित होऊ लागलेल्या घटकासाठी कार्यरत आहेत. विचार आणि कृतीतली ही परिपक्वता कौतुकस्पद आहे. ज्येष्ठांसंबधातलं हे सुंदर चित्र अर्थातच परिपूर्ण नाही. याची दुसरी बाजू दुर्लक्षिता येण्यासारखी नाही.

म्हणूनच ज्येष्ठोत्सवासारख्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. मी अनुभवलेल्या तीन दिवसांच्या उत्सवात ज्येष्ठांना आपलं वय विसरून कॉलेज-विश्वात नेणाऱ्या अनेक स्पर्धांचं आयोजन

केलेलं होतं. भरतकामापासून एकांकिका स्पर्धांपर्यंत, काव्यपूर्तीपासून वादविवाद स्पर्धेपर्यंत सर्व प्रकारच्या स्पर्धांचा त्यात समावेश होता. विशेष म्हणजे सत्तर-ऐंशी या वयोगटासाठी असलेल्या या स्पर्धा लुटुपुटीच्या नव्हत्या. या स्पर्धांना परीक्षक तर होतेच पण सर्व स्पर्धांना काटेकोर नियम होते. ते नियम पाळले जातायत ना हे पाहण्यासाठी एकेक निरीक्षकही नेमला होता. या सर्व कसोट्यांना उतरून बक्षिस मिळाल्यावर स्पर्धकाला खराखुरा आनंद मिळत होता. त्या आनंदात सामिल होत उत्सवी मूडमधे छान तयार होऊन आलेली सर्व ज्येष्ठ मंडळी टाळ्या वाजवत लहान मुलांसारखी नाचत होती. ते दृश्य पाहताना गहिवरून आलं. उत्सवाला वयाचं बंधन नसतच. पण ज्येष्ठपणाच्याच त्या चैतन्यदायी उत्सवानं पिकणंही सुंदर असू शकतं याचा प्रत्यय तिथं आलेल्या प्रत्येकाला दिला...!!

पहाटपावलं : ३.१२.२०१८

# मॅरेथॉन

शाळेत असताना आमच्या वर्गात दोनच मुली इस्त्रीचा ड्रेस घालून यायच्या. त्यांचा कधी कुणाला हेवा वाटल्याचं आठवत नाही. पण त्या वेगळेपणाची नोंद व्हायची. तेव्हा अशा बऱ्याच छोट्या छोट्या गोष्टींचं अप्रुप वाटायचं. आता कशाचंच काही वाटत नाही कुणाला. परवा परवापर्यंत अपूर्वाईचा वाटणारा मोबाईल आता सर्वांच्या हातात सहज मिरवत असतो. मॅरेथॉनसारख्या दूरस्थ वाटणाऱ्या खेळात सहभागी होणंही आता फारसं दुरापास्त राहिलेलं नाही. त्यामुळं एकमेकांच्या नादानं आम्ही बऱ्याच जणांनी या वेळच्या मॅरेथॉनमधे भाग घेतला. सर्वांबरोबर चालत.. धावत, कडेला उभ्या असलेल्यांचे अभिवादन स्विकारत टार्गेट पूर्ण करतानाची मजा अनुभवली. गळ्यात पदक घालून, मॅरेथॉन पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र हातात घेऊन फोटो काढणे, तो लगेच वॉट्सअप.. फेसबुकवर शेअर करणे, किती लाईक्स मिळतात ते मोबाईलमधे डोकावून पाहणे... हे सगळं करून पाहिलं... काहीतरी साध्य केल्याचा आनंद मिळवला. आपण हे करू शकलो याचं समाधानही काही दिवस पुरलं. मग ते पदक आणि प्रमाणपत्र घरातल्या इतर वस्तूंमधे जमा झालं.

पण सर्वांसमवेत चालण्या-धावण्याच्या मॅरेथॉनच्या अनुभवानं एक वेगळाच भाव मनात जागला. वाटलं, आपण आपापल्या घरात आपापली दिनचर्या पार पाडत असतो. धावण्यासाठी सुरुवातीची रेघ मारलेली नसते कोणी. प्रत्येकजण त्याच्या वेळेनुसारच बाहेर पडतो. जातायेता समोरासमोर भेट झाली तर नमस्कार.. गुड मॉर्निंग करत एकमेकांची दखल घेतली जाते. आपापल्या वाहनानं सगळे मार्गस्थ होतात. रस्त्यावर प्रत्येक सिग्नलवर 'ऑन युवर मार्च गेट सेट.. गो' ऐकण्याच्या तयारीत असतात सर्व. ग्रीन सिग्नल मिळताच सगळे सुसाट धावू लागतात. आपापली मंजिल गाठतात. कामं उरकली की एकेकजण परतू लागतो. दिवस संपतो. दारं बंद होतात. सकाळ झाली की 'नवा गडी नवं राज्य' सुरू झाल्यासारखी नव्या दिवसाची 'मॅरेथॉन' नव्यानं सुरू होते...

'मॅरेथॉन' कल्पनेनं मनाचा असा ठाव घेतला की सगळीकडे तिची रूपं दिसू लागली... रोज जाण्यायेण्याच्या वाटेवरची झाडं खरंतर रस्त्याच्या कडेला निमुट उभी असतात. पण जाणवलं की त्यांच्या आतही दिवस-रात्रींची आवर्तनं चालू आहेत. प्रत्येक क्षणी ती वाढताहेत. खाली मुळांना धुमारे फुटतील तशी झाडांना वर पालवी फुटतेय.. प्रत्येक झाड आपापले वाढतेय. पण वाढीच्या दिशेनं ते एकटंच चाललेलं नाहीए. आपापल्या जागेवरून

सगळी झाडं या वाढीच्या 'मॅरेथॉन'मधे सामिल झालीयत... या झाडांवर किलबिलणाऱ्या पाखरांचीही अद्भुत अशी गगनगामी 'मॅरेथॉन' सुरू आहे. यच्चयावत् जीवसृष्टीत जेवढ्या प्रजाती त्या साऱ्यांच्या आपापल्या 'मॅरेथॉन्स' चालू आहेत... वाटलं, जाणिवेचा पैस विस्तारत जाईल तसतसे जगण्यातल्या अशा असंख्य मॅरेथॉन्सचे भव्य स्वरूप आपल्या अंतरदृष्टीसमोर उलगडू शकेल. आणि जाणिवेच्या अत्युच्च शिखरावरून पाहता आलं तर जे जे म्हणून 'आहे' त्या एकुणएक सर्व अस्तित्वांची एकच एक भव्य 'मॅरेथॉन' चाललेली जाणवू शकेल...! सृष्टीच्या आरंभापासून सुरू असलेल्या या मॅरेथॉनचे आयोजन कोणी, केव्हा, कसे केले असेल? आजतागायत कुणालाही न सुटलेलं हे कोडं माणसाच्या जिज्ञासेला अव्याहतपणे आवाहन देतं आहे...!

पहाटपावलं : १०.१२.२०१८

## गप्पा ग्वाड...

नेहमीपेक्षा सखुबाई लवकरच आल्या आणि पदर खोचून तडक कामालाच लागल्या. मीही कामात होते. त्यामुळं लगेच काही विचारलं नाही. बाहेरच्या खोल्या झाडून झाल्यावर भांडी घ्यायला त्या आत आल्या तेव्हा म्हटलं, ‘आज लवकर आलात?’ तशा म्हणाल्या, ‘लेकीच्या शाळेत जायचंय...’ मग आणखी काही विचारावं लागलं नाही. लेकीच्या प्रगतीविषयी सगळं सविस्तर सांगून झालं. ते सांगताना त्यांचा चेहरा खुलला होता. मग चहा पितापिता आमच्या गप्पा सुरू झाल्या. मी त्यांच्या मुलीचं कौतुक केल्यावर त्या आणखी खुलल्या. बोलत राहिल्या.. शाळेत का बोलवलंय, मलाच जाणं कसं गरजेचं आहे, शाळा किती लांब आहे, जायला किती वेळ लागेल, अजून किती घरची कामं आहेत... सगळं सांगून झालं. त्या आल्यावर चहा पिताना गप्पा मारणं हा आमच्या दिनचर्येचा भागच झालाय. घरातलं कायबाय एकमेकींना सांगितलं की दोघींना बरं वाटतं. चहा संपवून गप्पा आवरत्या घेत उठताना त्या म्हणतात, उठा बाई.. गप्पा ग्वाड काम द्वाड..’ त्यांचे हे शब्द ऐकले की नोकरीतले दिवस आठवतात.

नोकरीत असताना लंचटाईममधल्या गप्पा संपवून परत कामावर जाताना आमची मानसिकता हीच असायची. डबा खाताना काल काम आटपून घरी गेल्यापासून आज परत कामावर येईपर्यंतच्या वेळातल्या सर्व घडामोडींचा धावता आढावा घेऊन व्हायचा. डब्यातली भाजी एकमेकींना वाढताना ती कशी केली? यापासून सुरू झालेल्या गप्पांमधे जगभरातलं काहीही सामिल व्हायचं. नवीन काही वाचलेलं, लिहिलेलं.., मनाला काही लागलेलं, घरात काही बिनसलेलं, कामात काही अडलेलं, नवीन काही खरेदी केलेलं, पाहिलेलं नाटक, ट्रीपचा मनसुबा... असं सगळं काही..! त्या अर्ध्या तासात मुक्तपणे बोलून झालं की डब्याबरोबर मनही मोकळं व्हायचं. नव्या दमानं कामाला लागताना एक ताजेपण जाणवायचं. तो अर्धा तास म्हणजे रोजच्यारोज मिळणारा बोनस वाटायचा.

रोजच्या बस-प्रवासातल्या गप्पा, सकाळी बागेत फिरताना होणाऱ्या गप्पा, बरेच दिवसात भेट झाली म्हणून मुद्दाम एकमेकांकडे जाऊन मारलेल्या गप्पा, किंवा लांबच्या प्रवासात शेजारच्या प्रवाशांशी होणाऱ्या गप्पा.. प्रत्येकाशी होणाऱ्या गप्पांचे विषय वेगवेगळे असतात. त्यातून व्यक्त होण्याची एकेक भूक भागत असते. गप्पा म्हणजे केवळ वेळेचा अपव्यय नसतो. गप्पांमधून नकळत वेगवेगळ्या स्तरावरचं समुपदेशन होत असतं.

त्यातून दिलासा मिळतो. एखाद्या समस्येवर तोडगा सापडतो. रोज गाठ पडणाऱ्या वेगवेगळ्या स्वभावाच्या माणसांशी कसं वागावं याच्या युक्त्या कळतात. आपल्या चुका उमगतात. त्या सुधारण्याचा मार्गही कळतो. सहज बोलण्यातून नवी माहिती मिळून जाते... सर्वात महत्त्वाचं म्हणजे न बोलण्यामुळे निर्माण होणारं दोन माणसांतलं अंतर नाहीसं होतं... बोललं जात नाही तोपर्यंत कॉलनीतले शेजारी, कार्यालयातले सहकारी, लांबच्या प्रवासातले सहप्रवासी यांच्यात एकमेकांविषयी काही ग्रह निर्माण होतात. साशंकता असते. पण औपचारिक बोलण्यातून छान गप्पांना सुरुवात झाली की मधली धूसरता नाहीशी होते...

सहज गप्पांमधून इतकं सारं साध्य होत असतं..! 'गप्पा ग्वाड...' या म्हणीमधे गप्पांची ही सकारात्मक बाजू किती सहज अधोरेखित झालीय..!

पहाटपावलं : १७.१२.२०१८

# एक्स फॅक्टर

माझ्या एका मैत्रिणीनं मला तिची एक नवी कविता ऐकवली. ‘वा…’ तोंडून लगेच दाद गेली. या प्रतिसादानं तिचं समाधान झालं नाही. तिनं परत विचारलं, खरच छान झालीय? ऐकताना काहीतरी अपूर्ण वाटलं होतं. तिला म्हटलं, ‘परत ऐकव बरं..’ तिनं ऐकवली. पुन्हा नीट ऐकताना अपुरेपण कुठं आहे ते जाणवलं. म्हटलं, ‘शेवटच्या ओळीतील सुख या शब्दाला काहीतरी विशेषण लाव.’ तिनं त्यावर विचार केला. दुसरे दिवशी तिचा परत फोन आला. आवाजावरुनच तिची खुशी जाणवत होती. तिनं ती कविता परत ऐकवली. आता ‘व्वा…’ अशी दाद दिली गेली. एका विशेषणानं कवितेला पूर्णता आली होती…

असा पूर्णतेचा आनंद मिळायला हवा असेल तर अपूर्णतेचा सल सलत राहायला हवा. अगदी स्वयंपाकघरातल्या पाककृतीपासून ते कोणत्याही कलाकृतीपर्यंत प्रत्येक निर्मितीबाबत असा एक टप्पा येतो की निर्मिती-प्रक्रिया तर पूर्ण झालीय पण निर्मात्याला पूर्णतेचं समाधान नाहीय. मग काय राहिलंय, अजून काय हवंय याचा शोध चालू राहातो. अस्वस्थतेचा हा काळ सृजन-शक्तीला आवाहन देणारा असतो. केलेल्या पदार्थात चिमुटभर

साखर टाकून किंवा मंद आचेवर एक वाफ देऊन पदार्थ अगदी हवा तसा होऊन जातो. तासन् तास रियाज केल्यावर एकाग्रतेच्या टोकावर कधीतरी हवा तो सूर लागतो... दीर्घ चिंतनानंतर कथेचा समाधानकारक शेवट सुचतो... रंगच्छटेच्या एखाद्या फटकाऱ्यानं चित्र जिवंत होतं... किंवा नेमक्या जागी एक हलका हात फिरवल्यावर शिल्पाच्या चेहऱ्यावरचे भाव बोलके होतात... पूर्ततेसाठी नेमकं काय हवंय ते सुचवून समाधान देणारा क्षण दीर्घ प्रतीक्षेनंतर असा अवचित येतो..! पण बरेचदा तो हुलकावणीच देत राहतो. निर्मात्याच्या मनात अस्वस्थता पेरून अव्यक्तात लपून बसतो तो. पूर्तता देणारी ती अनाम गोष्ट - 'एक्स फॅक्टर' काही केल्या हाती लागत नाही.

हल्ली बऱ्याच स्पर्धांचे आयोजन वेगवेगळ्या स्तरांवर केले जाते. परीक्षण करताना दोन अगदी तंतोतंत सारख्या दिसणाऱ्या कलाकृतींमधे जाणकार परीक्षकाच्या नजरेला एक सरस वाटते. तिला प्रथम क्रमांक दिला जातो. त्याविषयी बोलताना समीक्षक सूक्ष्म निरीक्षण करून दोन्हीतील नेमका फरक दाखवून द्यायचा प्रयत्न करत असतात. पण दोन्हीपैकी एका कालाकृतीची निवड नेमकी का केली हे सांगताना तिला सरस ठरवणारा घटक त्यांना वेगळा काढून दाखवता येत नाही. हल्ली त्याला एक्स फॅक्टर असं संबोधलं जातं..! पण त्याचा खरा अर्थ कुणाच्याच लक्षात येत

नाही. मग एक्स फॅक्टर म्हणजे कलाबाह्य काहीतरी अशी समजूत करून घेतली जाते. मार्गदर्शकही गडबडतात आणि स्पर्धकांचे चुकीच्या दिशेनं प्रयत्न सुरू होतात...

अशी दिशाभूल करून न घेता पूर्णतेचा ध्यास घेऊन आंतरिक अस्वस्थता विझू न देता शोध घेत राहिलं तर कधी ना कधी काय कमी पडतंय ते उमगेल. तो उमगण्याचा क्षण स्वर्गीय आनंद देणारा असू शकेल. आणि नाहीच उमगलं तरी शोध-प्रक्रियेतील उत्खननात आतला पैस विस्तारेल आणि त्या अपूर्णतेच्या असमाधानातच नवनिर्मितीचं बीज रुजेल..!

पहाटपावलं : २४.१२.२०१८

## समारोप नसतोच...

आमच्या कुंडीत आपसुक रुजून एक रोप तरारून वर आलं. कितीतरी दिवस झाले त्याची गर्द हिरवी लांबसडक पानं कारंज्यासारखी उसळून उमललेली राहिलीयत आणि ऋतुनुसार त्या रोपाला हळदीसारख्या पिवळ्या रंगाची फुलं येतायत. रोप अजून टिकून आहे आणि त्याला सातत्यानं फुलं येतायत त्या अर्थी केव्हातरी, कुठूनतरी बीज पडलं असेल. उगवण्याच्या आंतरिक ऊर्मीला कुंडीतल्या तयार मातीनं साथ दिली असेल आणि सुरू झाला असेल सृजन-सोहळा...! हा सोहळा मी कित्येकदा अनुभवलाय. परिपक्व क्षणी देठातून कळी डोकावते. बघता बघता त्याचं फूल होतं. रंग उधळत पाकळ्या पसरवून हसतं आणि परतीची हाक येताच स्वतःला मिटून घेतं. निर्माल्य होऊन गळून पडतं. तोवर दुसरी कळी डोकवते.. फुलते.. हसते.. गळून पडते.. एक फूल गळून पडलं तरी लगेच बहर संपत नाही. एक बहर संपला तरी शिशिर पचवून नवा बहर झाडांवर दाखल होतो. रुजणं.. उमलणं.. गळून पडणं.. पुन्हा रुजणं.. हे चक्राकार गतीनं अखंड चालूच असतं. सृजनाच्या या खेळाला समारोप असत नाही.. हे अनुभवताना मला "उपजे ते नाशे । नाशले पुनरपि दिसे । हे

घटिकायंत्र तैसे । परिभ्रमे गा" या ज्ञानेश्वरीतल्या ओवीचा आशयच दृश्यमान झाल्यासारखा वाटला..!

आपल्या भोवतीही सर्वत्र दिसतं की भौतिक परिवर्तनाच्या रेट्यात जुनं सगळं भराभर मागं पडतंय. पण जीवन-प्रवाह थांबलेला नाहीए. जुन्या चालीरीती, कपडे, दागिने, खाण्याच्या सवयी, सामाजिक नीती नियम, राजवटी, अर्थार्जनाची साधनं, कुटुंबव्यवस्था, साहित्य, विविध कला, भाषा... सर्व वेगानं बदलत असलं तरी नाहीसं झालेलं नाहीए. त्याच जमिनीतून नव्या रूपात निर्माण होत राहिलंय. बाह्य परिवर्तनाच्या सर्व आघातांना टक्कर देत जीवन-प्रवाह अखंड चालूच आहे. सानुल्या फुलापासून महाकाय ग्रह-ताऱ्यांपर्यंत सर्व पातळ्यांवर 'उत्पत्ती.. स्थिती.. विलय.. उत्पत्ती' यांची असंख्य आवर्तनं आपापल्या गतीनं चालू आहेत...


रात्रीचा अंधार शिगेला पोचला की उतरणीला लागतो. हळूहळू उजाडू लागतं. क्षितिज ओलांडून सूर्य वर येतो. उन्हं तापून थकतात. मग सूर्य आपली किरणं आवरून पुन्हा क्षितिजामागे बुडी मारतो. उजेडाची ही भरती ओहोटी पाहणारा दिवस रोज नाव बदलून आपल्याला भेटत असतो. दिवसांमगून दिवस जातात. बघता बघाता वर्ष संपत येते. पण ते संपण्याचा क्षण सुटा, एकाकी

असत नाही. त्याला बिलगून नव्या आरंभाचा क्षण उभा असतो. हे सगळे क्षण.. दिवस.. महिने जगणारे आपण अदृश्य अशा मध्यसीमेवरून सरत्या क्षणाला निरोप देतो आणि नवागताचे स्वागत करतो. सृष्टीच्या ‘घटिकायंत्रा’चा आपणही एक अविभाज्य भाग असतो. पण आपली जाणीव आपल्याला माणूस म्हणून वेगळं करते. चक्रात राहून आपण त्या चक्राकडे पाहात असतो. चक्रासोबत फिरता फिरता एका हाताने जाणाऱ्या क्षणाला.. म्हणजे खरंतर आपल्यालाच निरोप देतो आणि दुसऱ्या हाताने येणाऱ्या क्षणाचे.. म्हणजे खरंतर आपलेच स्वागत करत असतो... या निरोप-स्वागताच्या सोहळ्यामधे जाणीवपूर्वक सहभागी होता आलं तर खऱ्या अर्थानं आपल्यातल्या जुन्याला निरोप देता येईल आणि नव्याचे दिलखुलास स्वागत करता येईल..!

पहाटपावलं : ३१.१२.२०१८

आसावरी काकडे यांचे ई साहित्यवरील पहिले पुस्तक

एकच क्लिक आणि पुस्तक उघडेल



## ई साहित्य प्रतिष्ठानला १३ वर्ष होत आली.
## आसावरी काकडे यांचे ईसाहित्यवरचे हे दुसरे पुस्तक.

आसावरी काकडे हे नाव माहित नाही असा कोणी मराठी वाचक नसेल. इयत्ता सातवी ते MA अभ्यासक्रमात त्यांच्या कवितांचा अभ्यास करून नवीन पिढी मोठी होत आहे. आधीच्या पिढीनेही अनेक पुस्तकांतून आणि कार्यक्रमांतून त्यांच्या काव्याचा आस्वाद आणि विचारांचा परिचय घेतला आहे. त्यांच्या पुस्तकांना मानधनासहित प्रकाशित करण्यासाठी प्रकाशकांची अहमहमिका असते. परंतू त्यांनी या पुस्तकांसाठी ई साहित्यचा मार्ग अनुसरला व वाचकांना विनामूल्य वाचनानंद द्यायचा निर्णय घेतला. एकाही पैशाची अपेक्षा न ठेवता त्यांनी उदार हस्ते ही पुस्तके आमच्या लाखो वाचकांना दिली.

असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३०), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(३), अनंत

पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२४), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) पंकज कोटलवार(२) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(२) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।